
साप्ताहिक
माणूस

शनिवार । ८ मे १९७६ । एक रुपया

# दुष्काळी विहिरी
□
# काही प्राध्यापक
□
# काही तरुण



दुष्काळात विहीर खणणे हे 'माणूस प्रतिष्ठान'चे ग्रामायनाच्या दिशेने टाकले गेलेले पहिले पाऊल. (१९६६)

पुढे महाराष्ट्र शासनाने हा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर हाती घेतला आणि गेल्या दुष्काळात सुमारे वीस कोटी रुपये या कार्यक्रमावर खर्च केले.

हजारो विहिरी या कार्यक्रमाचा भाग म्हणून खणल्या गेल्या.

पण विहिरी खणणे हे कितीही सोपे व अकुशल काम मानले गेले असले, तरी ते एक बेभरवशाचे व अवघड काम आहे असा 'माणूस प्रतिष्ठान'चा तरी अनुभव आहे.

दुष्काळी कामे घाईने सुरू करावी लागतात. त्यामुळे विहिरींच्या जागा पुष्कळदा चुकतात.

जागा जरी योग्य निवडल्या गेल्या, तरी अपेक्षित पाण्याचा साठा, अंदाजित खोलीवर आढळत नाही.

साठा आढळला तर, विहिरीच्या पुढील बांधकामाला पैसा शिल्लक उरलेला नसतो. त्यामुळे खणलेल्या विहिरी पुन्हा वर्षभरात बुजायला सुरुवात होते.

त्यानंतर प्रश्न येतो विहिरीचे पाणी वर उपसायचे कसे? यासाठी पुन्हा दहा-पाच हजार भांडवलाची गरज असते.

आणि विहीर जर 'सामुदायिक' असेल, तर यापुढचे पाणी वाटपाचे आणखी काही प्रश्न! पाणी कोणी घ्यायचे, किती घ्यायचे वगैरे.

गेल्या दुष्काळात ज्या हजारो विहिरी महाराष्ट्रात सरकारी पातळीवरून खणल्या गेल्या त्यांतील बहुसंख्य विहिरी या प्रश्नांच्या गुंतवळ्यात अडकून पडल्यामुळे अर्धवट अवस्थेत आहेत व या विहिरींच्या बाबतीत लवकर काही हालचाल झाली नाही, तर त्या बुजून 'नाहीशा' होण्याचाही धोका मोठा आहे.

हा धोका कसा टाळता येईल किंवा कमी करता येईल?

प्रथम निदान ढोबळ मानाने तरी, एक 'पाहणी' होणे अवश्य आहे.

दुष्काळात एकूण खणल्या गेलेल्या या सामुदायिक विहिरींची नेमकी संख्या किती आहे?

या विहिरींची ठिकाणे—गावे जिल्हा-तालुकावार नक्की करणे.

विहिरींची सद्यःस्थिती पाहणे.

ज्यांना पाणी लागणे शक्य नाही अशा विहिरी हिशोबातून बाद करणे.

ज्या विहिरी सुजलां सुफलां होऊ शकतील अशांची संख्या नक्की करून, त्यांच्या पुढील बांधकामाची, पाणी उपसण्याची आणि वाटपाची व्यवस्था पक्की करणे.

इतके या वर्षभरात होऊ शकले, तर दुष्काळात खर्ची पडलेले वीस कोटी रुपये काही प्रमाणात तरी भरून निघतील. दुष्काळात उत्पादक कामे काढ-

# साप्ताहिक माणूस

**वर्ष पंधरावे – अंक : अठ्ठेचाळीसावा (४८)**

**८ मे १९७६**

**मूल्य : एक रुपया**

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
□
वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये
□
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
□
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
□
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
□
दूरध्वनी : ४३४५९
□


**पृष्ठ १ वरून....**

ण्याच्या महाराष्ट्र शासनाच्या प्रयत्नाला यश लाभले असे म्हणता येईल.

खणल्या गेलेल्या हजारो विहिरींपैकी समजा पन्नास टक्के विहिरी जरी आपण ‘ वाचवू ’ शकलो, तरी हे यश थोडे आहे असे कुणी म्हणणार नाही.

या दृष्टीने एक स्वागतार्ह हालचाल पुण्याच्या गोखले इन्स्टिटच्यूटचे संचालक डॉ. दांडेकर यांनी या आठवड्यात केली. तिची नोंद संबंधितांनी वेळीच घेतली, तर निदान या ‘ पाहणी ’चे पहिल्या टप्प्याचे काम तरी वेळेवर पूर्ण होऊ शकेल. दांडेकरांनी पुण्या-मुंबईतील विविध विद्यार्थी संघटनांच्या प्रतिनिधींशी संपर्क साधला. ग्रामायनचे अध्यक्ष प्रा. वसंत देशपांडे व श्री. दि. वि. गोखले यांनी या कामी दांडेकरांना व विद्यार्थी प्रतिनिधींना एकत्र आणण्यात व पाहणी कार्यक्रमाचा ढोबळ तपशील ठरविण्यात खूपच पुढाकार घेतला. ठरलेला कार्यक्रम जर व्यवस्थित पार पडला, तर या मे महिनाअखेर महाराष्ट्रात निदान हजार–बाराशे तरुण विद्यार्थी तरी, आपापल्या भागातील खेडोपाडी हिंडून, या दुष्काळी विहिरींची कामचलाऊ माहिती दांडेकर व त्यांचे इतर सहकारी यांना पुरवतील; पुढे या महितीची छाननी केल्यावर जर काही विहिरी ‘ वाचवणे ’, त्यांचे बांधकाम इत्यादी पूर्ण करणे, त्यांतील पाण्याचे वाटप ठरवणे यांबाबत आशादायक स्थिती आढळून आली तर, अशा विहिरींची प्रकरणे हाताळण्यासाठी शासकीय व गावपातळीवर काही हालचाली कराव्या लागतील हे उघडच आहे. दांडेकर व त्यांची संस्था, निरनिराळ्या विद्यार्थी संघटना व ग्रामायनचे कार्यकर्ते यांनी मनावर घेतले तर, हे कार्य वर्षा दोन वर्षात मार्गी लागणें अवघड नाही. शिवाय विद्यार्थीशक्तीला विधायक कार्याचे, नवनिर्माणाचे शिक्षणही यांतून आपोआप मिळत राहील, ते वेगळेच. केवळ महाराष्ट्रातून हजार–बाराशे विद्यार्थी या कामासाठी घराबाहेर पडतात, खेडोपाडी सायकलीवरून, वसने हिंडतात, तेथे मिळेल ती भाकरी खातात, चावडीवर किंवा देवळात झोपायचीही तयारी ठेवतात, हेच मुळात एक केवढे अप्रूप आहे ? गांधीजींपासून ‘ खेड्यात जा ’ असे सगळेजण सांगत आहे. पण जाणे तर लांबच राहिले. खेडीच शहरीकरणामुळे ओस पडायची वेळ आली आहे. विद्यार्थ्यांच्या अशा टोळ्याच्या टोळ्या जेव्हा स्वयंस्फूर्तीने खेड्यांकडे निघतील, तेव्हाच ही परिस्थिती पालटण्याचा मार्ग दिसू लागेल. या दृष्टीने या खेड्यांकडे निघालेल्या सहस्रावधी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या डॉ. दांडेकरांचे, ग्रामायनच्या कार्यकर्त्यांचे खरोखरच सर्वांनी मनापासून अभिनंदन करायला हवे. विशेषत: विद्यार्थ्यांना या पाहणीकाळात जी काही मदत जिथेकुठे लागेल, ती उपलब्ध करून दिली पाहिजे. हजारोंपैकी काही शेकडा विहिरी जरी या विद्यार्थीगणांनी ‘ वाचवल्या ’, अर्धवट असलेल्या पूर्ण केल्या तरी त्यांनी अनेक पोती धान्य उत्पन्न केले असे होणार आहे. आणि सद्य:स्थितीत याहून अधिक चांगली देशसेवा–लोकसेवा दुसरी कोणती असू शकते ?

□

क्रीडा

# थोडे यश, बरेच अपयश

सुहास गणेश फडके

आम्ही वेस्टइंडीजमध्ये आलो तेव्हा सारेजण असेच म्हणत होते की, 'चारही कसोटीत आमचा सपशेल पराभव होणार. पण प्रत्यक्षात आमच्यापेक्षा एकच विजय अधिक नोंदवला गेला' अशी प्रतिक्रिया भारतीय संघाचे व्यवस्थापक पॉली उम्रीगर यांनी व्यक्त केली. अर्थातच भारत ही मालिका २ विरुद्ध १ अशी हरला ही नोंद होणार. परंतु महत्त्व मालिका हरण्याला नाही, तर जे प्रश्न भारताला गेले कित्येक वर्षे भेडसावताहेत त्याचे उत्तर शोधण्यात पुन्हा एकदा अपयश आले, याला आहे. त्यांनी आपल्यापेक्षा एकच कसोटी सामना जास्त जिंकला, यामुळे कदाचित काहीजणांना आनंद होईल, परंतु चार कसोटी सामन्यांमधील फलंदाजी ही काहीशी लाजिरवाणीच होती.

पहिला कसोटी सामना म्हणजे जणू काही भारतीय फलंदाजांमध्ये हॉलफोर्डला नजराणा देण्याची स्पर्धाच होती. तीन वर्षांनंतर पुनरागमन झालेल्या हॉलफोर्डला अत्यंत टुकार गोलंदाजीवर सहा बळी मिळाले आणि केवळ १७४ धावांवर बाद झालेल्या भारतीय संघाला सामना गमावण्याखेरीज दुसरा पर्यायच नव्हता. दुसरा कसोटी सामना, पावसाने फुकट घालवलेला एक संपूर्ण दिवस आणि पंचांच्या रूपाने थोडेसे नशीब यांच्यामुळे अनिर्णित राखण्यात वेस्ट इंडीजला कसेबसे यश मिळाले.

तिसरा कसोटी सामना म्हणजे मात्र एक इतिहासच ठरला. चौथ्या डावात विजयासाठी आवश्यक असणाऱ्या चारशेहून अधिक धावा केवळ चार बळींच्या मोबदल्यात केल्या. निव्वळ फलंदाजीच्या जोरावर भारताने लॉईडवर अक्षरशः पश्चात्तापाची वेळ आणली. भारतीय क्रिकेटच्या इतिहासात हा विजय निर्विवादपणे सर्वोत्कृष्ट आहे. पंतप्रधान इंदिरा गांधींपासून सर्वांचे अभिनंदनांचे वर्षाव स्वीकारत भारत चौथ्या कसोटीसाठी उतरला आणि त्यानंतर जे घडले ते केवळ अघटितच होय.

सहा दिवस चालणाऱ्या या सामन्यात लॉईडने नाणेफेक जिंकून भारताला फलंदाजी दिली, तेव्हाच काहीतरी विशेष घडणार असे वाटू लागले. तरीसुद्धा पहिला दिवस भारताला अत्यंत सुखद, आनंददायक असाच गेला. केवळ गावस्करच्या बदल्यात भारताने १७८ धावा केल्या. टॉस जिंकणाऱ्या लॉईडचा डाव कसा फसला आणि कसा फसेल याची चर्चा जोर धरत असतानाच एक भले मोठ्ठे प्रश्नचिन्ह (अगदी दिव्यातून येणाऱ्या राक्षसासारखेच) उभे ठाकले. दुसरा नवीन चेंडू घेतला गेला आणि त्यानंतर मोहिंदर बाद, विश्वनाथचे बोट मोडायला व बाद व्हायला एकच गाठ. म्हणजेच फलंदाजीला पुन्हा येण्याची आशा नाही. गायकवाड, पटेल जबरदस्त जखमी. त्यांचे मैदानावर परत दर्शन होण्याची शक्यता नाही अशी स्थिती झाली. वेंगसकरने नेट लावून धावसंख्या तीनशेपलीकडे नेली परंतु तो बाद झाल्यावर बेदीने स्वतःला व चंद्रशेखरला सुरक्षित ठेवण्यासाठी डाव सोडला.

या सर्व रामायणानंतर पंचांची कर्तव्ये, खिलाडूवृत्ती, बंपर्स इत्यादींची जोरदार चर्चा सुरू झाली. बेदी व उम्रीगरनी जोरदार निषेध नोंदवले, तीव्र नापसंती व्यक्त करण्यात आली. इतकेच नव्हे तर, जॉन अर्लोट या समीक्षकाने तर जगात सर्वत्र फिरक्या गोलंदाजीला अनुकूल अशाच खेळपट्ट्या बनवण्यात याव्यात, ज्यामुळे ताकदीपेक्षा बोटातील कला अधिक प्रकट होईल व असे प्रसंगसुद्धा टळतील अशी सूचना केली. असे काही न घडो अशी आशा सारे भारतीय करतील परंतु तरीसुद्धा त्या दोन तासांत घडलेल्या प्रसंगामुळे काही महत्त्वाचे निर्णय तातडीने घेण्याची वेळ येऊन ठेपली.

खेळपट्टी पहिल्या दिवशी काहीशी निर्जीव असल्यामुळे काही कठीण प्रसंग उद्भवला नाही; परंतु दुसऱ्या दिवशी किंचित वाढलेले गवत, दहा षटकांनंतर येणारा नवीन चेंडू यांचा संपूर्ण फायदा जगात सर्वांत वेगवान समजल्या जाणाऱ्या काहींपैकी होल्डिंग, होल्डर, डॅनियल, ज्यूलियन यांनी घेतला व त्यातही भारताकडे, गावस्कर, विश्वनाथ, वेंगसकर हे तीनच वेगवान गोलंदाजी नीटपणे खेळू शकणारे फलंदाज. त्यामुळे गावस्कर, मोहिंदर व विश्वनाथ झाल्यावर गायकवाड, पटेल, मदनलाल यांच्याकडून अशा खेळपट्टीवर निर्दोष खेळाची अपेक्षाच मूर्खपणाची.

गायकवाड केवळ गटसूच्या जोरावर खेळला. अर्थात यात त्याला कमी लेखण्याचा अजीबात उद्देश नाही. परंतु केवळ त्याच्या जोरावर सतत खेळणे कठीण. वारंवार अंगावर चेंडू घेतल्यावर एकदा तरी असा कठीण प्रसंग उद्भवणार. अशा वेळी चिकाटीपेक्षा निर्दोष खेळच महत्त्वाचा असतो. पटेल जेव्हा वेगवान गोलंदाजांचे बंपर्स हूक करतो ते दृश्य हास्यास्पद तर असतेच आणि हा अशा प्रसंगात कधीतरी जबरदस्त मार खाणार, असे भाकित यापूर्वीच केले गेले होते. यावेळी केवळ ओठांवरच निभावले. बाकी ऑलराऊंडर (?) मदनलाल, व्यंकटराघवन यांच्याबद्दल काहीही न बोलणेच इष्ट. त्यांना ऑलराऊंडर म्हणण्यात, जगातील सोबर्स, बेनो, गिलमॉट इ. लोकांचा अपमान करण्यासारखे आहे.

इतक्या 'दीर्घ कालावधीचा' दौरा असूनसुद्धा केवळ दोन किंवा सोळकर धरल्यास तीनच मध्यमगती गोलंदाज नेण्याचा मूर्खपणा बेदीच्या अंगलट आला आणि वर्षानुवर्षांच्या अनुभवांवरूनसुद्धा आपण काहीही शिकलो नाही आणि या अशा पीचवर एकजरी वेगवान गोलंदाज असता, तरी आपण जशास तसे उत्तर देऊ शकतो, अशा खेळपट्टीचा फायदा उठवू शकलो असतो, शिवाय ६।२१७ अशी धावसंख्या असताना शेपटाने केलेली वळवळ थांबवून आपले धडधाकट फलंदाज व हुकमी उपयोगी पडणारे फिरकी गोलंदाज, यांच्या जोरावर आपण काही चमत्काराची आशा करू शकलो असतो. तसे पाहिल्यास शेपटाचा त्रास आपल्याला नवीन नाही. ६५–६६ च्या वेस्टइंडीजच्या भारताच्या दौऱ्यावर चार्ली–ग्रिफिथ मद्रासच्या कसोटी सामन्यात शेवटच्या दिवशी शेवटचे दोन तास खेळल्यामुळे भारताच्या हातून विजय निसटला. १९७१

पृष्ठ ३२ वर

# फिर बंबईमेच आगई....

श्रीकांत जपे

'वो गरीब लोगन को दम नहीं देंगे तो कौन देगा भई ?' खचाखच्च भरलेल्या आगगाडीत एका प्रवाशाने मला सुनावले.

हा प्रवास होता फक्त मुंबईहून निघालेल्या महालक्ष्मी एक्स्प्रेसचा. मला जायचे होते ते फक्त पुण्यापर्यंतच. अर्थात ऑफिशिअली केवळ चार तासांचाच काळ तिथे कंठायचा होता, परंतु शेवटी ती महामाया 'महालक्ष्मीच' ना. तिच्यात बसायचे म्हटले तर, मारुतीच्या बेंबीलाही घाम फुटायचा. कारण 'ही' गर्दी अन् गाडी 'ही' थंड. अगदी बार्शी लाईट रेल्वेची आठवण करुन देणारी. त्यात वडेवाले, पान–बिडी, सिगरेटवाले व काळे पाणी ऊर्फ चायवाले असंख्यांच्या प्रपोरशनने जमून पिळत असतातच. या साऱ्या पीळातून आधीच जीव नक्कोसा होतो. त्यात ही 'पृष्ठभाग' हलविणाऱ्या किंवा 'डोळ्याच्या खोबण्या व तुटके पाय' प्रदर्शित करत 'देहाची तिजोऽऽरी, बक्तीचाच टेऽऽवा,' रेकणाऱ्या भिकाऱ्यांची ये–जा सुरू झाली की, अवस्था पाण्यात पडलेल्या उंदराप्रमाणे होते. मग 'च्यायला साली काय कटकट आहे, हाकल छकडा इथून,' असले आलंकारिक वाक्य बाहेर पडते. अर्थात याला साथ मिळत नाहीं. उलट पदरी पडते ते वर सांगितलेले उत्तर.

पण चटकन् निरुत्तर झालो तर 'पत्रकार' कसचे. म्हणून मीही हे भिकारी रोजी किती गल्ला जमवतात हे सांगतो. मला निरुत्तर करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांचे माझ्या कीर्तनाकडे फारसे लक्ष नसते. तो फक्त सुतकी व मरगळलेल्या थोबाडाने म्हणतो, 'साहेब, अपुन को ये तुम्हारा आयडीया समझता नै ! अमा यार, दाने दाने पे लिख्खा है खानेवाले का नाम–प्रत्येकजण आपला शेर (शेअर) घेत असतो. हे कार्य आपल्याच हाताने उप्परवाला करीत असतो !'

'खरंय बाबा ! कर्ता करविता त्यो परमेसरच हाय.' चौऱ्याहत्तरच्या दुष्काळाचं प्रतीक असलेली एक म्हातारी त्याची री ओढू लागते. श्वास टाकून म्हणते कशी, 'त्येवढाच दानधरम् व्हतयं. नायतरी सारं काय उरावर बांदूनश्यानी न्यायचंय थोडंच !'

अडाणी म्हातारीचे हे ब्रह्मतत्त्वज्ञान ऐकून मात्र माझी अवस्था विचित्र होते. तोच शेजारी बसलेली माझी एक मॉड मैत्रीण म्हणते, 'फर्गेट इट् मॅन ! डोन्ट लुक् लाईक ए कॅट ऑन ए हॉट प्लेट ! हे 'भिकार' म्हंजे आपल्या इंडिअन सोसायटीची एक स्पेशॅलिटी आहे.'

मैत्रिणीचे बोल पटतात. फक्त मी विचार करु लागतो. त्यामुळे काही गोष्टी आठवतात, तर काहींचा मागोवा घेण्यासाठी मी प्रवृत्त होतो. प्रथम काही आठवणी.

ढुढ्ढाचार्यांच्या म्हणा किंवा अर्धीचड्डी–लालपट्टा फेमवाल्यांच्या नारायण पेठेत राहणारी एक महिला डोळ्यांसमोर येते. तिची एक मुलगी डॉक्टर आहे व एक तत्त्वज्ञानाची प्राध्यापिका आहे. तिच्या साऱ्याही पोरी आपापल्या नवऱ्याच्या घरी सुखाने कालक्रमणा करीत आहेत. एकुलता एक पोरगा आता मॅट्रिकला आहे.

पण हे एकुलते एक शेंडेफळ व्हावे म्हणून या बाईने एक नवस केला होता. 'दारी आलेल्या प्रत्येक भिकाऱ्याच्या पदरात कोरभर का होईना, भाकरी घालीनच.' परमांचा ईश्वर तिला पावला. पुत्ररत्न जाहले.

सोळा वर्षे उलटली. पोराचा बाप्या झाला. तरीही 'अन्न्ये वाडाऽऽओ माय–माडीवरल्या माय,' ही हाक ऐकू आली रे आली की, ही माय आधी खिडकीतून डोकावून, 'ए बाई, थांब ग' म्हणते व मागावून दोन जिने खाली उतरुन त्या भिकारणीच्या घमेल्यात चतकोरनितकोर टाकतेच.

त्यानंतर आठवतो तो एक पांड्या व त्याला पोसणारे अनेक.

हा पांड्या पाठीवर एक पोते व हातात एक कामटी घेऊन दिवसभर कागदाचे कपटे गोळा करीत फिरतो. सांजच्या सुमारास ते पोते रद्दीवाल्याकडे खाली करतो. चार–पाच रुपये खिशात घालतो व सरळ सरळ 'देशी'च्या डोहात डुंबण्यासाठी रामेश्वर चौकातल्या 'कंट्री वाईन बार'ची वाट धरतो. साधारणतः तीनेक पावशेर ढोसल्यावर, या बुटक्या पांड्याची स्वारी डुलत डुलत तालीमीजवळ येते. एका कट्टयावर बसते. साडेआठ–नऊचा सुमार झाला की, पांडाजवळची कटोरी आमटीने व थाळी ब्राह्मणी पोळ्या–भाजीने भरुन जाते. तो गिळू लागतो. त्याचे ते राहणे–गिळणे पाहून सात्त्विक संतापाने एक बाई म्हणाल्या, 'देणारे मूर्खच ! हा मेला पांड्यातर एक भस्मासूरच आहे–त्याला फक्त ढोसणे व गिळणे माहितीय !'

पण त्या बाईंना पांड्याची पुरती ओळख नव्हती. अनेक भिकारणी या पांड्याच्या मैत्रिणी. त्यामुळे त्याची तीही सोय सहज होत असे. रात्रीच्या अंधारात पांड्याच्या भानगडींना उत !

शेवटी 'होनी को होनीही है ? घडायचे ते घडलेच.' पांड्याचे चाळे घरमालकांने याची–देही–याची डोळा पाहिले. कट्टयावर पसरण्याची परवानगी काढून घेण्यात आली. फक्त गिळण्यासाठीच बसण्याची परवानगी देण्यात आली. पांड्याचा रोमान्स संपला, पण भिकारीपण संपले नाही. 'गरीबा'लाही भावना असतात !

'भिकाऱ्यांचे रिहॅबिलिटेशन' करण्यासाठी महाराष्ट्र सरकारच्या समाजकल्याण विभागाने त्यांना काम दिले होते. काळम्मावाडी धरणावर आता फक्त हाताच्या बोटांवर मोजता येतील इतकेच 'भिकारी कामगार' शिल्लक राहिले आहेत. कारण 'साब, बंबईमें रोजाना चिकन-चिकनाहट खाते थे। अभी रुखी-सुखी कौन खाएगा.' तिथून पळून जाऊन पुणे स्टेशनसमोर मुक्काम ठोकणाऱ्या एका अदमद्याने मला सांगितले.

पुण्यात 'अन्न्ये वाडा ऽ ओ' पब्लिक जरा कमी प्रमाणात झाल्यासारखे वरवर वाटते. परंतु हा केवळ भासच ! स्टेशनसमोर, जंगलीमहाराज, सारसबाग गणपती, विठ्ठलवाडी इकडे असे अनेक लोक संचार करताना दिसतात. कदाचित आणखीन थोडा काळ

गेल्यावर भाई लोग पुन्हा धंद्याला सुरूवात करावयाची शक्यताही नाकारता येत नाही.

जी गोष्ट 'पुण्या 'बाबत तीच मुंबई मोहनगरीबाबत. पब्लिक 'धोती-लोटा' येईल त्या भावने विकून, तडक चौपाटीच्या रस्त्याला लागलंय. कुणी महाभाग म्हणेल: 'कुठायत हे भिकारी?'

उत्तर साधं सोपं व सरळ आहे.

शुक्रवारी म्हणजे जुम्याला मशिदीत; मंगळवार, गुरुवार व शनिवारी देवळाभोवती अन् 'सन्डे'ला चर्चच्या आसपास फिरा म्हणजे त्यांचे दर्शन होईल आणि खिशालाही चाट पडेल.

हिप्पी ऊर्फ गोरे भिकारी तर, मुंबईच्या फोर्ट, कुलाबा व जुहूत अजूनही संचार करतायतच. त्यांच्यावर कोठलेच बंधन नाय.

आणखीन एक गंमत सांगतो—

फोर्टात 'ब्युटी कंट्री वाईन बार' नावाचा एक अत्यंत गलिच्छ बार आहे. प्लॅस्टिकचे गिलास. भरभरून भिकारी ते प्यायचे. पण हा बार आता ओस पडलाय. कारण भिकाऱ्यांचे दुकान म्हणून इतर पब्लिक तिथं पूर्वी कधीच जायचं नाही. आता भिकारी पहिल्या इतक्या प्रमाणावर येत नाहीत. बिचाऱ्या सय्यदभाईची कंबक्तीच!

कामावरून भिकारणी पळाल्या अन् त्यादेखील थेट बोरीबंदराला आल्या. आता उघड उघड भीक मागता येत नाही म्हणून जो व्यवसाय त्या रात्रीच करायच्या तो व्यवसाय आता त्या दिवसाढवळ्याही करतायत. एकदा मी माझ्या मित्राकडे मॅजेस्टिक हॉटेलमध्ये गेलो होतो.

जेवणखाण— गप्पा उरकून रात्री साडेदहाच्या सुमारास व्ही. टी. कडे जाण्यास निघालो. तोच फौन्टनपाशी 'ओऽऽ साब' करत एक बया माझ्या मागे धावत आली. दचकून मागे पाहिले. ती होती चंद्री. केविलवाणे हसून ती म्हणाली, 'फिर मय बंबईमेच आ गयी ऽऽ!'

मी कपाळावर हात मारला! □

# दोन निवडणुका :
## व्हिएटनाम आणि पोर्तुगाल

वा. दा. रानडे

पंचवीस एप्रिल १९७६. जगातील दोन देशांच्या राजकीय भवितव्याच्या दृष्टीने हा दिवस महत्त्वाचा ठरला. आशियात उत्तर व दक्षिण व्हिएटनाममध्ये संयुक्त विधानसभेसाठी निवडणुका होऊन व्हिएटनामच्या एकीकरणाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकले गेले, तर युरोप व पोर्तुगालमध्ये नव्या घटनेनुसार नॅशनल असेंब्लीसाठी पहिल्या निवडणुका झाल्या. दोन्ही देशात एक वर्षापूर्वी अशाच महत्त्वाच्या घटना घडल्या होत्या. दक्षिण व्हिएटनाममध्ये कम्युनिस्टविरोधी राजवटीने कम्युनिस्टांच्या चढाईपुढे शरणागती पत्करली व तेथे कम्युनिस्ट राजवट आली. पोर्तुगालमध्ये वर्षापूर्वी घटनासमितीसाठी निवडणुका झाल्या. दोन्ही देशांत एकाच दिवशी निवडणुका झाल्या हे खरे पण साम्य तेथेच संपते. व्हिएटनाममध्ये कम्युनिस्ट पद्धतीच्या निवडणुका होत्या. तेथे निवडणुकी व कम्युनिस्टांशिवाय दुसरा पक्ष नव्हता. पोर्तुगालमध्ये पाश्चात्य लोकशाही पद्धतीच्या निवडणुका झाल्या. अनेक पक्ष या निवडणुकांत उतरले होते.

व्हिएटनामच्या निवडणुका एका दृष्टीने अधिक महत्त्वाच्या. कारण या निवडणुकातून फाळणी रद्द होऊन संयुक्त व्हिएटनामची निर्मिती होत आहे. आशियातील राजकारणावर दूरगामी परिणाम करणारी ही घटना आहे. आशियात चीनच्या जोडीला व्हिएटनाम ही दुसरी प्रबळ सत्ता निर्माण होत आहे. व्हिएटनामला रशियाची मदत मोठ्या प्रमाणावर आहे. तेव्हा व्हिएटनाममार्फत चीनला शह देण्याचा आणि आशियाच्या राजकारणावर आपला प्रभाव पाडण्याचा रशियाचा प्रयत्न राहील. तसेच व्हिएटनाम, लाओस आणि कंबोडिआ यांचे एक संघराज्य स्थापून पूर्वी फ्रेंच-इंडोचायना म्हणून ओळखला जाणारा सर्व प्रदेश हॅनोईच्या नियंत्रणाखाली आणावा अशीही व्हिएटनामी कम्युनिस्टांची आकांक्षा असण्याची शक्यता आहे. जपान्यांशी संघर्ष, फ्रेंचांशी संघर्ष, अमेरिकेशी संघर्ष, हे व्हिएटनामी युद्धाचे तीन टप्पे. त्यातील तिसरा टप्पा तीन वर्षांपूर्वी पॅरिस कराराने संपला. अमेरिकेने आपले सर्व सैनिक काढून घेतले. त्यानंतर दोन वर्षांत कम्युनिस्टांनी चढाई करून दक्षिण व्हिएटनाम त्यांच्या नियंत्रणाखाली आणला. सबंध व्हिएटनाम याप्रमाणे कम्युनिस्ट नियंत्रणाखाली आल्यानंतर एकीकरणाचा मार्ग सुकर झाला व एक वर्षातच संयुक्त विधानसभेसाठी निवडणुका झाल्या. आता या एकीकरणाचा सर्व तपशील नवी विधानसभा ठरवील. त्यात काही अडचणी येतील असे दिसत नाही.

व्हिएटनामच्या भवितव्याच्या दृष्टीने दोन प्रश्न महत्त्वाचे आहेत. एक म्हणजे लाओस व कंबोडिआ व्हिएटनामी संघराज्यांत सामील होण्यास तयार होतील का? छोटी असली तरी ही स्वतंत्र राज्ये आहेत. त्यांना स्वतःचा वेगळा इतिहास व परंपरा आहे, अस्मिता आहे. संघराज्यामध्ये व्हिएटनामचे वर्चस्व प्रस्थापित होणार असेल तर, लाओस व कंबोडिआ ते मान्य करणार नाहीत. या तिन्ही प्रदेशांत कम्युनिस्टांची सत्ता असली तरी, कम्युनिस्ट चळवळीलाही राष्ट्रवादाचा पगडा दूर सारता आलेला नाही. युगोस्लाव्हिया रशिया, चीन-रशिया, पूर्वयुरोप-रशिया यांच्यातील संघर्ष त्यांतूनच निर्माण झाले असून प्रत्येक कम्युनिस्ट राष्ट्र, रशिया-चीन या बड्या कम्युनिस्ट देशांच्या प्रभावातून मुक्त होऊन जास्तीत जास्त स्वायत्तता मिळविण्याचा प्रयत्न करीत आहे. व्हिएटनाम,

लाओस आणि कंबोडिआ हे देशही याबाबतीत अपवाद मानण्याचे कारण नाही.

दुसरा महत्त्वाचा प्रश्न रशिया-चीनशी व्हिएटनामचे संबंध काय राहणार? चीनपेक्षा रशियाचीच मदत व्हिएटनामला अधिक होत असून सध्या तरी व्हिएटनामी नेत्यांचे धोरण रशियाकडेच अधिक झुकलेले आहे. कंबोडिआचे प्रिन्स सिहनुक चीनमध्ये असतानाच पदच्युत झाले होते. त्यांना चीनने आसरा दिला. त्यांच्यामार्फत इंडोचायनातील कम्युनिस्ट चळवळीवर आपणास दबाव आणता येईल असा चीनी नेत्यांचा आडाखा होता. पण काही दिवसांपूर्वी प्रिन्स सिहनुक यांना निवृत्त करण्यात आल्याने ती शक्यता आता राहिलेली नाही. रशियाची मदत घेतली तरी, रशियाचे वर्चस्व व्हिएटनामी नेते मान्य करणार नाहीत. मिळेल तेथून मदत घ्यावयाची पण कोणाचेही वर्चस्व न मानता स्वतंत्र धोरणाने देशाची प्रगती करावयाची ही हो-चि-मिन्हपासूनची परंपरा सध्याचे नेतेही चालू ठेवतील असे दिसते.


या आनंदयात्रेत जे पाहिलं त्याची ओझरती टिपणं म्हणजे हा लेखसंग्रह. रूढ अर्थानं ही प्रवासवर्णनं नाहीत. माणसं, त्यांची गुदमरलेली आणि फुललेली प्रवाही मनं, अखंड पालवणारं ऋतुचक्र आणि वज्रलेप नियती ह्यांच्या नातेसंबंधांची गुंफण माझ्या नजरेत कशी झाली, त्याचा हा विलक्षण घाईगर्दीत उरकलेला आलेख.

**आनंदाच्या दाही दिशा**

**रवींद्र पिंगे**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

**किंमत : दहा रुपये**


पोर्तुगालमध्ये नवी घटना अंमलात येऊन नॅशनल असेंब्लीसाठी निवडणुका झाल्या. वर्षापूर्वी घटनासमितीसाठी निवडणुका झाल्या होत्या. या एक वर्षात राजकीय पक्षांच्या बळात काय फरक पडला हे अजमावण्याच्या दृष्टीने या निवडणुकांना महत्त्व होते. पहिली निदर्शनास येणारी गोष्ट म्हणजे, एकाही पक्षास निर्विवाद बहुमत मिळू शकले नाही. वर्षापूर्वीच्या निवडणुकांतही असेच घडले होते. समाजवादी पक्ष दोन्ही निवडणुकांत पहिल्या क्रमांकाचा पक्ष म्हणून निवडून आला पण त्याच्या मतांचे प्रमाण घटून ३८ टक्क्यांवरून ३५·१८ टक्क्यांपर्यंत खाली आले. त्यांच्या जागांची संख्या मात्र ७४ वरून १०६ पर्यंत वाढली. कम्युनिस्टांची मते १२·८९ टक्क्यांवरून १४·७२ टक्क्यांपर्यंत वाढली म्हणजे जवळजवळ दोन टक्के वाढ झाली. त्यांच्या जागाही २२ वरून ४० पर्यंत वाढल्या, पण चौथ्या क्रमांकाचा पक्ष हे त्यांचे स्थान काही बदलले नाही. पॉप्युलर डेमोक्रॅट्स् आणि सेंटर डेमोक्रॅटस् या दोन्ही उजव्या गटांच्या पक्षांना कम्युनिस्टांपेक्षा जागा व मते अधिक मिळाली. पॉप्युलर डेमोक्रॅटस् पक्षाची मते २५·८५ वरून २३ टक्क्यांपर्यंत घटली पण त्याच्या जागा मात्र ४५ वरून ७१ पर्यंत वाढल्या. सेंटर डेमोक्रॅटस् पक्षाला गेल्या वर्षी ७ जागा व ७·५० टक्के मते मिळाली होती. यावेळी जागा ४१ पर्यंत वाढल्या व मतेही १५ टक्के म्हणजे दुपटीने वाढली. उजव्या गटांचे बळ याप्रमाणे वाढत असल्याचे दिसले तरी, निर्णायक बहुमत मिळविण्याइतके ते वाढलेले नाही.तसेच दुसऱ्या कोणत्याच पक्षाचा पाठिंबा नसल्याने हे दोन पक्ष एकत्र आले तरी, ते सरकार बनवू शकत नाहीत. आम्ही कम्युनिस्टांच्याबरोबर संयुक्त मंत्रिमंडळ बनविणार नाही. फक्त स्वतःच्या पक्षाचे सरकार बनविण्याची आमची तयारी आहे. कम्युनिस्टांनी वाटल्यास त्याला बाहेरून पाठिंबा द्यावा अशी आपली भूमिका समाजवादी पक्षाचे नेते सोरेस यांनी स्पष्ट केली आहे. कम्युनिस्ट पाठिंबा देण्यास तयार नाहीत. अशा स्थितीत समाजवाद्यांचे सरकार अधिकारावर येण्याची शक्यता नाही. निवडणुकानंतरही अस्थिरता कायम राहणार असा याचा अर्थ आहे.


चलनवाढ, बेकारीत वाढ, अंगोलामधून आलेल्या निर्वासितांचे पुनर्वसन हे मोठे प्रश्न पोर्तुगालला सोडवावयाचे आहेत. चलनवाढ वर्षाला ७० टक्के या वेगाने वाढत आहे. बेकारीत १५ टक्के वाढ झाली आहे. प्रमुख उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले पण त्यांचे बस्तान अजून नीट न बसल्याने उत्पादनवाढीच्या दृष्टीने त्याचा फारसा उपयोग झालेला नाही. स्थिर सरकारच हे सारे प्रश्न परिणामकारकपणे सोडवू शकेल. पण स्थिर सरकारची तर शक्यता दिसत नाही. अशा स्थितीत लष्करी नेते पुनः सत्ता हाती घेण्याची शक्यता आहे. पोर्तुगालच्या घटनेबाबत लष्करी नेते व राजकीय पक्ष यांच्यात जी तडजोड झाली त्यानुसार अध्यक्षपद लष्करी नेत्याकडेच जाणार आहे. त्याचा फायदा घेऊन लष्कर आपली पकड वाढविण्याचा धोका आहे. लष्करातही डावे व उजवे असे दोन गट आहेत. सत्तेसाठी यांच्यातही संघर्ष होईल. हुकूमशाही गेली पण लोकशाही आणण्यासाठी दीर्घकाळाचा प्रवास पोर्तुगालला अजून करावा लागणार आहे असाच या घटनांचा अर्थ आहे. □

# ' स्टॅलिन कामात आहे

## तो तुला भेटायला आत बोलवील

## किंवा कदाचित तो बोलवणारही नाही

## तू थांबावंस,'' असं तो म्हणाला



अलेक्झांडर सोल्झेनित्सिनलिखित
' फर्स्ट सर्कल ' या कादंबरीतील
काही भाग (३)

पॉस्क्रिओबिशेवला, अलेक्झांडर ह्या त्याच्याच नावाने हाक मारण्याचीदेखील कोणाची प्राज्ञा नव्हती! ' पॉस्क्रिओबिशेवनं फोन केला ' याचाच अर्थ बॉसनंच त्याला फोन करायला फर्मावलं असाच होई. पंधरा वर्षांहूनही अधिक काळ अलेक्झांडर पॉस्क्रिओबिशेव स्टॅलिनच्या वैयक्तिक सचिवालयाचा प्रमुख म्हणून वावरत होता. तसं पाहिलं तर हा खूपच मोठा कालखंड म्हटला पाहिजे! पॉस्क्रिओबिशेवला पुरतं न ओळखणाऱ्याला असाच प्रश्न पडला असता की, एवढी वर्षे हा आपलं मस्तक धडावर तरी कसा काय राखू शकला? खरं तर यात गूढ असं काहीच नव्हतं. पेन्झाच्या ह्या सेवानिवृत्त पशुवैद्याचा पिंडच मुळी हरकाम्याचा होता आणि त्यामुळेच तो ह्या कामगिरीतसुद्धा इतका निर्विघ्न राहू शकला. तो लेफ्टनंट जनरल असो, केंद्रीय समितीचा सदस्य असो किंवा केंद्रीय समितीच्या सदस्यांवर 'लक्ष' ठेवण्यासाठी नेमलेल्या खास खात्याचा प्रमुख असो. अगदी कुठल्याही पदावर नेमला गेला असो, तरीही तो आपल्या बॉसशी मात्र नेहमीच नोकराच्या नात्यानं वागत असे. स्टॅलिनला आपल्या सहाव्या इंद्रियामुळे हे कधीच कळून चुकलं होतं की, पॉस्क्रिओबिशेवचं कुणाशी वैर असं नव्हतंच. म्हणूनच मग स्टॅलिनला त्याच्याबद्दल कधीच अविश्वास वाटत नसे. पण जरासा मंद दिसणाऱ्या आणि डोक्यावर टक्कल पडलेल्या ह्या दरबाऱ्याचा खालच्या लोकांशी संबंध येत असे तेव्हा मात्र तो एक फार महत्त्वाचा माणूस असे. आपल्याच कनिष्ठ सहकाऱ्यांशी बोलताना स्पष्ट आवाजात बोलायची तो तसदीसुद्धा घेत नसे! त्यामुळे मग पलीकडून ऐकणाराला रिसिव्हरमध्ये कान खूपसूनच त्याचे तुटक तुटक शब्द पकडावे लागत. फालतू गोष्टींवरच थट्टामस्करी करणं हे त्याच्याबाबतीत तसं कधी काळी तरी शक्य होई. पण 'आज तिथला रागरंग कसा काय आहे?' असं नुसतं विचारायलाही कोणी धजावत नसे. (खुद्द स्टॅलिनच्या स्वतःच्या मुलीलासुद्धा तिथल्या एकंदर वातावरणाबद्दल माहिती मिळवण्याला मना होती! तिनं फोन केला की, तिला येवढंच उत्तर मिळे, 'स्टॅलिन उठला आहे' किंवा 'तो अद्याप उठला नाही' आणि हेसुद्धा स्टॅलिनच्या पावलांच्या आवाजावरून ठरवलं जाई!)

आज पॉस्क्रिओबिशेव अबाकुमोव्हला म्हणाला,
' स्टॅलिन कामात आहे.
तो तुला भेटायला आत बोलवील,
किंवा कदाचित बोलावणारही नाही.
तू थांबावंस, ' असं तो म्हणाला.

पॉस्क्रिओबिशेवने अबाकुमोव्हची ब्रीफकेस उचलली आणि तो त्याला सरळ तिथल्या प्रतीक्षा-दालनात घेऊन गेला, आणि मग स्वतः मात्र लगेच दिसेनासा झाला. अबाकुमोव्हच्या अगदी जिभेवर प्रश्न आला होता,

'? आज बॉसचा मूड कोणता आहे ?'

पण तो प्रश्न विचारायचं धैर्यही त्याला झालं नाही. मग तो धड-धडत्या अंतःकरणानं त्या प्रतीक्षा-दालनात एकटाच बसून राहिला !

अबाकुमोव्हला नेहमीच त्या धिप्पाड, बलवान पण निश्चयी अशा स्टॅलिनच्या भेटीला जाताना विलक्षण भीती वाटत असे. ती भीती अचानकपणे मध्यरात्री छपरावर वाजणाऱ्या पावलांसारखीच असे. त्या भीतीनेच प्रथम त्याच्या कानाच्या पाळ्या बधीर पडत आणि मग लालबुंद होऊन जात. आणि मग असं झालं की, प्रत्येक वेळी तो याच कल्पनेनं आणखी घाबरून जाई की, ह्या लालबुंद कानांमुळे बॉसच्या मनात मात्र निष्कारण संशयाला जागा निर्माण होईल. स्टॅलिनला तर साध्यासुध्या गोष्टींचाही संशय येत असे. उदाहरणार्थ, त्याच्यासमोर जर कोणी, आपले हात नुसते आपल्याच आतल्या खिशात जरी खुपसले, तरी स्टॅलिनला ते सहन होत नसे आणि म्हणूनच अबाकुमोव्ह नेहमी त्याच्या भेटीला जाताना (नोट्स् काढताना वापरायची ! ) तिन्ही फाउन्टन पेन्ससुद्धा आतल्या खिशात न ठेवता मुद्दाम बाहेरच्याच खिशाला लावून ठेवी.

राज्य सुरक्षा मंत्रालयाचा रोजचा कारभार बेरीयाच पाहत असे. म्हणून अबाकुमोव्हला त्याचेच आदेश पाळावे लागत. पण सर्व सत्ताधीश बॉसला, स्टॅलिनला, मात्र महिन्यातून एकदा तरी आपण ज्यांच्यावर राज्याच्या संरक्षणाचा भार सोपवला आहे अशा व्यक्तींची भेट घ्यायला आवडत असे. अशा भेटी सुमारे तासभर चालत आणि त्यावेळीच अबाकुमोव्हला आपल्या सत्तेची आणि सामर्थ्याची पुरेपूर किमत मोजावी लागे. अशा दोन मुलाखतींच्या मधल्या काळातच तो आयुष्याचा आनंद उपभोगू शके. म्हणूनच आता त्याच्या अशा आणखी एका नव्या भेटीची वेळ येऊन ठेपल्यावर तो भयाकुल झाला. त्याचे कान बधीर झाले. मग त्यानं आपली ब्रीफकेस निमूटपणे पॉस्क्रिओविशेवकडे सुपूर्द केली. खरं तर ती ब्रीफकेसच परत त्याच्या हाती येणार की नाही हे जसं त्याला ठाऊक नव्हतं, तसंच स्टॅलिनच्या अभ्यासिकेबाहेर वाट पाहत असतानाच त्याचे डौलदार झुकलेले शीर पुढल्या तासाभरात त्याच्याच धडावर तरी राहणार की नाही, याचीही अबाकुमोव्हला शाश्वती नव्हती.

स्टॅलिनच्या बाबतीतलं भयानक सत्य हेच की, त्याच्याशी वागताना केलेली एखादी क्षुल्लक चूकदेखील, एखाद्या हँड्ग्रेनेडचा चुकीचा वापर करण्याइतकीच, भयानक ठरत असे. म्हणजेच ती चूक तुमच्या आयुष्यातली अखेरचीच चूक ठरत असे. स्टॅलिन कोणतीच सबब ऐकून घेत नसे आणि ह्यामुळेच त्याचे व्यक्तिमत्त्व विलक्षण भयानक ठरे. तसा प्रत्यक्ष तो तुम्हाला कधीच दोष देत नसे. पण अशा वेळी त्याच्या वाघासारख्या पिवळसर डोळ्यांत एक विलक्षण विखार चमकू लागे आणि त्याच्या खालच्या पापण्या अचानक आकुंचन पावत. त्याचा राग ओळखण्याच्या खुणा ह्या एवढ्याच होत्या. आणि मग आपल्या भक्ष्याला यत्किंचितही जाणीव होऊ न देता तो कधीच त्याची शिक्षा निश्चित करून टाकी. एखाद्याला तसंच राहू देण्यात येई किंवा त्याच रात्री त्याला अटक होई आणि सकाळपर्यंत त्याला गोळ्या घालून ठार मारण्यात येई.

सर्वात वाईट गोष्ट म्हणजे त्याची ती भयानक स्तब्धता ! आणि त्याच्या आकुंचन पावणाऱ्या पापण्या !—

एखाद्या टोकदार वस्तूनं जरी त्यानं तुम्हाला टोसलं किंवा तुमचं पाऊल मुद्दामच बुटाखाली चिरडलं किंवा तुमच्या अंगावर सरळ तो थुंकला, किंवा त्याच्या पाईपातली गरम राख त्यानं तुमच्या चेहऱ्यावर फुंकली—

म्हणजे मग तुम्ही निश्चित समजायचं की, स्टॅलिनचा राग हा तात्पुरता आहे आणि मग तो निघून जाईल ! स्टॅलिन अगदी शपथेवर जरी बोलला असता किंवा त्यानं तोंडावर शिवीगाळ जरी केली असती, तरी अबाकुमोव्हने मनातल्या मनात सुटकेचा निःश्वासच टाकला असता ! कारण याचा अर्थ असा होई की, अजूनही त्याला असं वाटतंय की, त्याच्या मंत्र्यांच्या चुका सुधारून घेता येतील आणि तो अजूनही स्टॅलिनच्या मर्जीत राहू शकेल ! अबाकुमोव्हला आता हेही कळून चुकलं होतं की, त्याच्या महत्त्वाकांक्षेनं त्याला किती दूरवर आणून सोडलं होतं. तसं खालच्या पातळीवरचं जीवन खरोखरच सुरक्षित होतं ! आणि स्टॅलिनसुद्धा फारसा संबंध नसलेल्या कनिष्ठांशी फारच चांगला वागत असे. पण एकदा का कोणी स्टॅलिनच्या निकटच्या वर्तुळात जाऊन पोहोचला की, मग त्याला परतीचा मार्गच उरत नसे.

भवितव्य एकच असे—मृत्यू ! स्वतःचा किंवा—

जेव्हा अबाकुमोव्ह स्टॅलिनपुढे उभा राही तेव्हा तो ह्याच भीतीने पछाडला जाई.

शिवाय आणखी एक कायमची भीती त्याच्यामागे असे ! आपण युद्धकाळात जर्मनीत कमावलेल्या पैशाची गोष्ट स्टॅलिनला जर कळली तर ! अबाकुमोव्ह ह्या एकाच भीतीच्या दडपणाखाली वावरत असे. युद्धकाळात 'स्मर्श'चा प्रमुख ह्या नात्यानं सर्व आघाड्यांवरची गुप्तहेरयंत्रणा अबाकुमोव्हच्याच हाती होती. त्या वैभवशाली कालखंडात कुठेही न अडकता स्वतःचं भलं करून घेणं लोकांना शक्य होत असे ! जर्मनीवर अखेरचा वार करताना आपलं सारं सामर्थ्य पणाला लावताना तर, स्टॅलिननं हिटलरचीच एक कल्पना अचूक उचलली आणि ती म्हणजे आघाडीवर लढणाऱ्या सैनिकांना भेटींची पार्सल्स घरी पाठवायची मुक्त परवानगी ! ह्या कल्पनेमागे स्टॅलिनची सैनिकी मनोभूमिकेबद्दल असणारी जीवन-दृष्टीच उभी होती ! म्हणजे तो जर त्यांच्या जागी लढत असता तर, त्याला काय वाटलं असतं वगैरे ! खरं तर आपल्या देशासाठी लढणं वगैरे सर्व ठीक आहे, किंवा स्टॅलिनसाठी लढणं आणखी चांगलं आहे, पण युद्धाच्या या अखेरच्या पण निरर्थक कालखंडात लढणाऱ्या सैनिकांनी आपले प्राण पणाला लावावेत म्हणून काही तरी उत्तेजनार्ह सवलत तरी द्यायला नको की काय ? आणि सैनिकांना युद्धातली लूट घरी पाठवायची परवानगी याहून अधिक प्रभावी सवलत तरी कुठली असणार ? सैनिकांना दहा पौंड, अधिकाऱ्यांना वीस, तर जनरल्सना शंभर शंभर पौंड वजनाइतक्या भेटी पाठवायची परवानगी होती आणि सीमेवरच्या गुप्तचरयंत्रणेची स्थिती तर जनरल्सहूनही चांगली होती. वास्तविक स्मर्शची यंत्रणा नेहमीच शत्रूच्या मारगिरीच्या क्षेत्राबाहेर असे. शिवाय त्यांच्यावर कधी बॉंबफेकही होत नसे. स्मर्शची यंत्रणा जशी बॉंबगोळ्यांच्या माऱ्यापासून जरा दूरवरच असे तशी ती अर्थखात्याच्या ऑडिटर्सचा उत्साहभंग करण्याइतकी आघाडीजवळही असे ! स्मर्शचा प्रत्येक

अधिकारी गुप्ततेच्या आवरणाखाली वावरत असे.

त्यांच्या मालवाहू गाड्यात काय आहे ?

त्यांच्या राखीव क्षेत्राबाहेर ते कोणतं सामान पाठवतात ?

किंवा सुरक्षा सैनिकांनी वेढलेल्या त्यांच्या इमारतीत मोठं काय आहे ?

ह्या गोष्टींचा शोध घेण्याचीही ताकद नव्हती ! थोडीफार जाणकारी असलेला एखादा साधा लेफ्टनंट हजारोंनी मिळवू शके ! कर्नलच्या हाती लाखांनी पैसा येई ! आणि अबाकुमोव्हसारख्याची लूट तर कोट्यवधीत मोजता येई !

आपण आपले पद गमावल्याची कल्पनादेखील अबाकुमोव्हला सहन होत नसे ! कारण तशा परिस्थितीत, त्याचं सारं सोनं देशाबाहेर स्वित्झर्लंडमध्ये जरी असलं, तरी तेव्हा त्याचा त्याला काडीमात्रही उपयोग झाला नसता. कारण एकदा जीव गमावल्यावर सोनंच काय, जगातली कुठलीच मौल्यवान गोष्ट त्याला त्याचं आयुष्य परत देऊ शकली नसती ! शिवाय आपण स्वतः कशालाही हात न लावता आपल्या इतर सर्व सहकाऱ्यांना अफाट पैसा मिळवताना नुसतं पाहणं हेही अबाकुमोव्हला अशक्यप्राय होतं ! म्हणून मग सैनिकांच्या तुकड्यांच्या तुकड्या लूटमारीवर पाठवल्या ! पण हे सारं त्याला बळानंच करावं लागलं !

पण दुर्दैवानं त्याला, त्याने स्वित्झर्लंडला साठवलेल्या त्या संपत्तीच्या साठ्याचं उपयुक्त अशा गोष्टीत रूपांतर करणं शक्य नव्हतं. आणि अबाकुमोव्हला सतत जाणवणाऱ्या भीतीचं मात्र ते एक कारण होऊन बसलं होतं. ज्यांना ज्यांना हे रहस्य ठाऊक होतं त्यांतल्या एकाचीही अबाकुमोव्हसारख्या जबरदस्त माणसाविरुद्ध तक्रार करण्याची प्राज्ञा जरी नव्हती, तरी अनपेक्षितपणे काहीही घडून सत्य उघड पडण्याची शक्यता मात्र फार मोठी होती. कारण ती सारी जायदाद असूनही जशी त्याच्या कामाची नव्हती तशी त्याला स्वतःच्या दुष्कृत्यांची कबुली दिल्याखेरीज त्यातून सुटकाही नव्हती !

अबाकुमोव्ह भल्या पहाटे अडीचला आला होता. आणि आता चार वाजत आले होते. त्यानं आपलं जाडजूड नोटपॅड हातात गच्च धरलं होतं, आणि गळाठल्यासारखाच तो त्या प्रतीक्षा–दालनात येरझारा घालत होता, कानशिलं तापू लागली. तो मनोमन इतकीच प्रार्थना करत होता की, आता स्टॅलिनला एवढं काम असावं की, त्याला आपली भेट घ्यायला सवडच असू नये ! अबाकुमोव्हला हीच भीती होती की, scrambler चं प्रकरण आपल्याला चांगलंच जड जाईल. आणि येऊ घातलेल्या प्रसंगातून आपण कसे काय बाहेर पडणार याचीही त्याला कल्पना नव्हती.

तेवढ्यात ते अवजड दार अर्धच उघडलं. हलक्या पावलांनी पॉस्क्रिओबिशेव आत आला आणि त्यानं अबाकुमोव्हला आत यायला खुणावलं. अबाकुमोव्ह आपली नेहमीची डौलदार चाल जरा बाजूला ठेवून आत आला. आत येताच तो म्हणाला,

'गुड इव्हिनिंग मार्शल !

मी आत येऊ काय ?'

पण सुरुवातीलाच त्याच्याकडून चूक झाली होती. आधीच आपला घसा न खाकरल्यानं ऐनवेळी त्याचे सारे शब्दच मुळी घोगरे आणि कठोर स्वरातच उमटले होते.

टेबलाशी बसून स्टॅलिन काही तरी लिहीत होता. तो पूर्ण सैनिकी गणवेशात होता. त्याच्या अंगरख्याची बटणं सोन्याची होती तशाच त्यावर असंख्य सन्मानफिती लावलेल्या होत्या. पदकं मात्र दिसत नव्हती. लिहायला घेतलेलं वाक्य स्टॅलिननं पुरं केलं. मग आपल्या घुबडासारख्या दुष्ट आणि भेदक नजरेनं अबाकुमोव्हकडे रोखून पाहिलं. तो गप्पच राहिला.

हे लक्षण काही चांगलं नव्हतं !

मग काहीही न बोलता त्यानं पुन्हा लिहायला सुरवात केली. अबाकुमोव्हनं दार आतून लावून घेतलं. पण ओळखच न मिळाल्यानं किंवा आत येण्याचा संकेतही न दिसल्यानं तो आणखी एकही पाऊल टाकायला धजावेना. किंचित पुढे झुकून तो दक्ष असा उभा राहिला तेव्हा त्याच्या गोबऱ्या गालावर एक आर्जवी स्मित चमकत होतं; शिवाय कानशिलंही तापू लागली होती.

अबाकुमोव्हनं बॉसची दिवसा वापरायची अधिकृत अभ्यासिका पाहिली होती. तशीच त्यानं त्याची ही काम करायची खोलीही पूर्वीच पाहिली होती. वरच्या मजल्यावरची दिवसा वापरायची अभ्यासिका जशी प्रशस्त आणि मोकळी होती तशाच तिच्या खिडक्याही अगदी साध्याच होत्या. तिथल्या प्रचंड शेल्फवर सोनेरी आवरणातल्या पुस्तकांच्या रांगांच्या रांगाच होत्या. त्या पाहिल्यावर सारे मानवी विचारच जणू तिथे संचलनासाठी उभे असल्याचा भास होई. 'नेत्याला' आवडणारीच चित्रं तिथल्या प्रशस्त भिंतीवर टांगलेली असत– आणि ती स्टॅलिनची स्वतःचीच छायाचित्रं असत !

एका चित्रात तो जनरलच्या हिवाळी पोशाखात दिसे, तर दुसऱ्यात तो मार्शलच्या उन्हाळी वेशात असे. तिथे सोफा होते, हातांच्या खुर्च्या होत्या तशाच अनेक साध्या खुर्च्याही मांडलेल्या होत्या. या साऱ्यांचा उपयोग परदेशी प्रतिनिधी मंडळांच्या स्वागतासाठी तसाच निरनिराळ्या परिषदांसाठी केला जात असे. इथेच स्टॅलिन आपले फोटोग्राफ्स् काढून घेत असे !

स्टॅलिनची रात्रीची अभ्यासिका मात्र तळमजल्यावर होती. तिथे कोणतीच चित्रंही नव्हती तशी सजावटही नव्हती. तिथल्या खिडक्या आकारानं लहान होत्या. तसेच चार लहानशी पुस्तकांची शेल्फच तेवढी भिंतींना लावून ठेवली होती. खोलीच्या मध्यावरच एक डेस्क होतं. पण ह्याशिवाय त्या खोलीत आणखी फक्त दोनच गोष्टी होत्या. एक कोपऱ्यातला रेडिओग्रॅम ! दुसरी म्हणजे त्याच्यासमोरच ठेवलेलं रेकॉर्ड रॅक ! रात्रीच्या वेळी स्टॅलिनला आपल्या भाषणांच्या रेकॉर्डस् ऐकायला आवडे.

आत येण्याची परवानगी मागणारा अबाकुमोव्ह तसाच थांबून होता. जरासा झुकलेलाच. पण स्टॅलिन मात्र एकाग्रतेनं लिहीत होता. आणि जेव्हा एखाद्याच्या लेखणीतून बाहेर पडलेला प्रत्येक शब्द इतिहास बनून जातो तेव्हा अशी एकाग्रता शोभूनच दिसते. भिंतीवरच्या दिव्यांचा प्रकाश थोडासाच होता. पण त्याच्या टेबलावरच्या टेबललॅम्पचा प्रकाशच तेवढा कागदावर अचूक पडला होता. अचानक स्टॅलिन लिहायचं थांबला. मागं रेलला. त्यानं आजूबाजूला पाहिलं, मग अबाकुमोव्हकडे बघितलं. जणू तो कशाची तरी चाहूल घेत होता. खोलीत मात्र निरव शांतता पसरली होती.

□ □

# मोफत



गो. नी. दांडेकर, ग. प्र. प्रधान,
श्रीराम लागू अशा विविध क्षेत्रांतील
नामवंतानी वाखाणलेली

**श्री. अनिल बर्वे यांची**
**नवी कोरी 'हिट' कादंबरी**
**' थँक यू मिस्टर ग्लाड '**
**(किं. रु. ८)**

## 'बॉम्बे बुक क्लब'चे सभासद होऊन आजच मोफत मिळवा

| तुम्ही द्या | आम्ही देऊ |
| --- | --- |
| रु. २ प्रवेश मूल्य + रु. १० पहिला हप्ता | 'थँक यू मिस्टर ग्लाड' पुस्तक (विनामूल्य) सभासद कार्ड, ६०० निवडक, विविध विषयांवरील पुस्तकांची सूची, 'पुस्तक-पंढरी' मासिक वर्षभर |
| रु. १० दरमहा ३ महिने | ६०० उत्तम पुस्तकांतून रु. ४० ची पुस्तके, घरपोंच |
| रु. १० दरमहा ४ महिने | रु. ४० ची पुस्तके घरपोंच |
| रु. १० दरमहा ४ महिने | रु. ५० ची पुस्तके घरपोंच अधिक एक भेट पुस्तक, पुढील वर्षाचे प्रवेश मूल्य माफ |

**म्हणजेच थोडक्यात** रु. १२० भरून रु. १६० चा लाभ होईल

[पुस्तकांची किंमत रु. १३० + २ भेट पुस्तके किमान रु. १० + पुस्तक पंढरी रु. ५ + पाठवणावळ सरासरी रु. १५ म्हणजेच एकूण रु १६०.]

इतर भेट पुस्तके : स्मृतिचित्रे लक्ष्मीबाई टिळक □ कल्याणी ज्योत्स्ना देवधर □ चक्र जयवंत दळवी □ नंदादीप सरोजिनी बाबर □ निवडक कोल्हटकर वि. स. खांडेकर □ काही भारतीय क्रिकेटपटू बाळ ज. पंडित

**३० जून १९७६ पर्यंत सभासद व्हा आणि प्रवेश फी वाचवा**

कार्यवाह, बॉम्बे बुक-क्लब, मुंबई ४०० ००४
मी बॉम्बे बुक-क्लबचा सभासद होऊ इच्छितो. प्रवेश फी रु. २ + पहिला हप्ता रु. १० पाठवीत आहे. 'थँक यू मिस्टर ग्लाड' भेट पुस्तक म्हणून पाठवावे
नाव ______________ पत्ता ______________
३० जून ७६ पर्यंत सभासद होणाऱ्यांस प्रवेश फी माफ.

**माझ्या घरी**
**माझी पुस्तके**

बॉम्बे बुक डेपो संचालित

## बॉम्बे बुक क्लब

२१७, राजा राममोहन मार्ग, मुंबई ४०० ००४

ओमेफ डिकून्हा/

# सोलकढी

## बरे, यालाही क्रिकेटच म्हणतात !

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यामधला चौथा आणि शेवटचा कसोटी क्रिकेट सामना वेस्ट इंडिजने जिंकला, आणि त्याचबरोबर मालिकासुद्धा खिशात टाकली. सामना सुरू होताना भारताला पुष्कळ आशा वाटत असली पाहिजे. कारण तिसरी कसोटी आपण मोठ्या ऐटीत जिंकली होती; आणि दुसऱ्यातसुद्धा वेस्ट इंडियनांचे गुठळी केस तर्रताठ केले होते. लॉईडला चौथा सामना गमावून चालण्यासारखे नव्हते. म्हणजे गमावला असता, तर लगेच त्याला काही अखेरचा सवाल झोंबला असता असे नाही. पण चष्म्याच्या काड्या तुटल्या असत्या हे कबूल. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेत नुकत्याच त्याचा फोडणी घालून चर्र पराभव झाला होता. चेंडू आणि फळी आणि खेळपट्ट्या घुसफुस करायला लागल्या होत्या. आपल्याला दोन्ही पाय उजवेच आहेत की काय, असे त्याला वाटायला लागले होते. तेव्हा ठुबऱ्या भारताला हरवून आपली उंची ठाकठीकायचा हिशेब त्याने केला. आणि इकडे तर चौथा सामना सुरू होताना बिशनसिंग बेदीने आपल्या पटक्याचा लस्सीच्या ग्लासाएवढा तुरा काढला होता.

त्या तुऱ्याचे लॉईडला कपटे करायचे होते. नाणेफेक जिंकून त्याने भारताला फलंदाजी दिली. त्याच्याजवळ भले चार वेगवान गोलंदाज होते. खेळपट्टी आवेगी गोलंदाजीला अनुकूल होती. सामना निर्णायक असल्यामुळे तब्बल सहा दिवस चालणार होता. पहिल्या दिवशी भारताने एकशेअड्डसष्ट धावा केल्या. पहिल्या, गावस्कर–गायकवाड जोडीनेच एकशेछत्तीस केल्या. गावस्कर बाद होऊन मोहिंदर अमरनाथ आला होता. दिवसअखेर ते दोघे नाबाद राहिले. भारताचे एकूण छान चालले होते. लॉईड नखे चावत होता. दुसऱ्या दिवशी गोलंदाजीला आवेग आला, दिशा आली, उद्दिष्ट आले. त्यांचा अपेक्षित परिणाम होऊन गायकवाड, विश्वनाथ, पटेल जखमी झाले आणि सहा गडी बाद तीनशेसहा धावांवर बेदीने डाव सोडला. वेस्ट इंडिजने पहिल्या बावात तीनशे एक्याण्णव धावा केल्या. दुसऱ्या डावात सत्याण्णव धावांत पाच गडी बाद झाल्यावर बेदीने डाव सोडला आणि विजयासाठी आवश्यक असलेल्या तेरा धावा बिनबाद फटकावून लॉईडने सामना जिंकला हो जिंकला.

आता लॉईडने योजलेल्या परिणामकारक उपायाबाबत सगळीकडे उसळ–घुसळती चर्चा चालू झाली आहे. बेदी आणि व्यवस्थापक उम्रीगर यांनी होल्डिंगच्या भिवव्या आणि मारक्या चेंडूफेकीचा निषेध केला आहे. भारतीयांना जलदगती गोलंदाजी खेळता येत नाही म्हणून ते भितात– जखमी होतात, असे म्हणून लॉईड– स्टॉलमेयर यांनी सगळे प्रकरण तुच्छ हसण्यावारी नेले आहे. भारताचे केंद्रीय उप शिक्षणमंत्री अरविंद नेताम यांनी, जलदगती गोलंदाजीला वाव देणाऱ्या खेळपट्ट्या तयार करायची सूचना भारतीय मंडळाला केली आहे ! क्रिकेटसमालोचक जॉन अॅरलॉट यांनी, बंपर्सना कायद्याने आळा घालायची वेळ आली आहे, असा इशारा दिला आहे... भारतीय संघाने जगभरच्या जलद गोलंदाजीला जमेल तसे तोंड दिले आहे. ते देता देता हव्वे तेवढे पराभव घरी बांधून आणले आहेत. क्वचित एखाद्या नरी कॉन्ट्रॅक्टरच्या कारकीर्दीचीही किंमत दिली आहे. तरी कधी प्रतिपक्षाच्या गोलंदाजीबद्दल एवढा आक्रोश झालेला मला आठवत नाही, त्यामुळे लॉईडने काहीतरी दांडगाई केली असावी, असे मानण्याकडे कल होतो.


मात्र त्याकरता येताजाता लॉईडचे गालगुच्चे घेणे मला पसंत नाही. कारण अगदी लॉईड झाला तरी तुमच्यामाझ्यासारखा डावाउजवा मनुष्यच की नाही ? त्याने त्याचे नाही पाहायचे तर कोणाचे पाहायचे ? तो काही मेणबत्ती घेऊन क्रिकेट खेळायला उतरलेला नाही. खिलाडूपणा वगैरे गोष्टी ठीक आहेत; पण त्या डोळ्यांना मुंग्या येत नाहीत तोपर्यंत. त्या आल्या की तुम्ही आम्ही सगळे लॉईड, क्रीडेत आणि कलेत काय हवे ते करायला खटपटतो. म्हणून लॉईडने, खेळपट्टीचा फायदा उठवत (हे फार महत्त्वाचे. कित्येकांना, खेळपट्टी आपल्या फायद्याची आहे उमजत नाही. काही तर असे जयसंतोष असतात की तोट्याची खेळपट्टी त्यांना फायद्याची वाटून राहते.) भारताचा पहिला डाव संपवला. (दुसरा डाव बेदीनेच संपवला.) त्या प्रक्रियेत भारताचे तीन खेळाडू जखमी होत्साते नाकामयाब झाले त्याला लॉईड काय करणार ? त्यांना रीतसर बाद करत तो बसता तर कदाचित सामना निसटला असता. तेव्हा त्याला पुरता बंदोबस्त करावाच लागला. दुबळा प्रतिपक्षसुद्धा कधी कधी अवघड जागी भलताच निर्णायक प्रहार करायला सिद्ध होतो. अशा वेळी त्याचे हात नीट कलम करून दूर टांगून ठेवणे बरे सोयीचे असते. दादा लॉईडने ते इतके चोख केले की, गायकवाड–विश्वनाथ–पटेलना संरक्षक कवचे चढवून खिंड लढवायची संधीच त्याने ठेवली नाही.

–स्वप्नाळू डोळ्यांनी क्रिकेटकडे पाहणारे बावळट बेंदूल म्हणतील :

तिसऱ्या कसोटीत, लॉईडने
पराजयाची किंमत देऊन
खिलाडूपणा मिळवला;
चौथ्या कसोटीत,
खिलाडूपणाची किंमत देऊन
विजय मिळवला.

रोखठोक चतुर माणसे फक्त जय-पराजयाची नोंद करतील : लॉईडने चौथा कसोटी सामना जिंकला; मालिका जिंकली, एवढेच म्हणतील. बरे, यालाही क्रिकेटच म्हणतात !

–अनंतराव



# लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी १९४८-४९

## पु. ल. इनामदार

### प्रकरण सहा : ‘ सामग्री ’चा तपास

जवळ जवळ तीस वर्षे केलेल्या माझ्या वकिलीच्या व्यवसायात मला बॉम्ब, बंदुकीच्या दारूगोळ्यांची हत्यारे यांच्याविषयी बरीच माहिती मिळाली, त्याबद्दलचे पुष्कळसे वाचायलाही मिळाले. त्यामुळेच कुणी खुनी माणसाने किंवा कटवाल्याने ‘ बॉम्ब फेकला ’ वगैरेसारखे स्वयंमन्य माहीतगारांचे बोलणे ऐकले म्हणजे मला हसू येते. दिल्ली येथील बिर्लाहाऊसमध्ये २० जानेवारी १९४८ ला आता प्रसिद्ध झालेल्या ‘ हे राम ’ प्रार्थना प्रांगणात महात्माजींच्या प्रार्थनासभेवर ‘ मदनलालने बॉम्ब फेकला ’ असे किंवा अशासारखे वर्णन वर्तमानपत्री लिखाणांमधून, पुस्तकांमधून, कॉंग्रेसी भाषणांमधून–फार कशाला, न्यायालयीन निर्णयामधूनही केलेले आपणास तेव्हापासून ऐकायला, वाचायला मिळाले आहे–आजतागायत मिळते आहे. परंतु त्या दिवशी संध्याकाळी मदनलाल पाहवाच्या हातून वास्तविक काय घडले होते ?

लालकिल्ल्यातील अभियोगातला माफीचा साक्षीदार बडगे, त्याच्याजवळच्या दारूगोळा हत्यारांच्या साठ्याला, ‘ सामग्री ’ (स्टफ) असे म्हणायचा. अशाच ‘ सामग्री ’मधून बडगेने मदनलाल पाहवाला एक ९ गुणे ४ गुणे २ इंच लांबीरुंदी जाडीची सुरुंगाची दारू भरलेली ॲसबेस्टॉसची वीट, तिला जोडलेल्या लांबलचक वातीच्या दोरीसहित अशी दिली होती. अशा ‘ विटां ’चा उपयोग सैन्यामध्ये इमारती, पूल, आदी पाडावयासाठी करतात. हा पोलादी तुकडा, खिळे, काचा यांनी भरलेला बॉम्बगोळा असतो. मदनलाल त्या वेळी साधारणपणे वीसएक वर्षांचा होता. मदनलालने अभियोगपर्वाच्या पहिल्याच दिवशी कोर्टाला प्रकटपणे सांगितले होते की, त्याचा कोणत्याही कटाशी काही संबंध नव्हता. नंतर मदनलालने एक लेखी निवेदनही दाखल केले की, ‘ त्याला बडगेने दिलेली सुरुंगाच्या दारूची वीट त्याने महात्माजींच्या प्रार्थनासभेच्या वेळी महात्माजींपासून व प्रार्थनासभेच्या कोणाही मंडळींपासून बऱ्याच दूर अंतरावर ठेवून तिचा स्फोट केला होता. ’ तो स्फोट त्याने प्रार्थनासभेच्या आवाराभोवती जी दोन किंवा तीन फूट उंचीची आवाराची भिंत होती, त्या भिंतीच्या बाहेरच्या बाजूस उघड्या जागेवर केला होता. त्याचा उद्देश महात्माजींच्या कानावर त्याचा आवाज जावा असा होता. कारण त्या दिवसांत महात्माजींभोवती मौलवी-मौलानांचा, हाजी-हाफिजजींचा, गराडा पडलेला असे. त्यातून महात्माजींजवळ पोहोचणे व महात्माजींना काही सांगणे कोणालाही शक्य नसे !

मदनलालने ‘ बॉम्ब उडविण्याची ’ क्रिया तरी काय केली होती ? महात्माजींची प्रार्थनासभा सुरू झाल्यावर मदनलालने ती सुरुंगाच्या दारूची लहानशी वीट आवाराच्या भिंतीच्या बाहेरच्या बाजूस उघड्या जागेवर भिंतीच्या शेजारी भिंतीला लागून ठेवून त्या विटेच्या वातीची लांब दोरी जमिनीवर ठेवीत दूर नेली होती. नंतर तेथे जवळपास कोणी चिटपाखरूदेखील नाही, असे पाहून मदनलालने वातीचे टोक आगकाडीने पेटवले नि स्वतः आणखी दूर सरकला व त्या जळत जाणाऱ्या वातीकडे पाहत व त्याची मजा वाटून कौतुकाने बघत–की केव्हा ती जळणारी ज्योत विटेपाशी पोचते नि मदनलालच्या शब्दांत त्या ॲटमबॉम्ब धमाक्याचा स्फोट कधी होतो, याची वाट तो श्वास रोखून पाहत होता ! ‘ धम्म्-थड ’ असा आवाज

करून 'खुनी इसमाच्या बॉम्बने' आपले काम चोखपणे केले होते. त्या धमाक्याने आवाराच्या भिंतीचा बाहेरील बाजूचा दगड-माती-चुन्याचा तीन-चार घनफूट भाग ढासळला होता आणि तो बाहेरच्या बाजूस फेकला गेला होता. पण त्यामुळे भिंतीमध्ये खिंडार पडले नव्हते का भिंतही जमीनदोस्त झाली नव्हती किंवा त्यामधून कोणाही, मनुष्याला आतल्या बाजूस जाणे शक्य नव्हते. त्या स्फोट झालेल्या ठिकाणाकडे कौतुकाने बघत असताना एका पोलिस जवानाने भिंती-वरून उडी मारून बाहेरच्या बाजूस येऊन मदनलालला तेथेच पकडले होते. मदनलालने कोर्टाला सांगितले होते की, पकडला जाताच, मदनलालने पकडणाऱ्या आरक्षी अधिकाऱ्याला म्हटले होते की, 'मला महात्माजींपाशी घेऊन चला. महात्माजींसमोर मला काही निवेदन करायचे आहे.' पण तेथे त्याचे कोणी ऐकले नाही व मदन-लालला महात्माजींजवळ कोणी नेले नाही!

पण मग थोड्याच वेळात दिल्लीच्या भारतीय आकाशवाणीने संध्याकाळच्या बातमी-पत्रकात व देशभरच्या सकाळच्या वर्तमान-पत्रांनी पानभर पसरलेल्या शीर्षकांच्या बातम्यांनी जगाला सांगितले होते की, 'महात्माजींच्या प्रार्थनासभेत बॉम्बचा स्फोट!' 'महात्मा गांधींच्या प्रार्थनासभेवर बॉम्बगोळ्याचा हल्ला. हेच वर्णन थोड्या-बहुत अधिक तपशीलाने अजूनही—घटनेनंतर सत्तावीस वर्षे झालीत तरी आपणास वाचावे, ऐकावे लागते. पण त्याच्या खोटेपणाविषयी कोणी काही चकार शब्द काढीत नाही.

धमाक्याच्या स्फोटाने झालेला 'धम्म' आवाज ऐकत व त्यामुळे तुटून पडत असलेल्या चुना-माती-विटांकडे व हवेत तरंगणाऱ्या धुरा-कडे कौतुकाने बघत उभ्या असलेल्या मदनलालला घटनास्थळीच धरले होते. आपण पकडले जाऊ नये म्हणून मदनलालने पळून जाण्याचा प्रयत्नही केला नव्हता. एखाद्या धीट मुलाच्या तोऱ्यात तो तेथेच उभा राहिला होता. त्यावेळी मदनलालला नथूराम गोडसे किंवा नारायण आपटे यांचे किंवा दारूगोळा बाळगणाऱ्या दाढीवाल्या माणसाचे नावदेखील ठाऊक नव्हते! मदनलालला ही नावे त्यावेळी माहीत असती, तर चौकशी अधिकाऱ्यांचे हातपाय काय पेंढा भरलेले नि कागदाची नखे लावलेले होते, की ज्यामुळे मदनलाल पुरे दहा दिवस त्यांच्यापाशी कैदेच्या कोठडीत असूनदेखील त्याच्याकडून कट-वाल्यांची नावे पोलिसांना वदवून घेता येऊ नयेत? तरी पण मदन-लालसारख्या जेमतेम वीस वर्षांच्या कोवळ्या तरुणाला महात्माजींच्या खुनाच्या कटाला प्रोत्साहन दिल्याच्या आरोपामध्ये जन्मठेप तुरुंग-वासाची शिक्षा देण्यात आली! आणि या शिक्षेला कोणत्या पुरा-व्याचा आधार तर टॅक्सीचालक नि खानावळ चालविणारे वाढपी आणि मालक यांच्या ओळखींचा व त्यात भर एका गृहमंत्री, प्राध्या-पक व 'कुणीतरी'पैकी माणसांच्या—त्रयींचा! महाभारत व्हायचे ते घडून गेल्यावर त्याची आम्हाला माहिती होती म्हणून दावा करणाऱ्या संजयबहादुरांच्या जबान्यांची! या संजयबहाद्दरांना कोर्टात आल्या-वरदेखील संगतवार हे सांगता आले नाही की, कोणी कोणाला नि केव्हा ही माहिती दिली व माहिती मिळाली असे मानले तरी-देखील हे संजयबहाद्दर १७ जानेवारीपासून ते ३० जानेवारीच्या संध्याकाळपर्यंत महात्मा गांधींच्या खुनाच्या कटाची माहिती मिळून-देखील मूग गिळून गप्प का बसले? आपल्याला मिळालेल्या अनु-संधेय—कॉग्निझेबल—अपराधाची वार्ता पोलिसठाण्यात रीतसर का लिहविली नाही? या पुराव्यावर न्यायालयांनी भरवसा केला याला एक महत्त्वाचे कारण हेही होते की, दिल्लीला विशेष आज्ञेने लागू केलेल्या मुंबई सार्वजनिक सुरक्षा कायद्याच्या दिवसांत दिल्ली येथील लालकिल्ल्यात महात्मा गांधी खून खटल्यामध्ये बचावपक्षाचा साक्षीदार म्हणून कोर्टासमोर येऊन उभे राहण्याची कोणाची हिंमत होती? अभियुक्त मदनलालने बचावपुरावा दिला नव्हता—देणे शक्यच नव्हते.

बचावाचा पुरावा देण्याचा विचार करायला मदनलाल होता कोण नि म्हणत तरी काय होता? अज्ञान वयातच पश्चिम पाकि-स्तानातून निर्घृणपणे निर्वासित झालेला कोवळा तरुण, आपल्या आई-वडिलांपासून देखील दुरावलेला. भारतभूमीवर आल्यानंतर त्याला भोगाव्या लागणाऱ्या निर्वासिताच्या खडतर जीवनातील हालअपेष्टांपासून सुटका मिळवायला त्याने जसा स्वतःच्या दुपारच्या भ्रांतीसाठी पुस्तके, फळे विकण्याचा व्यवसाय हाताळला, तसेच आपल्या निर्वासित सहभाग्यांसाठी निदर्शने करण्याचे राजकारणी नेत्याचे प्रयोगही हाताळले. स्वतः एक अज्ञान मुलगा असतानापासूनच. निदर्शनातल्या प्रयोगांपैकी, जसे घसा खरवडून ओरडायचे हा एक प्रकार तसे फटाके-धमाक्यांचे धुमधडाम आवाज करून अधिकाऱ्यांचे लक्ष वेधायचे हेही तो शिकला होता. त्यावेळी निर्वासितांचे पतित-पावन महात्माजी यांच्यासमोर जाऊन आपले गाऱ्हाणे मांडायची कल्पना उराशी घेऊन तो दिल्लीला आला होता व बडग्याने दिलेला धुमधडाकेबाज फटाका घेऊन बिर्लाहाऊसच्या प्रार्थनासभेत २० जानेवारी ४८ ला संध्याकाळी पोचला होता. तेथे वर वर्णन केल्या-प्रमाणे 'बॉम्ब उडवला' असे तेवढे सिद्ध झाले. मदनलालचे हेतू सिद्ध करायला कोणी कोर्टासमोर येऊ शकले नव्हते! कीर्ती नि सत्ता मिळविण्यासाठी हपापलेल्या भारतीय नेत्यांचे भरतभूमीच्या विभाजनाबाबतचे पडखाऊ तर्कट त्या कोवळ्या तरुणाला समजले नव्हते नि निर्वासितांच्या हालअपेष्टांनी गांजून गेलेल्या व आई-बाप असून पोरक्या झालेल्या निराश जीवाने धडाकेबाज निदर्शनाचे राज-कारणी हत्यार पाजळण्याचा मूर्खपणा केला होता हे खरे! पण म्हणून मदनलाल हा 'खुनी किंवा खुनाला प्रोत्साहन देणारा कट-वाला' होता का?

भोवतालच्या परिस्थितीने न्यायदेवतेच्या मंदिरातदेखील सत्याचा गळा दाबला जाण्याची वेळ येते असे मी म्हणतो. पण त्यामुळेच अजूनसुद्धा स्वार्थी उत्साहाने गांधीवादी, गांधीप्रेमी जनता 'मदन-लालने महात्माजींच्या प्रार्थनासभेत बॉम्ब उडवला—फेकला' असेच म्हणत आहे! ☐

## पिस्तुल

गांधीजींसारख्या जगद्वंद्य महात्म्यावर तीन गोळ्या झाडण्याचा दुर्लौकिक लाभलेल्या पिस्तुलाची कहाणी सांगताना सुरुवातीसच इसवी सन १९४८ मध्ये व त्यापूर्वी ग्वाल्हेर शहर व ग्वाल्हेर संस्थानचे उत्तरी जिल्हे यांमध्ये कशी परिस्थिती होती याविषयी

थोडी माहिती सांगणे उचित होईल.

मे १९४८ पर्यंत ग्वाल्हेर संस्थानचा 'सूबा' महादजी शिंद्यांनी पाया घातलेल्या शिंदे घराण्याच्या वर्चस्वाखाली होता. शिंदे घराण्याचे या प्रदेशावरील अधिकार २८ मे १९४८ रोजी ग्वाल्हेर संस्थान 'ग्वाल्हेर, इंदोर व माळवा प्रदेशांतील इतर मध्यभारतीय संस्थानांचा एक संघ' निर्माण झाल्याने समाप्त झाले. तरीपण प्रत्यक्षात ग्वाल्हेर संस्थानच्या अधिकारीवर्गाचेच शासन चालत राहिले होते. ग्वाल्हेर संस्थानचे कायदेकानूनच प्रभावशील होते. जानेवारी १९४८ मध्ये ग्वाल्हेरच्या शिंदे घराण्याचेच राज्य चालू होते. ग्वाल्हेरमध्ये संस्थानचे जे निरनिराळे कायदेकानून होते त्यामध्ये एक ग्वाल्हेर आर्म्स अॅक्ट नावाचा कायदा होता. या कायद्याप्रमाणे नागरिकांना दारूगोळा व बंदुकीच्या दारूची हत्यारे बाळगण्याला परवाने घ्यावे लागत. पण या नियमाचे पालन ब्रिटिश अमलाखालील प्रदेशात जितक्या कसोशीने करावे लागे तसे ग्वाल्हेर संस्थानमध्ये नसे. याला कारणे दोन. पहिले म्हणजे ग्वाल्हेर संस्थानचे जवळजवळ ८००० ची संख्या असलेले सैन्य होते. त्यामध्ये अद्ययावत शस्त्रधारी, घोडदळ, पायदळ व तोफखाना इत्यादी सर्व पथके होती. याशिवाय संस्थानच्या मांडलिक जहागीरदारांची बंदूकधारी पथके मानमरातबाच्या श्रेणीप्रमाणे वेगळी असत. या सर्वांच्या शस्त्र-संभाराची देवघेव दुरुस्ती करणारे कारीगर, शिकलगर ग्वाल्हेर शहरात कितीतरी होते. दुसरे कारण म्हणजे ग्वाल्हेर संस्थानची उत्तरी सीमा म्हणजे चंबळ नदीचे खोरे. या खोऱ्याचा प्रदेश उत्तरेस धोलपूर, कोटा, भरतपूर वगैरे राजस्थानी संस्थाने व ग्वाल्हेर शहरापासून सत्तर मैल अंतरावर असलेली आग्रा छावणी व दक्षिणेस ग्वाल्हेर शहरापासून केवळ ५०–६० मैल दूर असलेली झाशी जिल्ह्यातली बबीना छावणी यांनी वेढलेला प्रदेश होता. चंबळ नदीचे खोरे मातीच्या पर्वतप्राय ढिगाऱ्यांच्या कडे-कपारी असलेले व बुंदेल-खंडातल्या जंगलांनी भरलेले होते. या प्रदेशांच्या आश्रयाला राहून आपला लूटमारीचा व्यवसाय करणाऱ्या डाकू-मंडळींचे हे वास्तव्याचे ठिकाण होते. या डाकूंना हवी असलेली शस्त्रे–बंदुका, पिस्तुले आदी ब्रिटिश व संस्थानी सैन्य-छावणीं यांच्या कृपेने मुबलक प्रमाणात मिळत. डाकूंना शस्त्रे मिळवून देण्याचाच उद्योग करणारे दलाल ग्वाल्हेर शहरात पुष्कळ होते. तात्पर्य एवढेच की, शस्त्रविक्रीच्या या चोरदलाली-व्यवहारामुळे ग्वाल्हेर शहरात पिस्तुलेच काय पण अद्ययावत बंदुकी, स्टेनगन, मशीनगनसारखी हत्यारेही मिळवायला अडचण पडत नसे. डाकूंच्या विरुद्ध संरक्षण हवे म्हणून ग्रामीण जनता, जमीनदार वगैरे मंडळींना शस्त्रे बाळगायला परवाने देण्याचे शासनाचे धोरणही ढिलाईचेच होते. ब्रिटिश साम्राज्य सत्तेविरुद्ध बंड करणाऱ्या भारतीय क्रांतिकारकांनीदेखील आपली शस्त्रास्त्रे याच ग्वाल्हेरच्या बाजारात मिळवल्याची उदाहरणे सर्वश्रुत होती.

दिल्लीच्या लाल किल्ल्यात चाललेल्या महात्मा गांधी खूनखटल्या-मध्ये अभियोगपक्षाच्या कहाणीप्रमाणे २० जानेवारीपर्यंत गांधीजींच्या मारेकरी नथूरामला शस्त्रसाहाय्य करणारा माफीचा साक्षीदार बडगे होता. पण पुराव्यामध्ये बडगेजवळ असलेल्या थोडयाशा 'सामग्री'-शिवाय मदनलालने स्फोट केलेली सुरुंगाच्या दारूची 'वीट' व मदनलालच्या कोटाच्या खिशात एक हातगोळा सापडल्याचे सांगण्यात आले. याला पुरावा फक्त बडग्याची साक्ष. दुसरे काही हत्यार इतर कुणाजवळही सापडले नाही. अभियोगपक्षाचीच कहाणी अशी की, २५ जानेवारीनंतर नथूराम व आपटे दिल्लीला आले व तेथून २८ जानेवारीला अचानक ग्वाल्हेरला आले व तेथे नथूरामने फरारी अभियुक्त गंगाधर दंडवतेच्या मदतीने 'बाजारा'मध्ये एक पिस्तूल मिळविले. हे पिस्तूल इटालिअन बनावटीचे परदेशी 'बरेटा' नावाने ओळखले जाणारे स्वयंचलित–अॅटोमॅटिक–सहा बाराचे पिस्तूल होते. हे पिस्तूल घ्यायला नथूरामने गंगाधर दंडवतेला पैसे दिले व नथू-रामला पिस्तूल गंगाधर दंडवतेने आणून दिले, ह्या अभियोगपक्षाच्या कहाणीला सिद्ध करणारी मौखिक साक्ष कुणाचीही नव्हती. हे पिस्तूल त्यावर क्रमांक असलेले, गहिऱ्या कथ्थई रंगाचे, चार चौरस इंच लांबी-रुंदीचे सुंदर बनावटीचे हत्यार होते. हाताच्या तळव्यात सहज मावेल असे होते व तळव्यात धरून अंगठ्याने खटका काढून तर्जनीने पिस्तुलाचा घोडा–ट्रिगर–दाबताच हव्या तितक्या–सहापर्यंत–गोळ्या मारणारे हे पिस्तूल होते. हव्या तितक्या गोळ्या मारून तर्जनी सैल सोडताच गोळ्या सुटणे बंद होई. या पिस्तुलाच्या खरेदीबाबत कोर्टासमोर नथूरामने एवढेच म्हटले की, याबाबत दिलेला अभियोग-पक्षाचा पुरावा खोटा आहे!

हा पुरावा होता, ग्वाल्हेरच्या जगदीश गोयल नावाच्या २४ वर्षे वयाच्या वैश्य तरुणाचा. जेमतेम मॅट्रिकपर्यंत शिकलेल्या, साधारण स्थितीतल्या, अस्थायी कार्यालयात क्लार्कची नोकरी करणाऱ्या ह्या वैश्य तरुणाजवळ हे परदेशी पिस्तूल कोठून आले याबद्दल जगदीशने स्वत: काही सांगितले नव्हते. कूटपरीक्षणामध्ये मीही काही जाणूनबूजून विचारले नव्हते. अभियोगपक्षाने आम्हा बचावपक्षाच्या वकिलांना त्यांच्या पुराव्याचा जो सारांश दिला होता त्यावरून माझी कल्पना ही होती की, आता पुढे साक्षीला नाथीलाल जैन नावाचा दुसरा वैश्य माणूस येणार आहेच. तेव्हा जगदीशला मी एवढेच विचारून उत्तर काढून घेतले होते की, त्याच्याजवळ हे पिस्तूल, त्याचे आहे असे सांगणारा, काही लेखी पुरावा–परवाना वगैरे नाही व हे पिस्तूल त्याने लपवून बाळगले होते. नाथीलाल जैनविषयी मी जी माहिती गोळा केली होती त्यामध्ये मला कळले होते की, हा नाथीलाल ग्वाल्हेरच्या त्यावेळच्या एका कांग्रेसी मिनिस्टरांचा मेहुणा आहे. नाथीलालच्या जोडीला ग्वाल्हेरचे कांग्रेसचे गृहमंत्री यांचे नाव साक्षीदारांच्या यादीत होतेच. जगदीश गोयलला मारेकरी पिस्तुलाच्या मालकीबद्दल आणखी काही प्रश्न न विचारण्याचे माझे हे कारण होते. पण त्या नाथीलाल जैन आणि कांग्रेसी गृहमंत्री ग्वाल्हेरकर यांना अभियोगपक्षाने साक्षीत आणलेच नाही. अगदी लाल किल्ल्यात ते आले असतानादेखील आणले नाही. त्याला मी काय करणार? एवढेच काय? जगदीश गोयलची साक्ष संपल्यानंतर २–३ दिवसांतच एके दिवशी संध्याकाळी हिंदुमहासभाभवनात नाथीलाल जैन नाव सांगणारा एक तरुण भीत भीत माझ्याकडे आला व डोळ्यांत पाणी आणून व अंगावर उठलेले वळ दाखवीत त्याने मला म्हटले की, 'मजजवळ खायलाप्यायला, काही विकत घ्यायला पैसा नाही, ग्वाल्हेरला परत जायला पैसा नाही, काही मदत करा. थोडे पोटाची भूक शमविण्यापुरते खाईन नि ग्वाल्हेरला परत जाईन.' मी त्याला जवळ असलेले पैसे दिले नि तो नाथीलाल जैन निघून गेला. त्या

अंधाऱ्या संध्याकाळी मला दिसलेला नाथीलाल जैनचा केविलवाणा चेहरा आता मला आठवला की मनात येते, मी कुणाला मदत केली होती? पोलिसांच्या चौकशी अधिकाऱ्यांच्या तथाकथित छळाने कळवळणाऱ्या दीनवाण्या मनुष्याला, की महात्मा गांधींची हत्या करणारे पिस्तूल बाजारात विकायला आणलेल्या चोरट्या तस्कराला? मला अजून याचे उत्तर सापडले नाही.

पण त्या ऐतिहासिक पिस्तुलाची माझी कहाणी अजून संपली नाही. महात्मा गांधींच्या हत्त्येच्या अभियोगपर्वकाळात लाल किल्ल्यातील कोर्टात मी जगदीश गोयलचे कूटपरीक्षण केले. त्याच्या प्रश्नोत्तरांचा बराच प्रदीर्घ वृत्तान्त दुसऱ्याच दिवशी वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाला. त्यानंतरच्या एका साप्ताहिक सुटीमध्ये मी ग्वाल्हेरला गेलो असता, तेथे ग्वाल्हेरचे, दुधाची डेअरी चालवणारे, एक प्रतिष्ठित गृहस्थ भेटले. हे ग्वाल्हेर-महाराजांचे विश्वासपात्र दरबारी; पण ग्वाल्हेर राज्य २४ जानेवारीला काँग्रेसी मिनिस्टरांच्या हाती येताच काँग्रेसी बनलेले! मला भेटताच त्यांनी मला हटकले नि म्हटले, 'वकीलसाहब! आपने जगदीशको उस पिस्तौलका असली मालिक कौन है यह सवाल क्यू नहीं पूछा?' असे म्हणून ते माझ्याकडे हसत नि डोळे मिचकावून बघत पुढे म्हणाले, 'हम जानते है! आपने यह सवाल न पूछकर असली मालिकसे काफी रकम ऐंठ ले होगी!' हे म्हणून ते निघून गेले. त्यांनी अशा रीतीने माझ्याविरुद्ध हेच ध्वनित केले होते की, मी लाल किल्ल्यामध्ये डॉ. परचुऱ्यांची वकिली करायला गेलो नव्हतो, परंतु ग्वाल्हेरच्या कोणा अतिशय श्रीमंत हिंदुसभाई सरदाराची वकिली करायला गेलो होतो! वकिलाची यापेक्षा जास्त बदनामी आणखी कोणती?

खरे म्हणजे जेव्हा मला पहिल्यांदा हे कळले की, डॉ. परचुऱ्यांचे पिस्तूल पोलिसांनी ताब्यात घेतले आहे नि ते पिस्तूलदेखील नथूरामने वापरलेल्या पिस्तुलासारखेच बरेटा पिस्तूल आहे, तेव्हापासून मला काळजी लागली होती की, नथूरामजवळ मिळालेल्या पिस्तुलाचा पंचनामा केव्हा बघेन. डॉक्टरांचे पिस्तूल ताब्यात घेऊन पोलिस त्याचा काय उपयोग करतील ते काय सांगावे? पुढे दिल्लीला लाल किल्ल्यातील कोर्टात जाताच डॉ. परचुऱ्यांनी मला जी हकीगत सांगितली त्यामुळे तर पिस्तुलाबाबतची माझी भीती अधिकच वाढली होती. म्हणून अभियोगपक्षाचे कागदपत्र कोर्टात दाखल होताच नथूरामजवळून ३० जानेवारीला ताब्यात घेतलेल्या पिस्तुलाचा नंबर डॉक्टरांच्या पिस्तुलाच्या नंबराशी पडताळून पाहण्यात मी उशीर केला नाही. तो पोलिसांचा पंचनामा बघूनच मला हायसे वाटले. पोलिसांनी दाखल केलेल्या दि. ३० जानेवारीच्या पंचनाम्यामध्ये लिहिलेला बरेटा पिस्तुलाचा नंबर (पोलिस प्रदर्श वस्तू क्र. ६७) डॉक्टरांच्या पिस्तुलाच्या नंबराहून अगदी निराळा होता. पण त्या फेब्रुवारी १९४८ च्या दुसऱ्या-तिसऱ्या आठवड्यात डॉक्टरांना त्यांच्या बरेटा पिस्तुलाच्या उपयोगाबद्दल जी धमकी दिली गेली त्याने पोलिसांचे वांछित साध्य झाले होते! डॉक्टरांनी निमूटपणे कबुलीजबाबावर आपल्या स्वाक्षऱ्या करून दिल्या होत्या! आणि त्यानंतर जवळजवळ दीड वर्षभर त्या धमकीने मिळवलेल्या कबुलीजबाबाला हाणून पाडण्याचा भार माझ्यावर पडला होता! ◻

## ओळख परेड

न्यायालयासमोर चालणाऱ्या अपराधसंबंधी अभियोगात, अपराधसंबंधी इंग्रजी व्यवहारशास्त्राप्रमाणे आरोपीच्या पिंजऱ्यात आलेल्या अभियुक्ताला, तो न्यायाधीशाच्या निर्णयाने कृतापराध दोषी सिद्ध होईतोवर निर्दोष समजून सर्व व्यवहारविधी पूर्ण करायचा असतो, आणि पिंजऱ्यातल्या आरोपीचे हे मानलेले निर्दोषत्व सुरक्षित राहावे यासाठी पाळावयाच्या एका मूल विधिनियमाप्रमाणे अशी काळजी घ्यायची असते की, अभियुक्त पकडला गेल्यावर, किंवा त्याच्याविरुद्ध पुराव्यात येऊ शकणारी वस्तू किंवा कागदपत्र पोलिसांना मिळाल्यावर, त्या अभियुक्ताच्या चेहरेपट्टीची किंवा वस्तू आदीची अनन्यता प्रकट किंवा प्रसिद्ध होऊ द्यायची नाही, सर्वसाधारण लोकांच्या दृष्टिसमोर येऊ द्यायची नाही, त्या अभियोगातल्या साक्षीदारांपासून तर कटाक्षाने दूर ठेवायची. एरवी साक्षीदार मंडळींना दृक्प्रत्ययाचा सराव होऊन न्यायालयात त्या अभियुक्ताला किंवा पुराव्यातील वस्तूला ओळखणे सोपे होईल याच दृष्टीने अभियुक्ताला किंवा पुराव्यातील वस्तूंना जनतेपासून–त्यांतलेच साक्षीदार असतात–दृष्टिआड ठेवायचे. अनुसंधानामध्ये चौकशी अधिकाऱ्यांसमोर अभियुक्ताची किंवा पुराव्यातील वस्तूंची ओळख सांगणारा साक्षीदार येतो किंवा अभावितपणे त्यांना भेटतो, तेव्हा चौकशी अधिकारी शक्य तितक्या त्वरेने एखाद्या दंडाधिकारी–मॅजिस्ट्रेटकडे जाऊन त्याला ओळख परेडची कार्यवाही करावयास विनवितो–म्हणजे तेथे मॅजिस्ट्रेट अभियुक्ताची ओळख परेड असेल तर, अभियुक्ताला त्याच्या वयाच्या, त्याच्यासारखे कपडे घातलेल्या आठ दहा माणसांबरोबर एकत्र करून त्या सर्वांना एका रेषेत उभे राहायला सांगतो आणि मग साक्षीदाराला त्या मंडळींतून अभियुक्ताला ओळखावयास सांगतो व साक्षीदार जसे ओळखेल किंवा ओळखणार नाही तसा मॅजिस्ट्रेटच्या सहीने एक लेख लिहिला जातो. वस्तूची ओळख सांगायची असेल तर, मॅजिस्ट्रेट प्रथम पुराव्यातली वस्तू त्यासारख्या चार सहा वस्तूंबरोबर ठेवतो व नंतर साक्षीदाराला बोलावून त्यांतून पुराव्यातली वस्तू ओळखावयास सांगतो व साक्षीदार जसे काही करील त्याचा एक लेख आपल्या सहीने लिहितो. या कार्यवाहीला ओळख परेड अशी न्यायलयीन कार्यवाहीत संज्ञा–नाव आहे. सारख्या वस्तूंमध्ये मिसळतो असे लिहिले त्याचा अर्थ दागिना–तशा इतर दागिन्यांमध्ये, कपडालत्ता इतर कपड्यांमध्ये, हत्यारे इतर हत्यारांमध्ये ठेवली जातात. साक्षीदार ज्या आरोपीची किंवा पुराव्यातील वस्तूची ओळख सांगतो, त्या त्याच्या सांगण्याचा खरेखोटेपणा पारखून बघण्याची ओळख परेड ही पहिली संधी असते. ओळख परेड झाल्यानंतर अभियुक्त किंवा पुराव्यातल्या वस्तू पुन्हा साक्षीदारापासून दृष्टिआड ठेवल्या जातात व त्यांच्या अनन्यतेची प्रसिद्धी होऊ दिली जात नाही. त्यानंतर अभियुक्त आणि पुराव्यातल्या वस्तू न्यायालयासमोर आणल्या जातात व तेथे साक्षीदार आल्यानंतर तो स्वतःच्या परीक्षणात त्याला ओळख असलेला अभियुक्त किंवा वस्तू न्यायाधीशाला दाखवतो. अभियुक्ताला किंवा पुराव्यातल्या वस्तूला ओळखायची ही दुसरी व पुरावा म्हणून ग्राह्य होणारी विधिसंगत कार्यवाही होते. यासाठीच अभियुक्त

व साक्षीदार किंवा दस्तू आणि साक्षीदार यांतली कोणतीही जोडी चौकशीमध्ये पोलिसांसमोर येताच शक्य तितक्या त्वरेने ओळख परेडची कार्यवाही संपन्न करणे आवश्यक असते. त्यावरच साक्षीदाराने सांगितलेल्या ओळखीची विश्वासार्हता कमी अधिक मानली जाते. अशी ओळख परेड पोलिसांनी सावकाशपणे, उशीराने केली, तर अभियुक्ताचे वकील या उशीराच्याकाळात साक्षीदाराला ओळखीबद्दल संधी; वर्णन माहिती देऊन पोलिसांनी शिकवून तयारी केली असे आक्षेप घेतात. न्यायाधीशांना ते सयुक्तिक वाटले, तर त्या ओळख परेडला काही महत्त्व–विश्वसार्हता राहात नाही. चौकशी अधिकारी हे राजसत्तेचे प्रतिनिधी. राजाप्रमाणे या चौकशी अधिकाऱ्यांनी अभियोगी, अभियुक्त व साक्षीदार या तिघांशी निष्पक्षतेने वागणे हे न्यायादानाचे महत्त्वाचे अंग आहे. पण दुर्दैवाने पुष्कळदा हे चौकशी अधिकारी स्वत:चे अपराध, चौकशीमधले चातुर्य दाखवायला म्हणून, किंवा कुणा वरिष्ठ अधिकाऱ्याच्या इशाऱ्याने किंवा वरिष्ठांना खूष करण्याच्या उद्देशाने, किंवा बेकायदेशीर स्वार्थपूर्तीकरता म्हणून या ओळख परेडचे पालन काटेकोरपणे, निष्पक्षतेने करीत नाहीत असे पाहावयाला मिळते. याचसाठी न्यायालयात न्याय मागावयाला येणाऱ्याच्यावतीने वकील म्हणून उभे राहिल्यानंतर, अशा बेकायदेशीर किंवा उशीराने केलेल्या ओळख परेडविरुद्ध घसा खरवडून आक्षेप घेण्याची वेळ वकिलांवर येते. आणि याच तत्त्वपालनाच्या अनुषंगाने न्यायालयात चालणाऱ्या अभियोग कार्यवाहीमधल्या अभियुक्ताची किंवा पुराव्यातल्या वस्तु–विषयांची वर्णने, चित्रे वगैरे रीतीने वर्तमानपत्रांतून सिनेमा गृहांतून पूर्वप्रसिद्धी करणे अन्यायाचे, अभियुक्ताला हानिकारक असे मानले जाते.

महात्मा गांधी खून खटल्याच्या लालकिल्ल्यात चाललेल्या अभियोगपर्वात, अभियोग आरंभ होण्यापूर्वी म्हणजे २७ मे १९४८ च्या पूर्वी, आरंभ तिथीला म्हणजे २७ मे १९४८ ला व अभियोग चालू झाल्यानंतर म्हणजे २७ मे १९४८ नंतरही काय घडले होते ?

मुंबईच्या सी. आय. डी. पोलिसांच्या वरळी येथील नवीन तयार झालेल्या इमारतीत चौकशी अधिकाऱ्यांनी या खून खटल्यातील साक्षीदारांसाठी जणू एक प्रशिक्षण शिबिर उघडले होते ! खून खटल्यातील अधिकांश अभियुक्तांना या इमारतीत बंदी म्हणून ठेवले होते व तेथे पुराव्यातल्या वस्तूही गोळा करून ठेवल्या होत्या. ही इमारत न्यायालयीन बंदीगृह आहे असे न्यायलयासमोर सांगितले गेले नव्हते. दिल्ली, कानपूर, ग्वाल्हेर तसेच मुंबई प्रांतातल्या पुणे व व इतर ठिकाणचे साक्षीदार गटागटाने आणून या वरळी इमारतीत ठेवले जात–बंदीसारखे ठेवले जात. ही साक्षीदार मंडळी कोणच्या परिस्थितीत तेथे राहात आहेत हे पाहून त्यांच्या निष्पक्षतेची ग्वाही देणारा कोणीही न्यायिक अधिकारी लालकिल्ल्यातील न्यायालयासमोर आणला नव्हता. वरळी इमारतीमधल्या अभियुक्तांचे फोटो पोलिस अधिकाऱ्यांनी काढून आपल्याजवळ ठेवले होते. पोलिसांच्या कोठडीत असलेल्या बंदींचे फोटो काढण्याचा चौकशी अधिकाऱ्यांना कोणत्याही विधिनियमाप्रमाणे अधिकार नाही. आणि सर्वांत वरकडी म्हणजे प्रत्यक्ष लालकिल्ल्यातील दि. २७ मे १९४८ रोजी सकाळी आरोपींचे फोटो काढण्यात आले, चलत्‌चित्रे–फिल्म घेण्यात आली व भारत सरकारच्या प्रसिद्धी खात्याने ही फोटो–चित्रे वर्तमानपत्रांना प्रसिद्धीसाठी दिली व चलत्‌चित्रांच्या प्रती भारतातल्या अनेक सिनेमागृहांतून राजरोसपणे दाखविण्यात आल्या व लगेच वर्तमानपत्रांतून फोटोचित्रेही भारतभर प्रसिद्ध झाली ! त्यानंतर जवळ जवळ महिन्याभराने न्यायालयात अभियोगपक्षाचे साक्षीदार येऊ लागले. दिल्ली व मुंबई येथील हॉटेलमधले वाढपी नोकर व मालक आले. दिल्ली, ग्वाल्हेर, कानपूर व मुंबई येथील रेल्वे स्टेशनवरचे बुकिंग क्लार्क, रिटायरिंग रूमची व्यवस्था पाहणारे कर्मचारी आले, रेल्वे खात्यातले तिकीट कलेक्टर आले. दिल्ली, मुंबईचे टॅक्सी ड्रायव्हर्स आले, ग्वाल्हेरचे टांगेवाले आले. ह्या सर्व मंडळींपैकी अनेकांना सरकारी खर्चाने मुंबईची वारी करण्याची संधी मिळाली; मुंबईच्या वरळी इमारतीत पोलिसांच्या संरक्षणात पाहुणचार घेण्याची संधी मिळाली, राजरोसपणे वर्तमानपत्रातून व सिनेमागृहातून महात्मा गांधी खून खटल्यातील अभियुक्तांचे चेहरे पाहण्याची संधी मिळाली. खून खटल्यातील अभियुक्तांच्या चेहरेपट्टीची ओळख करून देण्याच्या या बेकायदेशीर कार्यवाहीबद्दल पोलिसांविरुद्ध किंवा शासनाविरुद्ध कोणी ब्र उच्चारला नाही ! साक्षीदार न्यायालयात येत. साक्षीदारांच्या पिंजऱ्यात उभे राहून शपथेवर साक्ष देत. साक्षीदार कोर्टाला सांगत, 'मी आरोपीला मी, सांगितलेल्या घटनेच्या दिवशी घटनास्थळी प्रथम पाहिले. त्यानंतर मी मुंबई येथे आरोपीला मॅजिस्ट्रेटसमोर ओळखले; आता आज मी न्यायालयात आरोपीच्या पिंजऱ्यात आरोपीला ओळखून दाखवतो. या साक्षीदारांच्या ओळखसाक्षीवर न्यायालयाने पूर्ण विश्वास ठेवावा यासाठी अभियोगपक्षाने हे सर्व केले होते ! अभियुक्तांतर्फे उभा राहणारा एखादा वकील, आपले वकिलीचातुर्य वापरून साक्षीदारांचे कूटपरीक्षण करी. ते सर्व अधिकतः निष्फळ, व्यर्थ ठरायचे, अर्थात बचावपक्षाच्या भाग्याने काही साक्षीदार आले नि त्यांनी सांगितले की, 'आम्हा साक्षीदारांना पोलिसांनी एकत्र मुंबईला नेले व तेथे वरळी कार्यालयात एकत्रच ठेवले होते...' पण पुढे साक्षीदार कोर्टात हे सांगतात हे पोलिसांच्या लक्षात आल्यावर साक्षीदार असे काही सांगणेही बंद झाले !

येथे नमुन्यादाखल मी एकच उदाहरण म्हणून सांगतो. ग्वाल्हेरचा अभियोग साक्षीदार क्रमांक ५३ जगन्नाथ सिंग हा माझ्या माहितीप्रमाणे खरा साक्षीदार नव्हता. 'पढविलेला' असा होता. या जगन्नाथसिंगला पोलिसांनी मुंबईच्या वरळीच्या 'प्रशिक्षण शाळेत' नेले नव्हते. या साक्षीदाराने केवळ डॉ. परचुऱ्यांविरुद्ध जे काही सांगायचे ते सांगितल्यावर, त्याला-अभियुक्ताला-ओळखशील का असे श्री. पेटीगारा पोलिस प्रॉसिक्यूटर यांनी विचारले. साक्षीदाराने 'हां, हां, जरूर' असे उत्तर दिले व साक्षीदाराच्या पिंजऱ्यातून उतरून आरोपींच्या पिंजऱ्याकडे तो सरळ चालत गेला नि एका टोकाला–म्हणजे पहिल्याच क्रमांकावर बसलेल्या अभियुक्ताजवळ जाऊन त्यांच्याकडे बोट दाखवून म्हटले की, हे आहेत डॉ. परचुरे ! पण ते होते विनायक दामोदर सावरकर !

महात्मा गांधी खून खटल्यातील बचावपक्षाच्या पक्षसमर्थाचा समारोप करताना दिनांक ३० डिसेंबर १९४८ रोजी मी कोर्टात कळकळीने, आर्जवून म्हटले होते की,

'असेही होईल की, हा लोकविलक्षण खटला टॅक्सी चालकांनी आपल्या धावत्या जीवनात एकदाच पाहिलेल्या सवारी ग्राहकाची

कशी विलक्षण ओळख दाखवली यासाठीच लक्षात राहील !

'असेही होईल की, हा 'खास खटला' यामध्ये आलेल्या हॉटेल कर्मचाऱ्यांनी किंवा रेल्वे कर्मचाऱ्यांनी त्यांच्यासमोर आलेल्या माणसाची कशी 'खास ओळख' दाखविली यासाठीच लक्षात राहील.!'

प्रिय वाचक ! महात्मा गांधी खून खटल्यामध्ये न्यायासनासमोर आलेल्या 'ओळख सांगे' साक्षीदारांच्या विश्वसनीयतेविषयी मी माझी शंका तळमळून बोलून दाखविली यांत मी काही चूक करीत होतो का ? ☐

## माफीचा साक्षीदार

महात्मा गांधी खून खटल्याच्या लालकिल्ल्यात चाललेल्या अभियोगपर्वात अभियोगचालकांनी माफीचा साक्षीदार श्री. दिगंबर आर. बडगे याला प्रमुख भूमिका करणाऱ्या कलाकाराच्या थाटात न्यायमंचावर आणले होते. पण माफीचा साक्षीदार हा आम्हा बचावपक्षाच्या वकिलांची एक 'डोकेदुखी'च होती. कोणत्याही अपराधासंबंधी अभियोगपर्वात नेहमी असेच होते. पण विशेषेकरून हत्येच्या किंवा हत्येला प्रोत्साहन दिल्याच्या आरोपांबरोबर इतर लहानमोठे आरोप असोत-नसोत, त्यामध्ये जर तितक्याच महत्त्वाचा 'हत्येचा कट' केल्याचा आरोप असला तर, माफीचा साक्षीदार ही 'तीव्र डोकेदुखी' होते.

'माफीचा साक्षीदार' साथी आरोपींच्या शब्दातला 'अभद्र सूकर.' हा तत्त्वतः एक तिरस्करणीय इसम, 'यावर विश्वास ठेवू नये' असा मानला जातो. न्यायालयीन निर्णयदृष्टान्तांचे ढीगच्या ढीग सांगतात की, माफीच्या साक्षीदाराच्या पुराव्याचे जोवर आरोपांतल्या महत्त्वाच्या घटनांच्या बाबतीत दुसऱ्या विश्वसनीय साक्षीने समर्थन होत नाही, तोवर त्या साक्षीदारावर विश्वास ठेवू नये. दोन किंवा अधिक अविश्वसनीय साक्षीदार मिळून एक भरवश्यालायक पुरावा असे समीकरण मांडणे चूक आहे. स्वतः केलेल्या बेकायदा कृत्यांची निलाजरी नि निर्भीक कबुली देणाऱ्या ह्या अभियुक्ताला त्याने केलेल्या गुन्ह्यांबद्दलच्या शिक्षेची सूट दिली जाते. याला मुख्य आधारबंध असा असतो की, या साक्षीदाराने अभियोगविषयक आरोपित घटनांबाबत 'सगळे आणि खरे' सांगून न्यायाधीशांचे समाधान केले पाहिजे. न्यायाधीश आपले समाधान झाल्याचे प्रमाणपत्र अभियोगाच्या निर्णयपत्रात लिहून हा माफीचा अभियुक्त शिक्षेची सूट मिळायला पात्र आहे म्हणून त्याला बंधनातून मुक्त करण्यात यावे अशी आज्ञा लिहितो.

माफीच्या साक्षीदाराच्या साक्षीबद्दल त्याच्या पुष्टीकरणाचे जे सूत्र लक्षात ठेवायचे असते त्याचे गांभीर्य 'कटाचा आरोप' असलेल्या अभियोगात अधिकच गुंतागुंतीचे होते. कट म्हणजे बेकायदा कृत्य करण्याबद्दलचे संगनमत हे सर्वांना ठाऊक असतेच. हे संगनमत गुपचुपपणे, गुप्तपणे केले जाणे स्वाभाविकच आहे. म्हणून अशा कटाचा-संगनमताचा पुरावा बहुतेक प्रत्यक्ष आरोपित घटना पाहिल्या-ऐकल्याचा पुरावा नसतो; परंतु आरोपित कृत्य सुचविणाऱ्या पुष्कळशा अनुषंगिक घटनांच्या साखळ्यांचा पुरावा असतो. या अनुषंगिक घटनांना पुराव्याच्या साखळीमधल्या कडी-दुवे असे म्हणतात. पुराव्याचा कायदा व त्यासंबंधीचे न्यायालयीन निर्णयदृष्टान्त असे सांगतात की, पुराव्याच्या साखळीमधून एकच एक अर्थ निघायला हवा व तो म्हणजे अभियुक्तांच्या कृतापराधदोषाचा अर्थ. आणि प्रत्येक साखळीचा हा अर्थ अभियुक्तांच्या निर्दोषपणाशी पूर्णपणे विसंगत असा असला पाहिजे. तात्पर्य हेच की, कटाच्या आरोपाच्या पुराव्याचे मूल्यमापन करताना ते बिनचूक व्हावे यासाठीच हे संकेत पाळले जाणे आवश्यक आहे. इतकी काळजी घेऊनसुद्धा न्यायालयासमोर न्याय मागायला आलेले पक्षकार आपल्या स्वभावा-दानतीप्रमाणे विधिनियमांमधल्या किंवा व्यवहारविधींमधल्या पळवाटांचा शक्य होईल तितका फायदा आपला पक्ष सिद्ध करण्यासाठी घेतच असतात. पोलिसखात्याचे चौकशी अधिकारीसुद्धा या पक्षकारांच्या वृत्तीला अपवाद नसतात. अधिवक्त्याचे कार्य एवढेच उरते की, त्याच्यासमोर जो भाराभार नि असंबद्ध पुरावा पक्षकारांकडून ठेवला जाईल त्यामधून चातुर्याने निवड करून आपला पक्ष सिद्ध करण्यासाठी पुरेसा आणि जरूरी पुरावा कोर्टासमोर आणायचा.

न्यायालयांमधून आपल्या पक्षकाराचा पक्ष सिद्ध करण्यासाठी लागणाऱ्या विधिज्ञानाचा नि व्यवहारज्ञानाचा मला असा परिचय असल्यामुळे जेव्हा मी माफीच्या साक्षीदाराद्वारा जो पुरावा अभियोगपक्षाने न्यायालयासमोर ठेवला व त्याच्या पुष्टीकरणाकरता म्हणून जो भाराभार पुरावा आणला, तो सर्व हुडकून काढण्यात व गोळा करण्यात चौकशी अधिकाऱ्यांनी जी चतुराई दाखवली व जे जे उपाय योजिले, ते बघून मला फार आश्चर्य वाटले होते.

माफीचा साक्षीदार झालेला अभियुक्त दिगंबर आर. बडगे ही महाराष्ट्रातल्या गोंधळी समाजातली, १९४८ मध्ये ३९ वर्षे वयाची व्यक्ती महाराष्ट्र खानदेशातल्या चाळीसगावची राहणारी होती. एका गरीब कुटुंबातला हा मनुष्य, फारसा शिकलेला नव्हता. 'मला इंग्रजी समजत नाही असे त्याने न्यायालयात सांगितले होते. त्याचा भाऊ पोलिस खात्यामध्ये कर्मचारी होता. बडगे स्वतः सुरुवातीस प्र. के. अत्रे (आचार्य अत्रे) यांच्याकडे दरमहा १८ किंवा २० रुपये पगारावर काम करीत असे. पुढे बडगेची ओळख श्री. ग. वि. केतकरांशी झाली व बडगे श्री. केतकरांचे व हिंदुमहासभेचेही काम करू लागला. तो काही दिवस हिंदुमहासभेच्या दादर मुंबई शाखेमध्ये सभेची वर्गणी गोळा करणे वगैरेसारखी कामे करीत असे. पुढे १९४२ मध्ये बडगेने पुणे येथे 'शस्त्र भांडार' नावाचे दुकान काढले. या दुकानात तो सुरे व चाकूच विकायला ठेवायचा. १९४३ मध्ये बडगेने वीर सावरकरांना-बडगेच्या शब्दांत 'तात्यारावांना' पत्रे लिहिली होती व 'तात्यारावांनी माझ्या 'शस्त्र भांडारा'च्या कामाबद्दल माझी पाठ थोपटली होती' असे कोर्टात सांगितले. बडगेला सावरकरांना 'सावरकर' म्हटलेले आवडायचे नाही. त्यांना 'तात्याराव' म्हणण्याबद्दल त्याचा आग्रह असे. हिंदुमहासभेच्या कामाच्या निमित्ताने बडगे हा दिल्ली, कानपूर, महाराष्ट्रातली बरीचशी गावे, वगैरे पाहून-हिंडून आला होता. १९४४ मध्ये बडगेची गाठ नथूराम गोडसेशी, नथूरामने सुरू केलेल्या हिंदू राष्ट्र दल शिबिराच्या निमित्ताने पडली होती. अगदी सुरुवातीस बडगेने धुळ्याचे श्री.

हरीभाऊ पाटसकर यांच्याबरोबर काँग्रेसमध्येही काम केल्याचे व पुढे त्यांच्याशी भांडून काँग्रेसचे काम सोडल्याचे कोर्टात सांगितले होते. पण बडगे काँग्रेसीही नव्हता की हिंदूसभाईही नव्हता. तो होता आपले पोट नि खिसे भरायला निघालेला धंदेवाईक. स्वातंत्र्यापूर्वी हैद्राबादची सत्याग्रहाची चळवळ सुरू होताच तो त्यामध्ये काम करू लागला. पण कसले, तर हत्यारे, रिव्हॉल्व्हर, काडतुसे, सुरुंगाची दारू, हातगोळे वगैरे गोळा करून ते भरमसाट किंमती घेऊन सत्याग्रही मंडळींना विकण्याचे! हा बडगेचा धंदा खूप वाढला–अगदी दुपटी-तिपटीने नफा मिळवून देण्याइतका वाढला होता. ह्याच संदर्भात बडगेची भेट अहमदनगरच्या करकरेशी व त्याचबरोबर मदनलालशीही झाली, तशीच एका हरिजन आमदाराशी व मुंबईच्या दोन गोस्वामी गुजराती महाराजांशीही झाली. बडगे म्हणजे ठेंगणीशी मूर्ती. कंबरेला धोतर, अंगावर झब्बा, डोक्यावर लांब केस, हनुवटीला मुल्लाजीसारखी पण काळी दाढी नि डोळ्यांवर चष्मा, ओठावर लटके हसू व डोळ्यांत भिरभिरी दृष्टी असा होता. समजणाऱ्याला बडगे हा धूर्त आहे हे चटकन् जाणवे. आपल्या मनातले विचार विनोदी बोलण्यात किंवा बावळटपणाच्या बुरख्यामागे कसे लपवायचे हे त्याला कळे. बडगे हजरजबाबी होता. लाल किल्ल्यातील कोर्टात बडगेने 'पढविलेल्या' साक्षीदाराच्या सगळ्या लकबी दाखविल्या होत्या. असंबद्ध उत्तर देऊन प्रश्नाचे उत्तर टाळणे, आढ्याकडे वरती बघून उत्तर आठवणे, ओठांवर हात फिरविण्याच्या मिषाने उत्तर देण्यास वेळ लावणे, सरकारी वकिलांकडे 'काय उत्तर देऊ' असे विचारल्यासारखे बघणे, उगाच हातपाय हालविण्यात, धोतराच्या निऱ्या, झब्ब्याच्या बाह्या सावरण्यात वेळ घालवणे पण पढवलेला प्रश्न विचारला गेला की, चेहऱ्यावर आत्मविश्वास दाखवीत व छद्मी स्मित करीत ठसक्याने उत्तर देणे, बडगेने हे सगळे काही करून दाखविले होते. आमच्या बचावपक्षाच्या एका वकील महाशयांनी बडगेला विचारले, 'काहो तुम्ही म्हणता तो मनुष्य कसा होता, लुकडा, किरकोळ की जरा...' प्रश्न पूर्ण व्हायच्या आतच बडगेने क्षणभर आढ्याकडे बघितल्यासारखे दाखवून प्रश्न विचारणाऱ्या वकील महाशयांकडे बघून स्मित करीत उत्तर दिले, 'जरा लठ्ठच होता ..अगदी तुमच्यासारखाच लठ्ठ!' हे उत्तर ऐकून पृच्छक वकील-महाशयांचा चेहरा बघण्यासारखा झाला पण कोर्टामध्ये हास्याचे फवारे उडाले. पण जज्ज आत्मचरणजींवर माफीच्या साक्षीदाराच्या या साऱ्या लकबींचा काही परिणाम झाला नव्हता. त्यांचे सारे लक्ष 'जरुरी–पुरते' लिहिण्याकडे होते. त्यांच्या दृष्टीसमोरून सरकणारी नाट्यमय दृश्ये त्यांना जशी काही दिसतच नव्हती?

बडगेचा धंदा पुणे–मुंबईच्या आसपासच चालायचा. पण याचाच अर्थ असा की, मुंबई–पुण्याच्या परिसरात हा आक्षेपार्ह व्यवसाय स्वतःच्या पदराला खार किंवा अंगावर ओरखडा येऊ न देता इतके दिवस बडगे करू शकला, तो काय पोलिसांच्या मदतीशिवाय किंवा पोलिसांच्या 'काणाडोळा' करण्याच्या सवलतीशिवाय? मला तर वाटायचे, हैद्राबाद सत्याग्रहाचे निमित्त करून कितीएक प्रतिष्ठित व अधिकारी मंडळींना आपले उखळ पांढरे करण्याची संधीच मिळाली होती. बडगेने त्यामध्ये स्वतःचा सगळा फायदा करून घेतला होता. आणि बडगेच्या याच चलतीच्या दिवसांत त्याला पाकिस्तानातून निर्वासित झालेला, पोरका पंजाबी, पण उसळत्या वृत्तीचा तरुण ताजा मदनलाल पाहवा भेटला व त्याकडे बघून बडगेला आपला धंदा पाकिस्तानी निर्वासितांमध्येही का नेऊ नये, लाहोर पेशावरकडून येताना देशोधडीला लागलेल्या निर्वासितांमधला एक म्हणून, चेंबूर, मुंबई, नाशिक, नगर येथल्या सिंधीपंजाबी निर्वासितांमध्ये वावरणारा एक म्हणून, मदनलालसारखा ताज्या रक्ताचा, निर्वासितांचा नेता बनण्याचे स्वप्न बघणारा पण अननुभवी उत्साहाचा नवजवान मदनलाल, बडगेला भेटताच बडगेच्या धूर्त दृष्टीला स्वतःचा धंदा निर्वासितांच्या छावण्यापर्यंत पोचविण्याची संधी दिसावी यात काही नवल नव्हते. निर्वासितांचा आर्त आवाज महात्माजींच्या कानांवर घालण्याची संधी मिळणार या आशेने उसळणाऱ्या मदनलालला दिल्लीला जाण्याला उद्युक्त करण्यामध्ये तेथे मदनलालच्या हातात गुपचुपपणे सुरुंगाच्या दारूची एक वीट व एखादा हातगोळाही नमुन्याचा म्हणून देण्याची धंदेवाईक धूर्तता बडगेने दाखवावी याचे मला आश्चर्य वाटले नाही. मदनलाल स्वतःला कोणत्याही कटापासून 'मीलों दूर' असल्याचे म्हणतो ते खरेच असावे असेच बडगेकडे बघून मला वाटायला लागले होते.

दैव आणि दैव! या दोघांनाही खटपटी माणसे आवडतात. म्हणून की काय, मुंबईच्या वरळी येथील नव्या सी. आय. डी. प्रमुख कार्यालयात महात्मा गांधी खून-खटल्याचे चौकशीसत्र अनिर्बंध अग्रहक्काने करण्याचे वरदान मिळालेल्या खटपटी–चौकशी अधिकाऱ्यांना बडगे हा हुकुमाचा एक्का हाती लागावा ही देवाची नि दैवाची–दोघांचीही कृपा असेच मला वाटते. स्थानसादृश्यामुळे वीस जानेवारीच्या घटनेची व तीस जानेवारीच्या घटनेची सांगड घालता येऊन नथूराम आणि मदनलालची मोट बांधता आली. मदनलालच्या महाराष्ट्रातल्या वास्तव्य हालचालींमधला एक सूत्रधार म्हणून बडगे हाती लागला. आणि बडगे कसा तर सर्वगुणसंपन्न! पोलिसांना मदनलालकडून एवढेच कळले होते की, मदनलालला सुरुंगाच्या दारूची वीट व हातगोळा देणारा कुणी दाढीवाला, लांब केसाचा, चष्मा घालणारा, ठेंगणा, धोतर-झब्बा वापरणारा, महाराष्ट्रीअन आहे. या आधारावर अभियोग साक्षीदार क्र. १३३ नगरवाला यांनी कोर्टाला सांगितले होते की, पोलिसांनी २४ जानेवारीपासूनच पुण्याला बडगेच्या घरावर 'गुपचुप पाळत' ठेवली होती. पण बडगेला पकडले मात्र २ फेब्रुवारी ४८ ला. या पाळतीची रेकॉर्डमधली नोंद वगैरे काही नाही, सगळा तोंडी कारभार! बडगेचा उपयोग पोलिसांना कटाची कहाणी बनविण्यासाठी करता आला आणि यासाठी बडगेचा स्वतःच्या पूर्वपीठिकेचा पोलिसांना चांगलाच उपयोग झाला. बडगेचे सगळे ग्राहक नथूरामचे कटवाले म्हणणे सोपे झाले. नथूराम वीस जानेवारी ४८ च्या आधीपासून रिव्हॉल्व्हर–पिस्तुलाच्या शोधात होता हे म्हणणेही सोपे झाले. बडगेला २ फेब्रुवारीला पकडले खरे; पण पोलिसांनी त्याचे 'प्रश्नपरीक्षण' (Interrogation) २२ फेब्रुवारीला केले असे पोलिस साक्षीदारांनी सांगितले. बडगेला पकडल्यानंतर त्याला पुण्याच्या किंवा मुंबईच्या कोणा मॅजिस्ट्रेटासमोर उभा केल्याची लेखी नोंद कोर्टासमोर आली नाही. नव्या सी. आय. डी. बिल्डिंग वरळीमध्ये चाललेल्या महात्मा गांधी खून-खटल्याच्या चौकशीसत्रामध्ये पोलिसांना मॅजिस्ट्रेटांची

अडचण केव्हाच व कोठेच भासली नाही. कारण सुरक्षा ऑर्डिनन्स खाली केलेल्या धरपकडीमध्ये मॅजिस्ट्रेटांचा काही संबंधच नसतो. बाहेर विरोधी तप्त वातावरण व हाती बडगेसारखा उपयोगी मनुष्य. त्यामुळे कुणालाही पकडून आणायचे नि त्याचे प्रश्नपरीक्षण बडगेच्या सान्निध्यात करायचे किती सोपे! दोन बंदी समोरासमोर उभे करून दोघा वध्यांची प्रश्नपरीक्षणाची जुगलबंदी, पोलिस अधिकारी केव्हा नि कशी साजरी करतात याची मला माहिती होती. कारण मी काही दिवस एका पोलिस-ठाण्याच्या शेजाराला राहिलो होतो नि ते मी स्वतः पाहिले होते. ते बघून माझे मत झाले होते की, 'सहस्र बाहुबली 'देखील पोलिसांच्या प्रश्नपरीक्षणात टिकणार नाही. थोड्याच वेळात जे पोलिस म्हणतील त्याला हो म्हणायला तो तयार होईल! बडगे तर पोलिसांचा भाऊच निघाला. त्यामुळे चौकशी-अधिकाऱ्यांना महात्मा गांधींच्या खुनाच्या कटाची चौकशी मुंबई वरळीच्या नव्या सी. आय. डी. इमारतीत करणे हे त्यांच्या हातचा मळ ठरले. पोलिस वीर सावरकरांना ओळखत होते. त्यांच्या केसालाही स्पर्श करण्याची पोलिसांची प्राज्ञा नव्हती. सावरकर कोण आहेत नि ते का अभियुक्त झाले हे पोलिसांना चांगले माहीत होते. म्हणून सावरकरांविरुद्ध चौकशी-पोलिसांनी 'दूरून 'च केली. अभियुक्त नथूरामच्या बाबतीतदेखील पोलिसांनी तेच केले–नथूरामच्या केसालाही स्पर्श पोलिसांनी केला नाही. पोलिसांनी नथूरामला फार चांगले वागवले. वरिष्ठ दर्जाचे अधिकारीही नथूरामच्या सुखसोयींकडे लक्ष पुरवायचे. नथूरामच्या सुखसोयींबाबतच्या गरजा फारच थोड्या होत्या हे अर्थातच खरे! नथूरामने स्वतःच भर कोर्टात लाल किल्ल्यामध्ये व सिमला येथेदेखील पोलिसांनी त्याला चांगल्या रीतीने वागविल्याबद्दल मनमोकळेपणाने कृतज्ञता प्रकट केली होती. पण याचा पोलिसांना एक फायदा असा झाला की, नथूरामकडून आरोपित घटनांचा आराखडा त्यांना विनासायास मिळाला. पोलिसांना एकच काम करायचे होते–आराखड्यामध्ये आपल्याला हवा तसा तपशील भरायचा नि वीस व तीस जानेवारीच्या दोन घटनांची एका कटाची कहाणी बनवायची. अभियुक्त नारायण आपटेमध्ये पोलिसांना अगदीच निराळ्या प्रवृत्तीचा माणूस मिळाला. पोलिसांनी आपटेची प्रवृत्ती चटकन् हेरली. आपटे बुद्धीचा अति हुशार मनुष्य. पण त्याची बुद्धी बोलकी करायला लागणारी सर्व तऱ्हेची नाजूक, उबदार नि चवदार साधने पोलिसांच्या हाती होती. आणि त्याचा फायदा पोलिसांनी पूर्णपणे करून घेतला. आपटेने अशा 'बोलक्या बुद्धीमध्ये' कितीतरी घटना पोलिसांना सांगितल्या असाव्यात की ज्याची स्वतः नथूरामलाही माहिती नव्हती व ज्या शोधून काढणे पोलिसांच्या ब्रह्मदेवालादेखील शक्य झाले नसते. अभियुक्त करकरे आणि मदनलाल ही जोडी अगदीच साधीभोळी. त्या दोघांजवळ गुपित असे काही नव्हतेच. पोलिसांच्या बंदीखान्यात त्या दोघांचे गुपित एकच, म्हणजे त्यांना हवे असलेले सुपारीचे खांड! ते मिळाले म्हणजे दोघेही खरे काय ते सांगायचे नि त्यामध्ये एक तसूभरदेखील मागेपुढे जायचे नाहीत. या दोघांना खोटे बोलताच येत नव्हते असे म्हणणे अधिक योग्य होईल. या संदर्भात गोपाळ गोडसेविषयी मी काही लिहिणे योग्य होणार नाही. त्यांनी लिहिलेले लोकांसमोर आहेच. शंकर किस्तैयाविषयीही मला काही लिहिणे शक्य नाही. याला कारण त्याच्याविषयी मला कधीच काही माहिती मिळाली नाही. सगळ्या अभियोगपर्वात मी त्याच्याशी एक अक्षरदेखील बोललो नव्हतो. आणि बडगे?

मी पूर्वीच सांगितले तेच निराळ्या शब्दांत सांगायचे म्हणजे, बडगे हा पोलिसांच्या हाती लागलेल्या पुराव्याचा परीस होता. बडगे जी घटना सांगेल तो कटाचा पुरावा आणि पोलिसांना जो अभियुक्त हवा त्याविरुद्ध बडगेजवळ पुरावा. पोलिसांचा भाऊ असलेल्या या व्यक्तीचा त्याच्या पोलिसविभागातील बांधवांनी त्या दिवसांत अभियुक्तांविरुद्ध पुराव्यातील वस्तू हुडकून काढण्यासाठीच नव्हे, तर साक्षीदार मिळविण्यासाठीही पूर्ण नि हवातसा उपयोग करून घेतला आणि आपल्या बांधवांचा पाहुणचार घेत बडगेने कटाच्या पुराव्यातील साखळीचे सगळे दुवे जोडून दाखवले. हे काम २२ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण झाले असावे. कारण त्या दिवशी बडगेचे प्रश्नपरीक्षण पोलिसांनी केले होते असे पोलिसांनी साक्षीत सांगितले होते. पोलिसांच्या साक्षीप्रमाणे आपटे, मदनलाल आणि गोपाळ गोडसे यांनी पोलिसांना धारा २७, भारतीय साक्षविधानानुसार काही माहिती दिली व त्यावरून पोलिसांनी काही वस्तू अभियुक्तांकडून हुडकून काढवल्या असे संबंधित चौकशी-अधिकाऱ्यांनी साक्षीत सांगितले. पण पुराव्यात पोलिसांना या अभियुक्तांनी काय काढून दिले होते? आपटेकरवी दिल्ली येथील हिंदुमहासभाभवनाच्या पश्चिमेकडील जंगलात एक काडतुसाचे 'टोपण' मिळविले, पण बडगेच्या नोकराकरवी–शंकर किस्तैयाकरवी–पोलिसांनी हिंदुमहासभाभवनाच्या पिछाडीस भिंतीला लागून एका खबदाडातून बडगेची 'सामग्री' मिळविली होती. त्याबद्दल बडगेने आपल्या साक्षीत सांगितले की, बडगे व शंकर २० जानेवारी ४८ ला रात्री दिल्लीहून पळालो, त्यावेळी बडगेने आपल्याजवळची 'सामग्री' शंकरला देऊन भवनाच्या बाहेर भिंतीजवळ पुरून ठेवायला सांगितले होते. खरे म्हणजे कायद्याच्या दृष्टीने या उघड्या जंगलातून बडगेने शंकरकरवी मिळविलेल्या 'सामग्री' वस्तूंचा, इतर अभियुक्तांविरुद्ध काही उपयोग, पुरावा म्हणून करता आला नसता. पण बडगेने आपल्या साक्षीत त्याचा कटाच्या साखळीतला दुवा बनवला होता. ही बडगेची सामग्री किंवा त्यापैकी काहीही इतर कोणाही अभियुक्ताच्या एकाकी कबज्यात किंवा अधिकारात असल्याचे, कोणाही साक्षीदाराचे म्हणणे नव्हते. गोपाळ गोडसेने जी माहिती दिल्याचे सांगण्यात आले होते, त्या चौकशीत वस्तू तर काही मिळाली नाही पण पोलिसांनी दोन तोंडी साक्षीदार मात्र मिळविले व त्या दोघांना सुरक्षा कायद्यान्वये वरळीला बंदीत ठेवले गेले. आपटेने वरळीच्या बंदीगृहात त्याच्या 'बोलक्या बुद्धी'च्या वेळी पोलिसांना आपटेच्या घरून एक लोकरीची विजार–वूलन ट्राउझर मागविण्यास सांगितले. का! तर ती, २० जानेवारी ४८ ला संध्याकाळी स्फोट करून पकडला जाण्याच्या वेळी मदनलालने ज्या लोकरीच्या व रंगाच्या कापडाचा कोट घातला होता तशाच लोकरीच्या व रंगाच्या कापडाची विजार आपटेजवळ होती. तो कोट नि ती विजार आपटेसाठी मी शिवली होती असे सांगणारा पुण्याचा शिंपी साक्षीदार मिळवायला पोलिसांना उशीर लागला नाही. बडगेच्या इतर कहाणीची–ज्या घटना एकट्या बडगेच्या स्वतःच्या व्यवहारातल्या घटना–असणे अगदी शक्य होते

यांना कटाचे स्वरूप देणाऱ्या कहाणीची पुष्टी करण्यासाठी, बडगेच्या व्यवहारात सामील असलेल्या बडगेच्या ग्राहकांकडून, म्हणजे मुंबईचे दोन गोस्वामी गुजराती महाराज अन् पुण्याचे एक हरिजन आमदार यांच्याकडून पुरावा म्हणून काही वदविणे पोलिसांना सहज शक्य झाले ! दोघा गुजराती गोस्वामींनी सांगितले की, ' बडगेबरोबर नथूराम व आपटे त्यांच्याकडे आले होते व नथूरामने त्यावेळी महाराजांकडून एखादा रिव्हॉल्व्हर मागितला होता. , हरिजन आमदारांनी सांगितले की, बडगेने त्यांच्याजवळ जी सामग्री ठेवली होती ती बडगेला आपटेला द्यायची होती असे बडगे म्हणत होता. येथे हे लक्षात घ्यायला हवे की, बडगेने सांगितलेले कटाच्या पुराव्यातले हे दुवे, सगळे २० जानेवारीच्या पूर्वीच्या घटनांबाबत होते. या घटनांची एका कटाच्या पुराव्याची साखळी बनवायला अभियोगपक्षाला एका शपथेवर सांगणारा साक्षीदार हवा होता. पोलिसांनी बडगेचा त्याकरिता पहिल्यापासून उपयोग केला, आणि बडगेच्या तोंडून–केवळ बडगेच्या तोंडून–खुनी नथूरामचा महात्मा गांधींची हत्या करण्याचा निश्चय २० तारखेला व त्याअगोदरही होता हे वदविण्यात पोलिसांना सहज यश मिळाले होते. पोलिसांना वरिष्ठांकडून 'कटाच्या दृष्टीने चौकशी करायचा आदेश ' मिळाला होता. हे सांगायला खुद्द मुंबईचे गृहमंत्री श्री. मोरारजीभाई लालकिल्ल्यात साक्षीदाराच्या पिंजऱ्यात येऊन उभे राहायला–नव्हे, बसायला आले होते ! आणि त्यांची री गृहखात्याचे मुंबईचे पोलिस कमिशनर श्री. नगरवाला यांनी ' सॅल्यूट ' करून ओढली होती !

अशा रीतीने बडगेकडून त्याच्या स्वतःच्या बेकायदेशीर कृत्यांबद्दल कबुली देववून, ज्या कृत्यांचा महात्मा गांधींच्या खुनाच्या कटाशी काहीच संबंध नव्हता तरी–बडगेच्या साक्षीत नथूरामचे चित्र, तो २० जानेवारी ४८ च्या पूर्वीपासूनच महात्मा गांधींच्या हत्येचा आपटेबरोबर मनसुबा करीत होता, असे दाखवता आले. खरे म्हणजे २० जानेवारी ४८ च्या घटनेच्या साऱ्या पुराव्यांमध्ये नथूरामने आपटेबरोबर दिल्लीला येण्यापलीकडे काहीही केल्याचा पुरावा नव्हता. आपटेच्या त्या सगळ्या हालचालींमधून नथूराम अलिप्तासारखा वागला होता, असे पुराव्यावरून म्हणता येत होते. बडगेने नाट्यप्रयोगातला निवेदक बनून, आपटेच्या प्रसिद्धीच्या हव्यासापायी त्याने योजलेल्या ' जोरदार नाट्यमय प्रदर्शनाला ', महात्मा गांधींच्या मुस्लिमधार्जिण्या, अहिंसक राजकारणाची टर उडविणाऱ्या हिंदुमहासभेच्या राजकारणाचा पार्श्वपडदा घेऊन, त्या नाट्याचा उत्कर्ष–क्लायमॅक्स–३० जानेवारीच्या घटनेत झाला असे दाखविले. निजामाच्या मुस्लिम राज्यसत्तेविरुद्ध चळवळ करणाऱ्या, सत्याग्रही व चळवळच्या मंडळींना पोटतिडकीने मदत करणाऱ्या करकरेला, स्वतः चोरीच्या शस्त्रांचा व्यवसाय करणाऱ्या बडगेने, करकऱ्याच्या परोपकारीवृत्तीचा सर्व फायदा घेऊनदेखील, मुस्लिमधार्जिण्या राजकारणी महात्म्याची हत्या करायला उठलेला कटवाला बनविले. काडतुसे, हत्यारे व सुरुंगाच्या दारूचे स्फोटक गोळे यांचा चोरटा धंदा करणाऱ्याच्या मनात, प्रथम निर्वासितांच्या छावण्याचे क्षेत्र विक्रीसाठी हाताळायचा विचार येऊन, त्यासाठी एका तरुण निर्वासिताचाच प्रचारक विक्रेता म्हणून उपयोग करण्याचे बेत होते. परंतु निदर्शने करण्यासाठी जोरदार आवाज करणाऱ्या, धमाक्यांच्या शोधात असणाऱ्या पोरकट नेत्याच्या हातात एक सुरुंगाच्या दारूची वीट व एक हातगोळा देऊन त्याच्याकरवी प्रचार करायचा बडगेने प्रयत्न केला व त्या हालचालीत स्वतःला व स्वतःच्या नोकराला शक्य तितके यडद्याआड ठेवले. गोपाळ गोडसे तर काय, प्रत्यक्ष खुनी नथूरामचा सख्खा भाऊच आणि त्यावर हा भाऊ एका सैनिक छावणीत भांडारघराच्या विभागात–स्टोअर डिपार्टमेंटमध्ये–काम करणारा ! धूर्त बडगेने गोपाळ गोडसेला कटात गोवून एका दगडाने दोन पक्षी मारण्याचा डाव साधला; पोलिसांना एक कटवाला मिळवून दिला. एवढेच नव्हे तर, स्वतःच्या धंद्यातल्या ' सामग्रीची ' गंगोत्री जमनोत्री म्हणून गोपाळकडे जरूर तर बोट दाखवता येईल अशी सोय करून घेतली. शंकर किस्तैय्या तर काय, अन्नदात्या बडगेचा पोटार्थी नोकरच. शंकरच्या संदर्भात एवढेच लिहिणे पुरेसे आहे की, बडगेच्या गुप्त व्यवहारात बडगेला सेवकाच्या इमानाने साथ देणाऱ्या शंकरने न्यायालयातील अभियुक्तांच्या पिंजऱ्यात बसूनदेखील इमानेइतबारे बडगेला साथ दिली होती. अर्थात स्वतःच्या कातडीवर ओरखडासुद्धा येणार नाही याची दक्षता बाळगीत ! मला आश्चर्य वाटले ते, जज्ज आत्मचरणजींनी लालकिल्ल्यातील न्यायालयातच शंकर किस्तैय्याला सावरकरांबरोबरीने निर्दोष म्हणून सोडले कसे नाही ! आणि सावरकरांविषयी काय सांगायचे ? महात्मा गांधींच्या हत्येच्या कटामध्ये शंकर किस्तैय्यासारख्या केवळ त्याच्या अन्नदात्यालाच ओळख असणाऱ्या क्षुद्र जंतूला कटवाला बनवून, त्याबरोबरच भरतभूमीला मातृभूमी मानणाऱ्या, एकजात भारतीयांचे गौरवस्थान-आदरस्थान झालेल्या व साऱ्या जगाला आपल्या अतुल ' उडी 'ने चकित करून सोडणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकरांनाही कटात गोवून दाखविण्याची किमया बडगेने करून दाखविली !

अशा या ' दैवायत्त' बडगेची महात्मा गांधी खून कटाच्या चौकशी अधिकाऱ्यांनी अगदी आरंभापासून–मुंबई वरळीच्या नव्या सी. आय. डी. बिल्डिंगमधल्या बंदीगृहापासून ते इतिहासप्रसिद्ध पुराण्या लालकिल्ल्यातील बंदीगृहातही अतिथी देवाच्या भक्तीने पाहुणचाराची पूजा केली होती. येथे मी पुन्हा ' मदनलाल पाहवाने कुणाही वकिलाच्या विद्येशिवायच स्वयंस्फूर्तीने लालकिल्ल्यातल्या न्यायालयात पहिल्या दिवशीच दि. २७ मे १९४८ ला जज्ज आत्मचरणजींजवळ ' खास मुलाखतीची ' विनवणी करून चौकशी अधिकारी त्यांच्यापैकी एका अभियुक्ताला अगदी सुरुवातीपासून कसे ' खास ' रीतीने वागवीत आहेत हे सांगायचा प्रयत्न केला होता. यामागील प्रकरणात सांगितलेल्या घटनेकडे मी वाचकांचे लक्ष वेधू इच्छितो. मदनलालने अशी प्रार्थना करून ज्या अभियुक्ताकडे इंगित-बोट दाखविण्याचा प्रयत्न केला होता तो अभियुक्त पुढे माफीचा साथीदार बनून बचावपक्षामध्ये गोंधळ उडविणारा ' दिगंबर आर. बडगे ' होता, हे जेव्हा १७ जून १९४८ ला जज्ज आत्मचरणजींनी बडगेला माफीचा साक्षीदार बनण्याची अनुमती दिली त्या दिवशीच स्पष्ट झाले ! अभियुक्त बडगेला त्याच्या अटळविधिलिखितात लिहिल्याप्रमाणे मिळणाऱ्या पोलीस पाहुणचारावर तो अभियोगपक्षाचा न्यायमंदिरातील ' साक्ष्य-तारा '–स्टार विटनेस म्हणून येईतोवरचे रीतसर शिक्कामोर्तब झाले असेच म्हणायचे. मला माझ्या वाचकांना आणखीही थोडे नम्रपणे सांगायचे आहे की, माझी वर वर्णिलेली माफीच्या

पुस्तके

# उच्चस्तरीय राजकारणाचे वेधक दर्शन

## १. नंबर टेन, २. ऑपरेशन राजा

-रविकिरण सानें

राजकारणाच्या बाबतीत आपल्या साहित्यात फारच सोवळेओवळे पाळले जाते. म्हणजे साहित्यक्षेत्रात राजकारण नाही असे नव्हे. ते तर साहित्यापेक्षा उदंड आहे. पण राजकारणाचा अंतर्भाव साहित्यात करणे म्हणजे काही तरी 'अब्रह्मण्यम' अशीच एक गैरसमजूत जोपासली गेली आहे. त्यामुळे राजकीय व्यक्तित्वाच्या जीवनाचा मानवी पातळीवर वेध घेणे तर राहोच, पण राजकीय घडामोडीची पार्श्वभूमीदेखील वास्तव पातळीवर चित्रित होताना दिसत नाही.

प्रा. ना. सी. फडके वगैरेंच्या अनेक कथा-कादंबऱ्यांना तत्कालीन राजकीय संदर्भ जरूर लाभला होता. पण त्याचे स्वरूप पार्श्वभूमीवर कारणपरत्वे येणाऱ्या अन्य कोणत्याही सामान्य घटनांसारखे आहे. त्या संदर्भांना विशिष्ट अर्थ, खोली कधी प्राप्तच होत नाही. मराठीत तरी, राजकीय सामाजिक, चळवळींचे संदर्भ खऱ्या अर्थाने ज्यांना प्राप्त झाले आहेत, अशा कथा, कादंबऱ्या, नाटके अगदी हाताच्या बोटांवर मोजता येतील अशीच. अगदी सहज सुचणारी नावे म्हणजे अनिरुद्ध पुनर्वसूंच्या 'लटिके बोलले अधम मंत्री', अनिल बर्व्यांची 'थँक्यू मिस्टर ग्लॅड' इ. कादंबऱ्या, डॉ. गोविंद देशपांड्यांचे 'उद्ध्वस्त धर्मशाळा', 'अपूर्व बंगाल', 'सोनार बांगला', तेंडुलकरांचे 'भाऊ मुरारराव', 'राजकारण गेले चुलीत' इ. नाटकांचे उदाहरण देता येईल. पण ही यादी थोडीशी भर टाकली तर येथेच संपते. आणि यांतली नाटके-कादंबऱ्यादेखील दोन-तीन अपवाद सोडले तर राजकारणाचा उपयोग संदर्भ म्हणूनच करतात. निख्खळ राजकारण जगणारी माणसे आपल्या साहित्यात क्वचितच आढळतात. मग जवळ जवळ दुर्लक्षित झालेला विषय राजकारणाचे अंतःप्रवाह उलगडून दाखवत, पापुद्रे सोडवत आपल्यापुढे येणे कठीणच. राजकारणाचे अंतःप्रवाह उलगडून दाखवायचे, पक्षोपपक्षांचे राजकारण, पक्षातील अंतर्गत राजकारण यांचे धागे अलग करत जायचे, तर तो लेखकही त्या सगळ्या घडामोडीत, वादळात, घुसळून जायला हवा. निदान त्या साऱ्यांचा साक्षी हवा. पण हे आपल्याकडे क्वचितच घडते. जे प्रस्थापित लेखक आहेत त्यांचा असा संबंध क्वचित येतो. आणि जी मंडळी या गदारोळात वावरत असतात; ती क्वचितच आपली लेखणी उचलतात. एकूण सामान्य वाचकांसमोर असे साहित्य क्वचितच येते.

इंग्रजी वाङ्मयात मात्र राजकीय सनसनाटी कादंबऱ्यांनी गेल्या दशकात एक नवीन युग सुरू केले आहे. या कादंबऱ्या, घडून गेलेल्या राजकीय घडामोडींवरच केवळ भाष्य करतात असे नव्हे तर सध्याच्या राजकीय प्रवृत्ती, नजीकच्या भविष्यात सर्वसाधारणतः तशाच राहतील असे गृहीत धरून भविष्यकालीन घटनांचाही वेध घेण्याचे काम त्या करतात. विविध राजकीय संघर्ष, पेचप्रसंग यांतून बाहेर पडलेले राजकीय निवृत्त नेते, राजदूत, शासकीय अधिकारी वा उच्च राजकारणाशी संबंधित पत्रकार मंडळी साधारणपणे असे लेखन करताना दिसतात. राजकीय क्षेत्रात लोकांसमोर येणाऱ्या घटना वा दृश्य परिणाम म्हणजे राजकीय हिमनगाचा एकदशांश दृश्य भागच म्हणावा लागेल. प्रत्यक्ष घडलेल्या घटनेमागे किती विलक्षण राजकारण खेळले जाते, किती डावपेच लढवले जातात, केवढे राजकीय संघर्ष झालेले असतात, याची सर्वसामान्यांना माहिती कळणे सर्वथैव अशक्य असते. असे हे पडद्याआडचे राजकारण, ललित लेखनशैलीत लोकांसमोर आले, तर त्यावर वाचकांच्या उड्या पडाव्यात हे अगदी स्वाभाविक ठरावे.

'नंबर टेन' आणि 'ऑपरेशन राजा' या अशाच दोन पडद्याआडच्या कहाण्या. या दोन्ही कादंबऱ्यांचे लेखक विल्यम क्लार्क हे ब्रिटिश राजकारणात विविध पातळ्यांवर वावरलेले. वॉशिंग्टन येथे

---

पृष्ठ २० वरून...

साक्षीदाराची कहाणी वकिलीविद्येचे केवळ 'करतब' म्हणून मानू नये. ह्या विचारसरणीला 'सत्याचा आधार' होता हे मदनलालच्या 'खास मुलाखती'च्या मागणीने पहिल्या दिवशीच दिसले होते व पुढे न्यायालयासमोर आम्ही बचावपक्षाच्या वकिलांनी या चालीवर बचावपक्षाचे गीत गायिलेही होते. त्याचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष प्रभाव होऊन लालकिल्ल्यातील न्यायालयात वीर सावरकर निर्दोष सुटले व सिमल्याच्या उच्च न्यायालयात शंकर किस्तैय्या निर्दोष सुटला व अभियुक्त गोपाळ गोडसेला दयेची सूट सरकारने द्यावी अशी शिफारस न्यायपीठाच्या तीन न्यायमूर्तींनी केली, यावर मला समाधानाचा विश्वास सोडता आला—अजूनही येत आहे.

बडगेच्या कहाणीचे 'सुफळ संपूर्ण' सांगायचे म्हणजे १० फेब्रुवारी १९४९ ला लालकिल्ल्यातील न्यायालयात महात्मा गांधी खून खटल्याचा निर्णय जज्ज आत्मचरणजींनी दिला त्याबरोबरच जज्जमहोदयांनी बडगेच्या बाबतीत अशी आज्ञा दिली की, 'ज्या अर्थी अभियुक्त बडगेने त्यावर न्यायालयाने घातलेले आधारबंध-अटी—पूर्णपणे पालन केल्या आहेत असे न्यायालयाचे समाधान झाले आहे, त्याअर्थी बडगेला बंदीगृहातून तात्काळ मुक्त करण्यात यावे.'

१०-२-१९४९ नंतर बडगेचे काय झाले याची मला गेल्या सव्वीस वर्षांच्या काळात काही बातमी कळली नाही. एकदाच अवश्य असे मला सांगण्यात आले होते की, बडगे काही दिवस मुंबई पोलीसखात्याचा 'वैतनिक खबऱ्या' म्हणून काम करीत असे. ते खरे की खोटे याची मला काही माहिती नाही. [क्रमशः]

इंग्लंडचे प्रमुख माहिती अधिकारी म्हणून १९४१ मध्ये ट्रुमन-ॲटली शिखर परिषदेच्या वेळी त्यांनी कामगिरी बजावली. १९५५ मध्ये पंतप्रधान अँथनी ईडन यांचे ते प्रमुख संपर्काधिकारी होते. ' द ऑब्झर्व्हर बी. बी. सी., दूरचित्रवाणी यांचे खास वार्ताहर म्हणून आफ्रिकेत काम पाहिलेले, अनेक वर्षे राजकीय समालोचक म्हणूनही या तीन वृत्तसंस्थांचे काम त्यांनी केले. असा सर्वांगीण व सक्रीय अनुभव त्यांचे गाठीशी आहे. ब्रिटिश व अमेरिकन राजकारण त्यांनी जवळून पाहिले आहे. नंबर टेन या ब्रिटिश पंतप्रधानांच्या कार्यालयाशी व निवासस्थानाशी तर, त्यांचा निकट संबंध आला आहे. त्यामुळे त्यांचे लेखन अधिक वास्तवदर्शी आहे.

'नंबर टेन' ही ब्रिटिश व आफ्रिकन वसाहती यांच्या संघर्षावर आधारित कादंबरी. १९६६ मध्ये ही कादंबरी रचली गेली तेव्हा सुवेझ पेचप्रसंग लेखकाच्या डोळ्यासमोर होता. आणखी दहा वर्षांनी म्हणजे १९७५ मध्ये घडणाऱ्या घटनांचे चित्रीकरण त्याने या कादंबरीमध्ये केले आहे. आफ्रिकेतील नवस्वतंत्र राष्ट्रांमध्ये पूर्वीच्या ब्रिटिश वसाहतीत ब्रिटिशांचे आर्थिक हितसंबंध गुंतून पडले आहेत. तेथील राष्ट्रवादी प्रवृत्ती जोर करून या आर्थिक जोखडातून मुक्त होऊन स्वतःचे पायावर उभे राहू पाहात आहेत. सूर्य न मावळणारे राणीचे साम्राज्य केव्हाच संपले आहे. आता निदान ज्या आर्थिक वसाहती शिल्लक आहेत, त्या तरी जाऊ नयेत म्हणून राज्यकर्त्यांची केविलवाणी धडपड चालू आहे. या पेचप्रसंगातच राष्ट्रांतर्गत दोन विचारप्रवाह संघर्षाला समोरासमोर उभे ठाकत आहेत. एक आहे अतिरेकी राष्ट्रवाद्यांचा. त्यांचे म्हणणे आहे की, हे लढे मोडून काढून पुन्हा ब्रिटनने आपले वर्चस्व प्रस्थापित करावे. आफ्रिकेतील गोऱ्यांना हाताशी धरून हा काळा राष्ट्रवाद गाडून टाकावा. निदान सणसणीत रट्टा तरी हाणावा. ब्रिटनचे गेलेले वैभव परत मिळवण्याची, गोऱ्यांचे साम्राज्य पुन्हा उभे करण्याची जबरदस्त महत्त्वाकांक्षा यांच्या मनात आहे. कोणतीही तडजोड त्यांना नको आहे. या प्रवृत्तीचे प्रतिनिधित्व संरक्षणमंत्री सेबॅस्टिएन फ्लेमिंग यांचेकडे आहे. अर्थातच त्यांचा राष्ट्रवाद सर्वत्र दिसतो तसाच आक्रमक, ओजस्वी, निर्भीड, कठोर आणि सर्वसामान्यांना चटकन भुलवणारा आहे. याच्या विरुद्ध प्रवृत्ती आहे परराष्ट्रमंत्री होल्डन ब्रिटवेल याची. जगाचे बदलणारे राजकारण त्याला दिसते आहे. इतःपर पूर्वीसारखी साम्राज्ये, वसाहती टिकावयाच्या नाहीत याची त्याला जाणीव आहे. राजकारणाचे वाढते परावलंबित्व, राष्ट्राराष्ट्रांतील प्रश्न, युद्धाने, दडपणाने नव्हे, तर सामोपचाराने सोडवायला लावत आहे याची जाणीव त्याला होते आहे. खोट्या वैभवाची स्वप्नं आता पाहात न बसता नव्याने स्वतंत्र होणाऱ्या काळ्या राष्ट्रांना आपण सहानुभूती दाखवली पाहिजे, सर्वतोपरी मदत केली पाहिजे, अशी त्याची विचारसरणी आहे. त्यामुळेच ब्रिटन, आफ्रिका यांच्यातील पेचप्रसंग राष्ट्रसंघात सोडवला जावा अशी त्याची मागणी आहे. स्वप्निल राष्ट्रवाद आणि वास्तव व्यवहारवाद यांच्यातील हा संघर्ष आहे. पक्षांतर्गत नव्हे, तर चक्क मंत्रिमंडळातच पेटलेल्या या वादात पंतप्रधान पायर्टन मात्र कुंपणावर बसून दोघांनाही हाताळतो आहे. हो ला हो करून, निश्चित भूमिका न घेता, आपली पंतप्रधानकी सांभाळण्याचा प्रयत्न करतो आहे.

नंबर टेन हे आहे लंडनच्या डाऊनिंग स्ट्रीटवरील ब्रिटिश पंतप्रधानांचे कार्यालय व निवासस्थान असलेल्या इमारतीचे नाव. आफ्रिकेतील पेचप्रसंगाने पक्षांतर्गत उडालेला संघर्ष हाच याचा वर्ण्यविषय असल्याने कादंबरी घडते ती मुख्यतः या नंबर टेनमध्येच. संघर्ष जरी फ्लेमिंग व ब्रिटवेल यांच्यात असला, तरी त्यांच्या प्रत्येक हालचालीबरोबर स्थान डळमळत असते ते पायर्टनचे. त्यामुळे हा सारा पेचप्रसंग पायर्टन ज्या खुबीने हाताळतो, तोच सर्वांत महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे पायर्टन दैनंदिन घडामोडीत ज्या बारकाईने लक्ष घालतो; दोघांना जे विलक्षण तऱ्हेने खेळवत राहतो, त्यांच्या भांडणांनी सुटत जाणारी आपली पक्कड पुनःपुन्हा बसवत राहतो. फ्लेमिंगला एका प्रकरणात बरोबर पकडून सारे मंत्रिमंडळ उचलायला निघालेल्या पत्रकारावर कुरघोडी करून फ्लेमिंगची उचलबांगडी तर करतोच, पण स्वतःची खुर्चीही सांभाळतो. या व अशा अनेक घडामोडी यात घडतात. म्हणून नंबर टेन हेच या कादंबरीचे केंद्रस्थान राहते.

काल्पनिक भविष्यवेध म्हणून लिहिलेल्या यांतल्या अनेक गोष्टी अंगोला, ऱ्होडेशिया, सहारा येथे घडणाऱ्या घटनांनी सर्वसाधारणपणे खऱ्या ठरत आहेत. अर्थातच गेल्या दहा वर्षांत राजकारण ज्या गतीने आणि ज्या पद्धतीने बदलत गेले, त्याचा यथायोग्य वेध क्लार्कसारख्या इतिहासाच्या अभ्यासकालाही घेता आला नाही. आफ्रिकेतले राजकारण तर क्षणोक्षणी वेगवेगळे रूप धारण करत आहे. भल्याभल्यांच्या सिद्धान्तांची, धोरणांची या नव्या वातावरणाने पार त्रेधातिरपीट उडवली आहे. डॉ. हेन्री किसिंजरसारख्याला जे परवापर्यंत गवसत नव्हते ते राजकारणाचे सूत्र क्लार्कला दहा वर्षांपूर्वी सहीसही गवसते तर तो चमत्कारच ठरता. पण ही राजकीय वळणे त्यालाही अकल्पित आणि म्हणूनच अज्ञात. आफ्रिकेतील बदलत्या वातावरणाचा अचूक वेध, कादंबरीतल्या राज्यकर्त्यांना घेता आला नाही असे रंगवले असते तरी प्रत्यक्षात मात्र ब्रिटन आपली कातडी बचावू शकले. आफ्रिकेतील राष्ट्रवाद्यांशी योग्य तो समन्वय साधून आपले शिरसलामत राखण्याचे कसब ब्रिटिशांनी नेहमीच्याच कौशल्याने दाखवले. अर्थात याचे श्रेय ब्रिटनमधील जागृत लोकमत आणि पत्रकार यांना जाते. या जागृतीत क्लार्कच्या या कादंबरीचे स्थान निश्चितच महत्त्वाचे मानावे लागेल.

नंबर टेनमधला वैचारिक संघर्ष येथेच संपत नाही. ऑपरेशन राजामध्ये तो अधिक गडद होतो. ब्रिटन-अमेरिकेचा सहयोग घडून तो प्रत्यक्ष भारतीय राजकारणाशी येऊन भिडतो. साम्यवादी चीनची अनामिक भीती, भारत चीनच्या कह्यात जाणार अशी खुळी समजूत यातून अमेरिकन राज्यकर्त्यांचे अनैतिक साहस जन्मास येते आणि ब्रिटनची मात्र फरफट होते.

'ऑपरेशन राजा'चे खरे नाव आहे, 'स्पेशल रिलेशनशिप.' अर्थातच हे खास ऐतिहासिक नातेसंबंध आहेत ते ब्रिटन-अमेरिकेचे. अमेरिकन राजकारणातला परिपक्वपणा क्लार्कने या कादंबरीत उघडा पाडला आहे. साम्यवादाला पायबंद घालण्याच्या नावाखाली आफ्रो-आशियनांच्या राष्ट्रवादी स्वातंत्र्य-चळवळी ठेचून काढण्याचे अमेरिकन तंत्र आता नवे राहिलेले नाही. किंबहुना या तंत्रातल्या खोट्या, फसव्या राजनीतीमुळेच आफ्रो-आशियन राष्ट्रांत साम्यवाद प्रस्थापित

होत असल्याचे दृष्टीस पडत आहे. साम्यवादाला विरोध करण्यासाठी परंपरावादी, भ्रष्ट, लष्करी राजवटींना पाठिंबा देत राहिल्यामुळे अमेरिका नेहमीच चुकीच्या बाजूने उभी राहिली आहे. साम्यवादाला विरोध करण्यासाठी, तशीच राष्ट्रवादी पण जनतेत लोकप्रिय असणारी एखादी स्वच्छ संघटना उभी करण्याचे राजकारण, अमेरिकेला कधी जमलेच नाही. त्यामुळेच आफ्रो-आशियन जनतेत अमेरिकेबद्दल नेहमी रागद्वेषच निर्माण झाला. आग्नेय आशियातले राजकारण तर या फसलेल्या धोरणाचे ढळढळीत उदाहरण आहे. भारताबाबतची भूमिकाही नेहमी अशीच पूर्वग्रहदूषित ठेवून अमेरिकेने आपले आजवर हसेच करून घेतले आहे. या साऱ्या फसव्या राजकारणाचे लख्ख दर्शन या कादंबरीत आपल्याला घडते आणि आपल्याला अवाक करते.

सी. आय. ए. चे उपद्व्याप हा तर आता जगभर चर्चेचा विषय झाला आहे. आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी प्रचंड रकमेच्या लाचखोरीपासून ते राष्ट्रनेत्यांच्या खुनापर्यंत सारे प्रकार घृणास्पदरीत्या राजरोसपणे ही संघटना सर्वत्र हाताळते. पण मारेकऱ्याचे स्वरूप लाभलेली ही संघटना देशोदेशींचे खरे लोकमत अजमावण्याबाबत मात्र यशस्वी होताना दिसत नाही. सी. आय. ए. च्या कारवायांचे दर्शनही यामध्ये आपल्याला होते.

'ऑपरेशन राजा' हे आहे भारताविरुद्ध रचल्या गेलेल्या एका राजकीय कूटकारस्थानाचे सांकेतिक नाव. १९६८ मध्ये लिहिल्या गेलेल्या या कादंबरीचा काल्पनिक काल आहे १९७७ चा. भारत चीनच्या कह्यात जाणार, भारतातून चीन आपल्या छाताडावर अण्वस्त्रे रोखणार या भीतीने अमेरिका अस्वस्थ आहे. भारत चीनच्या कह्यात जाऊ नये म्हणून सध्याचे रॉयचे राज्य उलथवले पाहिजे, अशी तिची समजूत आहे. या उलथापालथीसाठी सी. आय. ए. च्या गळाला लागतात ते तिन्ही लष्करी प्रमुख. त्यांनी बंड करून राज्य ताब्यात घ्यावयाचे ठरते. त्यांना फक्त हवा असतो ब्रिटन–अमेरिकेचा पाठिंबा. पण या योजनेमुळे ब्रिटन-अमेरिकेतच अंतर्गत उलथापालथी घडतात. ब्रिटनचे मंत्रिमंडळ कोसळते. रॉयला कटाचा सुगावा लागतो. तो तिन्ही सेनादलांच्या प्रमुखांना अटक करून कट फसल्याचे जाहीर करतो. चीन अमेरिकेवर फुत्कारतो. कट फसल्याने पुन्हा नव्या उलथापालथींना सामोरे जायची वेळ येते आणि ब्रिटन-अमेरिकेचे अनैतिक साहस अंगाशी येते.

ब्रिटनमधल्या राष्ट्रवादी आणि शांततावाद्यांचा संघर्ष पराकोटीला जातो. नंबर टेनच्या अखेरीला राजकारणातून निवृत्त झालेला झुंजार फ्लेमिंग पुन्हा राजकारणात प्रवेशतो. ब्रिटवेल, पायर्टनचे मंत्रिमंडळ उलथवून स्वतः पंतप्रधान होतो. साऱ्या गोऱ्यांनी पुन्हा एक व्हावे, ब्रिटन-अमेरिकेने संयुक्तपणे सर्व जगावर अधिराज्य करावे अशा स्वप्नात फ्लेमिंग मशगुल होतो. त्याच नादात भारतविरोधी कटाला पाठिंबा देतो. भारताची मदत थांबवतो. ड्युक ऑफ एडिंबराची भारत-भेट रद्द करतो. आपल्या त्या वैभवशाली स्वप्नासाठी तो हे सारे करत असतो. पण अमेरिकन अध्यक्षांचे भेटीत त्याचा भ्रमनिरास होतो. आपले स्वप्न वास्तवात येणे तर शक्य नाहीच, पण इतक्या लटपटी करून मिळवलेले पंतप्रधानपदसुद्धा निसटणार हे त्याला स्पष्ट दिसू लागते. त्याच्या तोंडावरच अमेरिकन अध्यक्ष ब्रिटवेलचेच धोरण बरोबर असल्याचा निर्वाळा देतात. एवढेच काय, पण ब्रिटन–अमेरिकेचे संयुक्त धोरण पुढे हाकण्यासाठीच्या समितीचे सूत्रचालन ब्रिटवेलने करावे असे सूचवतो. आक्रमक राष्ट्रवादाचा हा उघड उघड पराभवच असतो. ब्रिटवेलचे धोरण सुरुवातीपासूनच व्यवहारवादी, मानवतावादी असते आणि बदलत्या काळाची चाहूल घेणाऱ्या द्रष्ट्याप्रमाणे तो गर्जून सांगत असतो. शेवटी माझेच धोरण योग्य ठरणार. भारताला मदत ही काळचा राष्ट्रवादाला मदत आहे, गरीब राष्ट्रांना विकासासाठी केलेले साहाय्य आहे असे तो सांगत असतो. हे जर घडले नाही, तर सारी गरीब राष्ट्रे एकत्र येऊन मूठभर श्रीमंतांना नामशेष करतील. सारे काळे गोऱ्यांविरुद्ध उठतील आणि जगभर वर्णसंघर्ष सुरू होईल, अशी भयंकारी भविष्यवाणी तो उच्चारत असतो. हे सारे टाळायचे असेल, तर श्रीमंत राष्ट्रांनी गरीब राष्ट्रांना मदत दिलीच पाहिजे, हे म्हणणे अखेर अमेरिकेलाही मानावे लागते. कारण या प्रकरणावरून अमेरिकेतच वांशिक दंगली उसळतात. आणि अमेरिकन राज्यकर्त्यांचे डोळे उघडतात. असे हे ब्रिटन-अमेरिकेच्या कुटिल राजकारणाचे दर्शन.

या कादंबरीच्या तपशीलातही वास्तवात बराच फरक पडताना जाणवतो. पण मध्यवर्ती सूत्र मात्र खरे ठरल्याचे दिसते. भारताने आपले स्वतंत्र स्थान तर कायम राखलेच, पण सी. आय. ए. च्या कुटील कारवायांवर आपल्या राज्यकर्त्यांनी मात केली आहे, असे इंदिरा गांधींच्या भाषणांवरून दिसते. भारतीय लष्करी नेत्यांबाबतचा क्लार्कचा अंदाज तर साफ चुकला. अर्थात आशियात सर्वत्र–अगदी नूतन बांगला देशातसुद्धा–लष्करी क्रांत्या घडत असताना, भारत त्याला अपवाद राहू शकणार नाही असे क्लार्कला वाटणे अगदी स्वाभाविक आहे. पण भारतीय जनता आणि राजकारणी यांची नस भल्याभल्यांना गवसली नाही तेथे क्लार्कची काय कथा ! भारतातील घटनांची संगती लावणे अतीव अवघड आहे हे आता तरी त्यांना पटले असावे. तरी एखादे जबरदस्त मध्यसूत्र सांगण्याच्या नादात तपशीलातले फरक कादंबरीकाराला माफ असायला हरकत नाहीत.

अशा या दोन जबरदस्त राजकीय कादंबऱ्या. यातील भविष्यवाणीने खळबळ उडवली नसती तरच नवल. एखाद्या ज्योतिषाने नव्हे, तर कादंबरीकाराने हरघडी बदलणाऱ्या आंतरराष्ट्रीय राजकारणाचा असा भविष्यलक्षी वेध समर्थपणे घ्यावा हे निश्चितच त्याची वज्रता दर्शविणारे आहे. दोन्ही कादंबऱ्यांत त्याने निर्माण केलेले वातावरण, वेधक प्रभावी व्यक्तिदर्शन, महत्त्वाच्या क्षणी उच्चपदस्थांचे उघडे पडणारे क्षुद्रपण, अंतर्गत राजकारणातल्या बारीकसारीक खाचाखोचा व तपशील, पत्रकारांचे उपद्व्याप, नेत्यांचे एकमेकांवर कुरघोडी करण्याचे प्रयत्न यांचे वास्तववादी दर्शन आपल्याला जागच्या जागी खिळवून ठेवते. राज्यशास्त्रांचे अनेकानेक ग्रंथ वाचून राजकारणाची जी समज येणार नाही ती अशा कादंबऱ्यांनी येऊ शकेल इतके तिचे सामर्थ्य आहे.

मराठी वाचकांसाठी एक वेगळे दालन या निमित्ताने खुले होत आहे. आपल्या वाचकांना हे सांगितलेच पाहिजे या भूमिकेतून वि. रा. करंदीकर यांनी हे अनुवाद केले आहेत. पुण्याच्या दै. सकाळमध्ये सहसंपादक म्हणून काम करणाऱ्या त्यांच्यासारख्या पत्रकाराचे लक्ष या कादंबऱ्यांनी वेधावे हे सहजच होते. खरे तर या सर्व घटनांचे

संदर्भ अनेकवार त्यांनी रोजच हाताळले आहेत, अनुवादले आहेत. त्या त्या दिवशी चकित होत्सात्या चर्चा केल्या आहेत. पण या साऱ्या घटना जेव्हा एका सूत्रात गुंफून सुसंघटित कथारूपाने समोर येतात तेव्हा त्या अविश्वसनीय वाटतात, चक्रावून टाकतात. दैनंदिन राजकारणावर आंतरराष्ट्रीय घटनांचा किती परिणाम होत असतो हे दाखवून देतात. म्हणूनच करंदीकर म्हणतात त्याप्रमाणे मराठी वाचकांना हे सांगितलेच पाहिजे की ही सणक त्यांनी प्रत्यक्षात आणली, कर्तव्यबुद्धीने आणली, आणि त्यात ते खूपच यशस्वी झाले आहेत.

या दोन्ही कादंबऱ्या वाचत असताना त्यामध्ये घडणाऱ्या घटना व संदर्भ परकीय राजकारणाचे आहेत, त्यामुळेच ते नीट समजून घेऊन वाचावे लागतात. एरवी हे भाषांतर आहे, हे खरे वाटणार नाही एवढ्या सहजपणे त्यांनी ते निवेदन केले आहे. भाषेचा अस्सल मराठीपणा ठायी ठायी जाणवतो. इंग्रजी मूळ शब्दांना आणि महत्त्वाच्या वाक्यांना त्यांनी योजलेले प्रतिशब्द आणि वाक्ये अगदी चपखल बसतात. अशी प्रतियोजलेली काही वाक्ये तर मराठीत स्वतंत्र ठरतील अशी आहेत. उदा. राजकारण हा शापभ्रष्ट धंदा आहे. राजकारण हे सायकल चालवण्याइतके सोपे आहे. जोपर्यंत तुम्ही पुढेच जात असता तोवर तुम्ही पडत नसता वगैरे.

वास्तवात नंबर टेन व ऑपरेशन राजा या पूर्णपणे स्वतंत्र कादंबऱ्या आहेत. म्हणजे त्या एकमेकाचा पूर्वार्ध-उत्तरार्ध वगैरे नव्हेत. पण या दोन्हींत वावरणाऱ्या व्यक्ती एकच असल्यामुळे भाषांतरित कादंबऱ्यांत ही सुधारणा केली गेली आहे. नंबर टेनचा काळ आधीचा असल्याने तो पूर्वार्ध व ऑपरेशन राजा त्याचा उत्तरार्ध ठरतो. अर्थातच मुळातच त्या स्वतंत्र असल्याने त्यांच्या स्वतंत्र मूल्यांवर या पूर्वार्ध-उत्तरार्धाच्या शिक्क्याने काही परिणाम घडत नाही म्हणून त्या स्वतंत्रपणेही तितक्याच वाचनीय ठरतात.

आफ्रिकन राष्ट्रांत व इंग्लंडमध्ये राजदूत म्हणून उत्कृष्ट कामगिरी बजावलेल्या अप्पासाहेब पंतांची नंबर टेनला लाभलेली प्रस्तावना वाचकांना मार्गदर्शक आहे. त्यांनी आजच्या बदलत्या राजकारणाचे केलेले वर्णन वाचकाला वास्तव पातळीवर ठेवते. ऑपरेशन राजाला करंदीकरांचे वरिष्ठ सहकारी सकाळचे संपादक श्री. ग. मुणगेकर यांची प्रस्तावना लाभली आहे. मुणगेकरांची भूमिका केवळ आपल्या सहकाऱ्याच्या प्रशस्तीची नाही. आफ्रिका खंडावर सकाळने फार पूर्वीपासून लक्ष पुरविले आहे. त्या भूमिकेचे एक महत्त्वाचे शिल्पकार व राजकीय समीक्षक म्हणून ते विवेचन करताना दिसतात. ◻

१ : नंबर टेन
२ : ऑपरेशन राजा
वि. रा. करंदीकर
सुरस प्रकाशन, सोलापूर
किंमत प्रत्येकी १५ रु.


# राजहंस प्रकाशन सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शिलंगणाचं सोनं | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| २ | शनवारवाड्यातील शमादान | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| ३ | पुरंदरच्या बुरुजावरून | ब. मो. पुरंदरे | ४ – ०० |
| ४ | पुरंदऱ्यांचा सरकारवाडा | ब. मो. पुरंदरे | ७ – ०० |
| ५ | फिडेल, चे आणि क्रांती | अरुण साधू | ७ – ०० |
| ६ | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २ – ०० |
| ७ | सहा साहसे | दा. सी. देसाई | २ – ०० |
| ८ | पूर्णिया | अनिल अवचट | ६ – ०० |
| ९ | गुजराथेतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७ – ०० |
| १० | कोठे आणि कधीतरी | डॉ. सुधीर फडके | १० – ०० |
| ११ | रातराणी | विजय तेंडुलकर | १२ – ०० |
| १२ | आणि ड्रॅगन जागा झाला | अरुण साधू | १४ – ०० |
| १३ | एका पराभवाची कहाणी | अनंत भावे | १५ – ०० |
| १४ | शतपावली | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १५ | श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर | १५ – ०० |
| १६ | आनंदाच्या दाही दिशा | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १७ | नाझी भस्मासुराचा उदयास्त | वि. ग. कानिटकर | ४५ – ०० |
| १८ | पॅपिलॉन | रवींद्र गुर्जर | २५ – ०० |
| १९ | हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा | अशोक परळीकर | १२ – ०० |
| २० | देवाघरचा पाऊस | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| २१ | मॅक्झिम गॉर्की | सुमती देवस्थळे | १० – ०० |

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### ८।५।७६ ते १४।५।७६

**मेष : बरीच अनुकूलता**

या आठवड्यात सुखस्थानी कर्कराशीत शनि-मंगळ युती होणार आहे. शनि-मंगळ युती म्हणजे तुम्ही घाबरून जाण्याचे कारण नाही. सध्या तुमचा त्राता आहे गुरू. आणि तो आहे राशीत. त्यामुळे या युतीचा तुम्हाला कोणताच तसा फारसा त्रास होणार नाही. पण मित्रहो, या आठवड्यात तुम्ही तुमच्या मुलांना दुखवू नका, बोलू नका. उगाच मागाहून मनाला त्रास होईल. नोकरीत वरिष्ठांकडून थोडी कानउघाडणी झाली तरी ती फारशी मनावर घेऊ नका. स्थावराची, घराबद्दलची व शेतीविषयक कामे कायद्याच्या दृष्टीने योग्य करून घ्या. बेकारांना मदत मिळेल. कौटुंबिक सुखात वाढ होईल. धंदा व्यापारात थोडी प्रगती होईल शुभ दिनांक ८–१०–११.

**महिलांना :** मातृसुख मिळेल. खूप दिवस न भेटलेली माणसे भेटतील. थोरामोठ्यांचा आशीर्वाद मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** पालकाकडून बोलून घ्यावे लागेल पण त्यामुळे डोक्यांत राख घालून घेऊ नका. मन संयमी ठेवा.

**वृषभ : अडचणीवर मात**

धंदा-व्यवसायाच्या विस्तारावर शनि-मंगळाची युती होत आहे. कर्क रास ही तुमच्या तृतीय स्थानी आहे व तेथे ही युती होत आहे. या युतीचे परिणाम प्रतिकूल होतात असे अनेकांचे मत असले, तरी तुम्ही त्यावरून निराश होण्याचे मुळीच कारण नाही. शनि-मंगळ तिसरे होत आहेत. त्यामुळे धंद्याच्या विस्ताराच्या नव्या योजना आखल्या जातील. त्यासाठी श्रीमंत, भांडवलदार, पैसेवाले यांचे मोठे सहकार्य तुमच्या वाट्याला येईल. अनेक दिवस एखाद्या अडचणीमुळे तुम्ही कोंडीत सापडला असाल, तर त्यातून तुम्ही बुद्धिकौशल्याने मात करू शकाल. नोकरीत बदली व कामाचा बदल होण्याची बरीच शक्यता आहे. नातेवाईक व मित्रांचे सहकार्य मिळेल. दुखावलेली माणसे जवळ येतील. पैशामुळे अडून राहिलेल्या योजना प्रत्यक्षात आणण्याच्या दृष्टीने अनुकूलता लाभेल. बेकारांना दिलासा मिळेल. शुभ दिनांक ८–१०–१२.

**महिलांना :** मनांत शंका-कुशंका ठेवून वागत राहू नका. विशेषतः नोकरीत कामाच्या बाबतीत कडक रहा.

**विद्यार्थ्यांना :** विज्ञान विषयात विशेष प्रगती मिळेल. कलाविषयक वृत्तीला प्रोत्साहन मिळेल.

**मिथुन : सुधारणेला वाव**

गेल्याच आठवड्यात मंगळ बदलला आहे. शनि-मंगळ युती दुसऱ्या स्थानी होत आहे. त्यामुळे गांगरून न जाता परमेश्वरावर निष्ठा ठेवा व थंड वृत्तीने काम करा. तुमच्या भोवती अनेक दिवस कोंडाळे करून राहिलेली अडचणीची परिस्थिती हळूहळू सुटत जाणार आहे. उद्योगधंद्यात सुधारणा होऊ शकेल. मनोरथ पूर्ण होण्याच्या दृष्टीने घटना घडतील. नोकरीतील पेचप्रसंग सुधारण्याच्या दृष्टीने पावले पडतील. व्यापाराने नव्या आशा-आकांक्षा निर्माण होतील. उद्योगात नवे भांडवल गुंतवण्यात येईल. जुने पैसे वसूल होणार असून बुडणारे पैसे मिळण्याची आशा निर्माण होईल. कौटुंबिक साहाय्य मिळेल. लेखनात नवे पर्व सुरू होईल. उत्तम कल्पना सुचतील. आर्थिक परिस्थिती सुधारेल. वकिली व्यवसाय सुधारेल. राजकारणात पुढे पाऊल पडेल. शुभ दिनांक ८–९–११.

**महिलांना :** धंद्याच्या वाढीला प्रोत्साहक घटना घडतील. पैसा बरा मिळेल. नोकरीत सुख व स्वास्थ्य मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** आळस दूर होईल. उदासपणा कमी होईल. मन प्रसन्न होईल.

**कर्क : संयम ठेवण्याची गरज**

या आठवड्यात शनि-मंगळाची युती तुमच्या चंद्रावर होणार आहे. ही युती तुमच्या बाबतीत फार प्रतिकूल वा निराशा निर्माण करणारी ठरणार नाही याची खात्री बाळगून कामाला लागा. नोकरीत भडका उडेल असे वरिष्ठांचे वा हाताखालच्या लोकांचे वर्तन घडले, तरी डोके शांत ठेवून त्याचा निरास करा. राजीनामा देण्याची, भांडण करण्याची वृत्ती बळावेल. पण त्यावर संयमाने मात करा. सुदैवाने गुरू तुम्हाला अनुकूल आहे. त्यामुळे तो तुमच्या हातून विचित्र असे काही घडू देणार नाही. यावेळी प्रवासाचा बेत मात्र पुढे ढकला. विशेषतः ड्रायव्हर व वाहन हाकणारे यांनी काळजी घ्यावी. बेकारांना थोडे थांबावे लागेल. शुभ दिनांक ९–१०–१२.

**महिलांना :** फार जवळच्या व्यक्तीचा विरह थोडाफार सहन करावा लागेल. नोकरीत कामाचा ताण वाढेल.

**विद्यार्थ्यांना :** वाहनाने प्रवास टाळा. वाहने हळू हाका. तब्येतीची काळजी घ्या.

**सिंह : किरकोळ त्रास**

या आठवड्यात शनि-मंगळाची युती तुमच्या व्ययस्थानी होत आहे याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. एवढे खास ध्यानी ठेवा की तुमचे ताबडतोब काही नुकसान होईल असे नाही. तरीपण तुम्हाला साडेसाती आहे, त्यातच हे दोन ग्रह एकत्र येत आहेत. म्हणूनच खचून न जाता मार्गदर्शन समजून प्रत्येक व्यवहार करा. योजलेल्या कामात अडथळे येणे, ठरलेला बेत लांबणीवर पडणे अशा प्रकारच्या घटना यावेळी घडू शकतील. नोकरीत यावेळी तुम्ही रजा वगैरे अजिबात न घेणे हिताचे ठरेल. आर्थिक बाजू भक्कम राहणे अवघड आहे. व्यापारी लोकांनी वायदे बोलताना दक्षता घ्यावी. पैसा, हिशोब, पत्रव्यवहार इत्यादी कामे ज्यांच्याकडे आहेत त्यांनी काळजी घ्यावी. शुभ दिनांक १२–१३.

**महिलांना :** शेजाऱ्याबरोबर भांडणे होऊ देऊ नका. आर्थिक व्यवहारात फसवणूक होण्याची शक्यता आहे.

**विद्यार्थ्यांना :** मानसिक त्रासासाठी व्यसनाच्या आहारी जाऊ नका.

**कन्या : मानसिक स्वास्थ्य**

अकरावा शनी आहे व त्यालाच भेटायला आता मंगळही आला आहे. शनी-मंगळाची ही युती तुम्हाला निश्चितच वाईट नाही. मूळचा शनी जर अनुकूल असेल, तर या युतीमुळे तुमचा फायदाच होईल. रेस, लॉटरी यांमुळे अकल्पित धनलाभाने नशीब फळफळण्याची शक्यता नाकारू नका. चालू व्यवसायात बरीच सुधारणा होईल. प्रतिष्ठा उंचावेल. राजकारणी, समाजधुरीण अशा थरांतील मोठ्या व्यक्तींबरोबर जिव्हाळ्याचे संबंध जुळून येतील. मनात ठरवलेला महत्त्वाचा पत्रव्यवहार पार पडेल. नोकरीत त्रास कमी होऊन दगदगही कमी होईल. अनेकांचे सहकार्य मिळेल. शरीरप्रकृती सुधारत असल्याचा प्रत्यय येईल. शुभ दिनांक ८–९–११.

**महिलांना :** मानसिक त्रास कमी कमी होऊ लागेल. उत्साहाने कोणतेही काम करावे असे वाटू लागेल. जबाबदारी पार पाडाल.

**विद्यार्थ्यांना :** वाङमयीन वातावरणात दिवस जातील. पैसा कमी पडणार नाही.

**तूळ : चांगला अनुभव**

दशमस्थानी झालेली शनि-मंगळाची युती तुमच्या पथ्यावर पडली तर आश्चर्य मानू नका. ही युती फार वाईट असते असा समज करून देण्यात आला असला, तरी त्याचा एवढा गंभीरपणे विचार करण्याचे कारण नाही. धंदा, उद्योग, व्यापार, व्यवसाय या सर्वच बाबतीत या युतीचा काही अनुकूल परिणाम दिसून येईल. व्यापारात मंदी असली तर ती कमी होऊ लागेल. चालू धंदा बरकत घेऊ लागेल. नोकरीत महत्त्वपूर्ण घटना घडतील. प्रमोशन मिळेल. सेवानिवृत्ती आली असेल तर मुदतवाढ मिळेल. जुना पगार वसूल होणे असेल तर तो मिळेल. कलावंताचे नाव गाजेल. कला व प्रसिद्धी यांचा सुंदर संगम होईल. प्रवासात अनेकांच्या ओळखी भावी काळात फायदेशीर ठरतील. शुभ दिनांक १०–११–१३

**महिलांना :** नोकरीत प्रमोशन व अधिकार वाढ मिळेल. वाङमयीन प्रसिद्धी व कीर्ती मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** सिनेक्षेत्रात प्रयत्न करा, प्रवेश मिळेल. परीक्षेत सफलता मिळेल.

**वृश्चिक : उद्योगात प्रतिष्ठा**

राशिस्वामी मंगळ शनीला दि. १२ रोजी कर्कराशीत भेटत आहे. ही युती तुमच्या भाग्यस्थानी होत आहे, ती प्रतिकूल आहे असे मानू नका. उलट काही चांगला प्रत्यय या वेळी येईल. स्थावराचा प्रश्न लोंबकळत पडला असेल तर त्याला चालना मिळेल. शेतीसाठी तुम्हाला काही प्रयत्न करावयाचे असतील तर ते या वेळी करा. ज्यांना जमीन खरेदी करावयाची असेल, त्यांना ती या वेळी खरेदी करायला बरीच अनुकूलता आहे. राहू-हर्शलच्या व्ययस्थानी होणाऱ्या भ्रमणामुळे पैसा वाजवीपेक्षा जास्त खर्च होत आहे. आणि त्याला अजून तरी काही काळ तोंड दिल्याखेरीज इलाज नाही. नव्या उद्योगाची सुरुवात करताना श्रम व पैसा जास्त खर्च होईल. पण बरीच अनुकूलता असल्यामुळे आशाआकांक्षा सफल होतील. नोकरीत प्रमोशन मिळेल. शुभ दिनांक १०–१२–१३

**महिलांना :** स्वत:चे घर होण्याची इच्छा तुम्ही मनात बाळगली असेल, तर त्याला अनुकूलता आहे. माहेरची संपत्ती मिळण्याचा संभव आहे.

**विद्यार्थ्यांना :** शैक्षणिक क्षेत्रात तुम्ही केलेल्या श्रमाचे चीज या वेळी होईल. काही स्थित्यंतर घडेल.

**धनु : मानसिक आनंद**

मेष राशीत गुरू येऊन दाखल झाल्यापासून, खरे तर तुमचे सारे तंत्र सुधारले आहे. अनेक बाबतीत तुमच्या कर्तृत्वाला नवी नवी क्षितिजे मिळत आहेत. आशाआकांक्षांना मोहर येत आहे. महत्त्वाकांक्षा उत्तुंग झेप घेत आहेत. विरलेल्या स्वप्नांना पालवी फुटत आहे. तो प्रत्यय या आठवड्यात येईल. शनि-मंगळाची युती अष्टमस्थानी झाली तरी ती तुम्हाला वाईट नाही. आर्थिक व मानसिक स्वास्थ्य तुमच्यापासून दूर गेले आहे ते पुन्हा तुमच्याजवळ येण्याची चिन्हे दिसू लागणार आहेत. नोकरीत आशादायक स्थित्यंतर घडू शकेल. पगारवाढ, प्रमोशन असे काही तरी मिळू शकेल. मालक अगर वरिष्ठ साहानुभूतीने वागतील. अनेक बाबतीत चांगले हितसंबंध प्रस्थापित होतील. कौटुंबिक स्वास्थ्य मिळेल. शुभ दिनांक १०-१२

**महिलांना :** व्रतवैकल्याची अपुरी राहिलेली इच्छा पुरी होईल. स्वतंत्र उद्योग सुरू करण्याला उत्तेजक असे सहकार्य मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** या वेळचे ग्रहमान तुमच्या मनाला प्रोत्साहक आहे. मानसिक आनंद मिळेल.

**मकर : स्त्रीकडून धनलाभ**

चौथा गुरू मानसिक स्वास्थ्याला तेवढासा अनुकूल नसला, तरी नुकसानकारक मात्र मुळीच नाही याची मनात खात्री बाळगा. मधून मधून आत्मविश्वास ढळला आहे की काय, असा संशय आला, तरी तुमच्या रोजच्या कार्यक्रमात कोठेही अडथळा येणार नाही. शनि-मंगळाची सप्तमस्थानातील युती तुम्हाला स्त्री-धनाचा योग आणणार आहे असे मानायला हरकत नाही. संसारात पति-पत्नीत मधून मधून खटके उडतील पण त्याने प्रेम वाटायला मदत होईल. सिनेमा नटनट्या यांना हा आठवडा प्रगतीकारक जाईल. जे कलावंत उपेक्षित आहेत त्यांची नावे पुन्हा झळकू लागणार आहेत. नोकरी नसणाऱ्यांना नोकरी अगर औद्योगिक मदत मिळेल. ज्यांच्या नोकऱ्या कायम नसतील त्यांच्या नोकऱ्या कायम होतील. शुभ दिनांक १३–१४.

**महिलांना :** कौटुंबिक सुख आणि आनंद घेऊन हा आठवडा उगवत आहे. विवाहेच्छूंचे विवाह ठरू शकतील.

**विद्यार्थ्यांना :** आंतरिक प्रीतीचा प्रत्यय येईल. पैसा व प्रसिद्धी मिळेल.

**कुंभ : नव्या क्षेत्रात पदार्पण**

तिसरा गुरू आणि शत्रुस्थानी झालेली शनि-मंगळाची युती तुम्हाला फारच उत्तम आहे. तुम्ही राजकारणात असाल, तर अत्यंत महत्त्वाचे स्थान तुम्हाला लाभणार आहे. कितीही विरोधक असू देत, विरोधकांची शक्ती कितीही जबरदस्त असू दे, ते तुमचे काहीही वाईट करू शकणार नाहीत. तुमच्या महत्त्वाकांक्षा अनेक प्रकारे अनपेक्षितपणे आकार घेऊ लागतील. लोकप्रियता व यशाची कीर्तिकुंडले अलगदपणे तुमच्या मस्तकी येऊ लागतील. नोकरीधंद्याची परिस्थिती समाधानकारक राहील. धंद्यात नवे तेज निर्माण होईल. अनेक दिवस बेत आखत होतात त्याला उत्तेजन मिळेल. पैसा व भांडवल जमा करता येईल. सरकारी मदत मिळू शकेल. बँकेसंबंधी कामे पुरी होतील. नोकरीत जबाबदारी व अधिकार वाढून तुमचे महत्त्व वाढेल. मन उत्साही राहील. शुभ दिनांक १२–१३.

**महिलांना :** सार्वजनिक कामात प्रतिष्ठा मिळेल, श्रेय मिळेल. महिलामंडळात मानाचा तुरा झळकेल.

**विद्यार्थ्यांना :** विद्यार्थ्यांनी व्यापारी क्षेत्रात पदार्पण करण्यास अनुकूलता आहे.

**मीन : आर्थिक स्वास्थ्य**

राशीस्वामी दुसरा आहे. शनी-मंगळाची युती पंचमस्थानी झाली आहे. हे सारे गृहमान तुमच्या प्रगतीला पोषक आहे. उद्योगधंदा भरभराटीला येईल. नवे काही तरी करू शकाल. लेखकांना चांगला सप्ताह आहे. रेंगाळलेले लेखन पुरे होईल. लेखकांच्या ग्रंथांना सरकारी पुरस्कार मिळण्याची शक्यता आहे. प्रसिद्धी व कीर्ती यांचा इतका छान योग नजिकच्या काळात येईल की नाही हे सांगणे कठीण. प्रकाशकांच्या धंद्याला बरकत येईल. कागद व स्टेशनरी व्यापारांत विक्री वाढून नफा मिळेल. नोकरीची परिस्थिती अनुकूल राहील. अधिकार वाढून बदली होण्याची शक्यता आहे. बदली लाभदायक होईल. विवाहाचा प्रश्न मार्गी लागेल. कौटुंबिक स्वास्थ्य मिळेल. शुभ दिनांक १२–१४.

**महिलांना :** नोकरीची शाश्वती मिळेल. चालू नोकरीत प्रतिष्ठा व प्रमोशन मिळेल. स्वास्थ्य मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** परीक्षेत मोठे यश मिळेल. संशोधन क्षेत्रात काम मिळेल. नवा अभ्यासक्रम घेता येईल. ☐

हिंदी चित्रपट

# बारूद आणि खलिफा

शिरीष सहस्रबुद्धे

'जिद्दी', 'लव्ह इन् टोकियो', 'जुगनू' आणि 'नया जमाना' वगैरे गाजलेल्या चित्रपटांचे यशस्वी आणि धाडसी दिग्दर्शक चक्की ऊर्फ प्रमोद चक्रवर्ती यांनी जुगनू एंटरप्रायझेस्च्या बॅनरखाली आता बारूद नामे एक अतीव अद्‌भुत आणि चमत्कृतिजन्य चित्र निर्माण केले आहे. या चित्ररत्नाचे दर्शन घेणाऱ्या भोळ्या-भाविक प्रेक्षकांस कित्येकदा, आपण पेटत्या झोत-भट्टीसारख्या तपमानाच्या एखाद्या चित्रगृहातील चावणाऱ्या खुर्चीवर बसलो आहोत याचे विस्मरण पडून, आपण बाइस्कोपमधून जगाच्या सफरीला तर निघालो नाही ना, असा अगाध संभ्रम वाटू लागतो व चित्रपटास आपोआपच आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त होतो. या चित्रपटाच्या नावाचा कथेशी संबंध नाममात्रच असला, तरी त्या नामाचा महिमा मात्र जगप्रवासास उत्सुक मंडळींमध्ये वेगाने वाढत आहे. अशा या आंतरराष्ट्रीय चित्रपटाची कथा हुडकून काढण्याचा केलेला दुष्ट प्रयत्न येणेप्रमाणे—

दुर्गाप्रसाद सक्सेना (डॉ. श्रीराम लागू) हे पोलिस इन्स्पेक्टर स्मलगरांचा बीमोड करून राष्ट्रपतिपदक मिळवितात. या समारंभानंतर आपल्या मुलाला घेऊन ते थेट समुद्रकिनारा गाठतात व मुकेशच्या आवाजात एक बऱ्यापैकी व जोरकस गाणेही गातात. गाणे संपले आहे व छोटा अनूप झुडुपाआड व्यवस्थित लपला आहे याची बहुधा खात्री करून घेतल्यानंतरच मागे बीमोड केलेल्यांपैकी चार स्मगलर्स (अजित, प्रेम चोप्रा, सुजितकुमार व मनमोहन) अचानक हल्ला करून इन्स्पे. सक्सेना यांना ठार मारतात. निःशस्त्र असल्यामुळे 'पुराने बारूदसे नयी चिनगारियाँ निकलती रहेंगी,' असा ज्वालाग्राही इशारा तोंडीच देऊन देशभक्त सक्सेनाजींचा ग्रंथ आटोपतो; आणि इतक्या झटक्यात डॉ. लागूंचा निकाल लागल्याने 'आपला' प्रेक्षक जरा जास्तच हळहळतो.

आता बिचाऱ्या अनूप सक्सेनाला (ऋषि कपूर) स्वाभाविकपणेच या चौकडीचा सूड घेणे आले. बरं, ते चौघे तर परदेशी पळालेले, तेव्हा दिग्दर्शकालाही पाठोपाठ हिंडून परदेशी चित्रिकरण करणे ओघानेच आले. 'कुटुंबातील व्यक्तींच्या हत्येचा प्रसंग एखाद्या शिल्लक व्यक्तीने पाहणे व खुन्यांचा सूड घेणे' ही वेस्टर्न पिक्चर्सवरून आपण उचललेली लेटेस्ट आयडिया आहे. 'यादोंकी बारात', 'जंजीर', 'शोले', अशा अनेक अलीकडच्या चित्रपटांत ती राबवली आहे. बारूदनेही याच रुळल्या राजरस्त्यावरून वाटचाल—किंवा उड्डाण—केलेलं आहे. असो. तेव्हा महत्त्वाची गोष्ट म्हणजे तरुण अनूप सक्सेना या चारही खुन्यांना वन् बाय वन् उडवतो. यासाठी त्याला अमेरिका, स्वित्झर्लंड, स्पेन, फ्रान्स वगैरे विविध देशांचा दौरा अगदी नाइलाजाने करावा लागतो. या प्रकारातच, अजितची सेक्रेटरी रीना रॉय-सारख्या खूबसूरत लड़कीशी त्याला प्रेमाचे खेळही खेळावे लागतात. तथापि 'ड्यूटी फर्स्ट' म्हणून, 'मैं तुम्हें हमेशा याद रखूंगा' असा एक जज्बाती संदेश ठेवून तो तिचा निरोप घेतो.

अर्थात अनूप एकंदरीने काय काय करतो याची यादी बरीच लांब होईल. विशेषतः स्टंटपटाच्या किंवा 'वेस्टर्न थ्रिलर'च्या नायकालाही लाजवतील अशा साहसी करामती करायला लावून चक्कीभाईंनी ऋषिकपूरचा किंवा त्याच्या 'डमी'चा—चांगलाच घाम काढला आहे. वस्तुतः 'बारूद' पेक्षा 'अराऊंड द वर्ल्ड' किंवा 'सुपरमॅन इन् ॲक्शन' ह्यांतलं एखादं नाव या चित्रपटाला जास्त शोभलं असतं. परदेशी चित्रीकरण करण्यावर आता कायद्याने बंदी येऊ घातली असली, तरी असे विदेशदर्शन हे सामान्य प्रेक्षकांना मोहविणारे आणि म्हणूनच व्यावसायिकदृष्ट्या 'सेफ' असते, हे इंगित प्रमोद चक्रवर्तींनी बरोबर ताडलेलं आहे, आणि म्हणूनच अशा मोहक दृश्यांचे नयनरम्य छायाचित्रण ही या चित्रपटाची एक—किंवा एकमेव—जमेची बाजू ठरते. हिंदी चित्रपटांचा दर्जा तांत्रिकदृष्ट्या अलीकडे सुधारत असला, तरी केवळ छायाचित्रणाला प्रेक्षकांची दाद मिळावी असं क्वचितच घडतं. 'बारुद'चे छायालेखक मात्र याबाबतीत अभिनंदनपात्र ठरतात; कारण प्रेक्षक, प्रेक्षागृहातून बाहेर पडतात, ते बर्फाच्छादित आल्प्सची आणि अन्य वैभवशाली पाश्चात्य शहरांची डोळे दिपवणारी दृश्ये आठवावीतच.

ऋषिकपूरने 'बारूद' मध्ये सुपरमॅनची भूमिका केलेली आहे, असं म्हणायला हरकत नाही. यात त्याने जगातल्या बहुसंख्य वाहनांमधूनविक्रमी सफरी केलेल्या आहेत. मोटरसायकलवरून त्याने घेतलेल्या झेपांची संख्या पाहिली तर, तो जमिनीवर फारच थोडा वेळ प्रवास करीत असल्याचे आढळून येते. चपला बदलाव्यात तितक्या सहजपणे त्यानं मोटरी उडवल्या आणि फिरवल्या आहेत. याशिवाय विविध प्रकारची विमाने, भुयारी रेल्वे, मोटरलाँचेस् वगैरे सेवेला सज्ज आहेतच. 'एक दुश्मन से प्यार आया है' हे द्वंद्वगीत तर चक्क ग्लायडर्समधून उडताना म्हटले आहे. अर्थात प्रमोदभाईंचा तो छंदच आहे. 'जुगनू' मध्येही एक द्वंद्वगीत त्यांनी हेलिकॉप्टरमध्ये चित्रित केले होतेच. या अखंड प्रवासातून सवड मिळेल तसतशी चमक दाखवण्याचा प्रयत्न ऋषीनं इमानेइतबारे केला आहे. अनेक फ्लॉप् पिक्चर्सनंतर बारूदनं त्याला हात द्यायला हरकत नाही असं त्याच्या कामावरून जरूर वाटतं. शोभा आनंद ही नवी नायिका हे प्रमोद चक्रवर्तींचं नवं 'फाईंड' असलं तरी तिला मिळालेली भूमिका पारंपारिक आहे; म्हणजे ती ऋषीच्या दुश्मनची—अजितची—बेटी असते, परंतु प्रमोद चक्रवर्तींनी या भूमिकेला दिलेली 'ट्रीटमेंट' मात्र, ऋषीने शोभाला दिलेल्या ट्रीटमेंटइतकीच वेगळी आहे, ट्रॅडिशनल नाही किंवा रोमँटिकही नाही. इथे ऋषी तिच्या प्रेमपाशात बद्ध वगैरे होत नाही, तर तिच्या बापाला ब्लॅकमेल करण्यासाठी तिला चक्क

पळवून नेऊन कोंडून ठेवतो. अर्थात शेवटी 'एक दुश्मन से प्यार' वगैरे प्रकार होतातच ही गोष्ट वेगळी, पण कथेची गरज लक्षात घेऊन दाखवलेला हा संयम प्रशंसनीय. असाच संयम दाखवून या चित्रपटात ती तथाकथित कॉमेडी पूर्णतः टाळण्यात आलेली आहे आणि मूळ कथानकावरच लक्ष केंद्रित करण्यात आलेलं आहे हा एक सुखद धक्का. शोभा आनंदबद्दल अपेक्षा बाळगायला जागा आहेत. पाहुण्या कलाकारांत, असरानी अतिरेक करतो. धर्मेंद्र–हेमा मजा आणतात. अशोककुमार व रीना रॉय यांनी बारूदमध्ये विशेष दुय्यम भूमिका केलेल्या आहेत. यांपैकी अशोककुमारची (प्रा. गुप्ता, प्रोफेसर ऑफ क्रिमिनॉलजी) कॅरॅक्टर, चक्रवर्तींनी सरळसरळ वाया दवडली आहे. चित्रपटभर हा गृहस्थ भटकण्यापलीकडे कोणतीही महत्त्वाची भर घालताना दिसत नाही. त्याचे अखेरचे हृदयपरिवर्तनही नाटकी व अविश्वसनीय ठरते. उलट रीना रॉयनं आपल्या कामात जाण आणली आहे. तिच्या वाट्याला अलीकडे साहाय्यक भूमिकाच अधिक येत आहेत असे दिसते. प्रमोदभाईंच्या दिग्दर्शनात नावाजण्यासारखे काहीच नाही. चित्रपटाची गती त्यांनी व्यवस्थित सांभाळली आहे; एरवी चित्रपटाची सूत्रे फाइट कंपोजर, स्पेशल इफेक्ट्स्, इनचार्ज आणि तत्सम मंडळींच्या हातीच सोपविल्यासारखीच वाटतात. कथानक, पटकथा व दिग्दर्शन यांत कुठेही कार्यकारणभाव नाही, असंभाव्य आणि अतर्क्य घटनांची रेलचेल आहे.

बारूद हा चित्रपट 'पहायचा' आहे, ऐकायचा नाही, या विधानाला त्याच्या संगीतामुळे पुष्टीच मिळते. श्रेष्ठ दिवंगत संगीतकार सचिनदेव बर्मन यांचे संगीत लाभलेला बारूद श्रवणीय नाही. पार्श्वसंगीत हा बहुशः कर्कश वाद्यांचा ठणठणाट वाटतो. स्टीरिओ इफेक्ट तर अधिकच त्रासदायक ठरतो. तथापि चित्रपटाच्या प्रकृतीलाही ते एकंदरीत शोभून दिसतेही. चित्रपटात एकूण चार गाणी आहेत; आणि कामचलाऊसुद्धा आहेत. अगदी वाईट आहेत असं नाही, पण शब्दजुळारी आनंद बक्षींच्या करामतीमुळे असेल कदाचित, ती सचिनदांची वाटत नाहीत, एवढेच.

◻

## खलीफा — सक्तमजुरी

प्रसिद्ध विनोदी अभिनेते आय. एस. जोहर यांनी मागे एका मुलाखतीत, हिंदी चित्रपटांचे फक्त दोनच प्रकार असल्याचं सांगितलं होतं. एक : वाईट आणि दुसरा : अतिशय वाईट. 'खलिफा' हा जे. एस. फिल्म्स्चा नवा चित्रपट दुसऱ्या प्रकारातला एक अग्रगण्य चित्रपट म्हणायला हवा. आणि योगायोग म्हणजे खलिफाच्या या अपयशातले एक भागीदार स्वतः जोहर हेही आहेत. दुर्दैवाने हा संपूर्ण चित्रपट त्यांनी पाहिलाच, तर 'आता हिंदी चित्रपट केवळ दुसऱ्याच प्रकारचे असतात' असं त्यांचं मत पालटायची शक्यता आहे.

तेव्हा 'खलिफा' हा सर्वस्वी भिकार, रद्दी चित्रपट आहे; ठरवलं तरी त्याच्याबद्दल काही बरं लिहिता येणं शक्य नाही. बराच काळ रेंगाळलेले हे जुनाट धर्तीचं चित्र पाहताना यातला बराचसा भाग आपण इतर अनेक चित्रपटांत पाहिलेला आहे, हे वारंवार आठवत राहतं. कथानक म्हणजे हा असा चोरीचा मामला आहे. जुळ्या भावांची लहानपणी ताटातूट होणं आणि मग मोठेपणी ते समोरासमोर उभे ठाकल्यानंतर होणारा संघर्ष हा प्रकार प्रेक्षकांनी किती काळ सहन करावा अशी चित्रपटसृष्टीची अपेक्षा आहे? आजवर अगणित चित्रांतून सादर झालेली ही बेचव, शिळी कल्पना, तितक्याच कल्पनादारिद्र्यानं खलिफानं पुन्हा प्रेक्षकांच्या माथी मारली आहे. त्यातून साहजिकच हिंदी निर्मात्यांचं लाडकं डबलरोलचं दुखणं उद्भवतं. तथापि खलिफांच्या दिग्दर्शकांना डबलरोल आणि ते करणारा रणधीरकपूर यांपैकी कुणालाच तब्येतीनं हाताळता आलेलं नाही. रणधीर हा कपूर खानदानचा एक वारस आहे, या पलिकडे काही स्वतंत्र चमक आजपर्यंत क्वचितच दाखवू शकला आहे, आणि स्वाभाविकच 'जवानी दिवानी' किंवा 'रामपूर का लक्ष्मण' सारखे तुरळक अपवाद वगळता त्याच्या बहुसंख्य चित्रांनी, कलात्मकच नव्हे, तर व्यवसायिक पातळीवरही मार खाल्ला आहे. खलिफामधला डबलरोलही आव्हान म्हणून न घेता त्यानं देमार छाप ओढून काढला आहे. बदमाश राजिंदर ऊर्फ कुमारची भूमिका म्हणजे 'स्टायलिश' धावपळ+संवादफेकीतली अनाकलनीय घाईगडबड, आणि सज्जन, सुस्वभावी विनोदची भूमिका म्हणजे बावळटपणाचे व विदुषकी चाळे अशा काही तरी बथ्थड आणि बटबटीत अभिनयपद्धती त्यानं वापरलेल्या दिसतात. त्याच्या जोडीला त्याचं वाढतं आकारमान आणि सुटतं पोट पाहता त्याच्याबाबत पुढं फार आशा वाटत नाही. त्याची खलिफामधली नायिका रेखा : तिच्या अभिनयातल्या मर्यादा सर्वांनाच माहीत आहेत. त्या ओलांडण्याचा यत्किंचित प्रयत्न न करता तिनं हा 'टाइप्ड रोल' त्याच त्या पद्धतीनं निभावला आहे. इतर कुणा पात्राबद्दल काही विशेष सांगण्यासारखं नाही. बारूदमधल्या अशोककुमारप्रमाणे इथे प्राणची कॅरॅक्टर फुकट घालवली आहे. चित्रपटभर, बंदूक घेऊन रणधीरच्या मागे फिरणे याखेरीज प्राणला वावच नाही. त्यानं रणधीरला मारलेले शॉट्स् इतके चुकतात की, एखादी तरी गोळी लागायला हरकत नव्हती असं म्हणून मी उगीचच चुकचुकलो. आय. एस. जोहर यांनी कॉमेडीमध्ये राखलेला प्रचंड संयम कौतुकास्पद आहे.

खलिफा चे दिग्दर्शक प्रकाश मेहरा, हे 'जंजीर' मुळे प्रकर्षाने प्रकाशात आलेलं महत्त्वाचं व्यावसायिक नाव. तथापि या ठिकाणी त्यांचं सरधोपट दिग्दर्शन सपशेल निराशा करणारं आहे. डबलरोलमध्ये कुठेच नीटसा फरक न आणता त्यांनी बराच गोंधळ उडवून दिला आहे. चित्र कुठेही पकड घेऊ शकत नाही, हे कथा-पटकथाकाराइतकंच त्यांचंही अपयश आहे. याच्याच जोडीला चित्रपटाची तांत्रिक बाजू–विशेषतः छायाचित्रण–असमाधानकारक आहे.

खलिफा चे संगीत श्रवणीय नाही. राहुलदेव बर्मननं दिलेल्या चार–पाच गाण्यांपैकी 'दिल मचल रहा है' हे एकच लोकप्रिय होते व आहे. एरवी वाद्यसंगीतासह सगळा आनंदच. एकंदरीत, लक्षात राहण्यासारखं या चित्रात काहीही नाही. इतकी होपलेस् पिक्चर्स का निघतात आणि कशी पाहिली जातात हे एक कोडंच आहे. माझ्यापुरतंच सांगायचं, तर हे परीक्षण लिहायचं नसतं, तर इंटरव्हलनंतरही खलिफा बघत बसायची सक्तमजुरी मी कधीच सहन केली नसती. ◻

# परंतू दादा कोंडके सोंगाड्या झाले!



नंदू राजे

## लेखांक सहा

'मला ठाऊक आहे की, मी जे आत्ता बोलतोय ते माझ्या त्यावेळच्या किंवा आत्ताच्याही काही निकटवर्ती मंडळींना जरासे लागणारच आहे. पण जराशी कटू असली, तरी माझ्या दृष्टीनं ही गोष्ट स्वच्छ, निर्भेळ खरी आहे. आणि ती म्हणजे सोंगाड्या बोलपटाच्या यशाचं सर्व श्रेय बाबांना–भालजी पेंढारकरांनाच–आहे. नुस्तं या बोलपटाचंच कशाला, पण सोंगाड्या म्हणून मी जर काही थोडाफार वाढलो असेन, तर ते बाबांचं कर्तृत्व. तू लिहिलंस की तांबडी मातीतलं माझं यश खरं बाबांपेक्षा मलाच लागलं. हे मोजणं-मापणं सोड. पण तांबडी मातीनंतर माझा आत्मविश्वास ढासळला होता. अपयश मला जरूर लागलं. ही काय गाढवचूक करून बसलो सिनेमात शिरण्याची असंही वाटलं. तू म्हणतोस ते एक खरं आहे, माझ्या स्वभावाला अपयश मानवत नाही. पण हे शिनेमा–बिनेमा प्रकर्ण काय, आपली लाईन नाय, असं मला जरूर वाटायला लागलं होतं. यातून मला बाहेर काढलं ते बाबांनीच. ते म्हणाय लागले, तांबडी मातीचं अपयश त्यांचं, माझं नाही. जो विच्छातला सोंगाड्या पब्लिकला तीन-तीन तास हसवून खुर्चीला खिळवून ठेवतो, त्या दादा कोंडकेचा उपयोग मीच बरोबर केला नसणार. खरं सांगतो, मला हे पटत नव्हतं. पण नाकासमोरलं इतकं समजलं होतं की, विच्छाचा सोंगाड्या तसानतसा पड्यावर चालूच शकत नाही. पण त्या सोंगाड्याचं वळण काय असावं, त्यात बदल काय करावेत, हे आईच्यानं आपल्या भेजात शिरत नव्हतं. अशा स्थितीत बाबांनी प्रश्न धसाला लावला. म्हणाले, तू आता काय करणार? मी म्हणालो, विच्छा चालू ठेवणार. तर म्हणतात, किती दिवस? मी म्हणालो, बघू, दुसरा एखादा वग मिळतो काय. तसे बाबा म्हणाले, ठीक आहे. तो वग तू काढलास तर तो कदाचित चालेल किंवा पडेलही...हे किती दिवस तू चालवणार? पब्लिक तुला कंटाळेपर्यंत? मग पुढं काय? म्हातारपणाला आसरा काय तुला? मी माझ्या मनातलं सांगून टाकलं की, आपण एक लॉजिंग-बोर्डिंग काढायच्या विचारात आहोत म्हून. यावर बाबा हसले न् म्हणाले...'

मी, माझी बायको काळू, अशोक सराफ आणि दादाचा अगदी लहानपणापासून जवळ असलेला कुणी असे दादाच्या एअर कंडिशण्ड म्युझिक-रूममध्ये बसलेलो आहोत. समोरच दादाच्या चित्रपटांचे सिल्व्हर ज्युबिली थाळे, त्याला मिळालेली बक्षिसं, पदकं भितीवर सजवून ठेवली आहेत. खोली मस्त थंडगार असावी तितकी अर्ध-अंधारात आहे. (कुणाही मराठी निर्मात्याने, दिग्दर्शकानं, लेखकानं या खोलीचा फुकट उपयोग करून घ्यावा सिनेमासाठी, असं दादा नेहमी बोलतो. त्याचा फायदा कुणी उठवल्याचं मला बरीक ठाऊक नाही.) झकास पान लागावं तशी आमची बैठक मस्त जुळून गेलेली आहे. आणि देखण्या गोष्टीला उणीवेचं काजळबोट असावं तसं माझ्या सिग्रेटी संपल्या आहेत. पण ती उणीवही फारशी भासत

नाही. हा आज बोलणारा दादा नेहमीपेक्षा जास्तच रोखठोक, स्पष्ट बोलतोय, असं मला वाटतंय. त्याला मध्येच अडवून मी विचारलेल्या प्रश्नांना दादा नेहमीचे व्यवहार, हिशेब, आडाखे बाजूला ठेवून सरळसोट उत्तरं देतोय, अशीही एक वाढती जाणीव मला येतेय. आतापर्यंत एकूणच भेटीत दादा कधी भावहललेला किंवा हेलावलेला मला दिसला नाही. (उदाहरणार्थ, रागावलेला देखील) पण आजच्या मैफलीला अशीही नाजूक किनार स्पर्शून गेलेली आहे. कदाचित तो मला झालेला भासही असेल किंवा माझ्या स्वभावप्रकृतीचा दोष. पण दोन अणुक्षण पडदा सरकला होता, बुरखा गळून पडला होता... फक्त हे मला झालेलं दादाचं बुरखाविरहित दिसणं, शब्दांत मांडणं मला शक्य नाहीय.

एक तर एका मर्यादेपलीकडे दादाशी स्नेहाळ जवळिक साधणं शक्य नाही. निदान मला तरी. आमच्या अनेक भेटीगाठीत यानं मला तुफान हसवलेलं आहे, रिझवलेलं आहे. कधीच बोअर केलेलं नाही. या सगळ्या गाठीभेटी अत्यंत अनौपचारिकच ठरलेल्या आहेत. पण त्यांना स्नेहाळ उबेचा स्पर्श कधीही झालेला नाही. कुणाच्याही इतकं जवळ न जाणं, की न जाता येणं ही कदाचित यशाचा, पैशाचा अपरिहार्य, न टाळता येण्याजोगा योग असेलही किंवा दादाच्या स्वभावातली एक नस. पण दादाच्या माझ्या संबंधाला सहज लावता येण्याजोगं सुटसुटीत लेबल निश्चितच नाही. त्यात दोस्त गुंतवणूक नाही. दोन्ही बाजूंनी थोडा व्यवहारच आहे. याची पाठ वळल्यावर मी त्याला सहजी विसरू शकतो. याचे गोष्टी, किस्से रेंगाळतील पण माणूस म्हणून हा मनात राहत नाही. आणि माझी खात्री आहे की, दादाही मला सहज विसरून जाऊ शकत असणार. आज या संबंध आलेखाला एक गहिरी किनार मला प्रथमच जाणवतेय. हे लिहिताना-देखील लिहिण्याचा हा भाग अवांतरच, याचीही संपूर्ण जाणीव मला आहेच.

असं वाटण्याला आणखीही एक महत्त्वाचं कारण आहेय् !

नेहमीप्रमाणं मी फोनबिन न करता, गाठभेट न ठरवता दादाच्या ऑफिसात टपकलेलो आहे. दादा कोंडकेच्या या चरित्र–आत्मचरित्राचे, किंवा दादावरच्या लिखाणाचे, किंवा जे काही असेल त्याचे चार हप्ते एव्हाना प्रसिद्ध झालेले आहेत, त्याबद्दल दादाची प्रतिक्रिया काय असेल, याची अंधुक स्पष्ट जाणीव मला आहेय्. पण तरीही एक प्रश्नचिन्ह रेंगाळतं आहेच. नेहमीप्रमाणं मी मजकुरासाठी टेकीला आलो आहेच. माणूसवाल्याची तार, पत्र, ट्रंककॉल्सच्या दबावाखाली आहेय्...प्रकाशन तारखेला भिडायची रस्सीखेचही आहे.

तसं पाहिलं तर आत्तापर्यंत, याच्या आधी दादासंबंधी लिहिताना मी कधीच हात राखून लिहिलं नाही. जितकं प्रेमानं कौतुक केलंय् तितकंच स्पष्टपणे दादावर टीकाही केलीय. दादासंबंधी त्याच्यापासून दुरावलेल्या मंडळींच्या शिव्या नीटपणे छापून आणलेल्या आहेत. आणि कधीही दादाच्या व माझ्या संबंधात बिघाड आलेला नाही. याचं संपूर्ण क्रेडिट दादाकडे जातंय. स्वतःसंबंधी आलेल्या टीकेबद्दल स्टारमंडळी टच्ची असतातच. दादानं या लिखाणाकडे–माझ्या आणि इतरांच्या–नेहमीच प्रोफेशनल अलिप्तपणे पाहिलं आहे. यशकीर्तीचा एक अटळ भाग म्हणून–' त्याचं काय अस्तं बघ नंद्या. दोन कुटुंबं एकमेकांशेजारी चांगली गुण्यागोविंदानं नांदत असतात. मेलजूल करून असतात आणि अचानक एखाद्याला लॉटरीचं तीन लाखांचं बक्षीस मिळतं. बक्षीस मिळालेला बिचारा, खरं तर अधिकच लाचार होऊन शेजाऱ्याशी चांगले संबंध ठेवायला धडपडतो, पण तो दुसरा त्याला चांगलं वागू देत नाही – आणि हे सगळं माहीत असूनही, चार हप्ते वाचल्यानंतर दादाची प्रतिक्रिया काय असेल याबद्दल मी थोडासा साशंक आहेच. ' साल्या, माझी बदनामी करतोस. ' दार ढकलून आत शिरलेल्या माझ्यावर दादा बॉम्बगोळा टाकतो. ऑफिसच्या बाहेरच्या अंगालाच स्वारी बसलेय. तोंडात पानपट्टी आणि हसू.

' दादा, साला बदनामी काय ? तुला एवढं सीरिअसली कुणी घेतलं होतं काय ?'

' बस रे, काय म्हणतोस ?'

तर मला एक सिटींग पायजेल. झटपट वगैरे, केव्हा उद्या येऊ वगैरे मानभावी चालूगिरी मी करतोय, तर हा म्हणतो, ' उद्या कशाला, बसू या की आत्ताच. वेळ आहे नं तुला, मग बस. जरा हे एवढं उरकू या न् बसू या. ' दादाच्या स्वभावातल्या या अत्यंत प्रोफेशनल भागाबद्दल मला नेहमीच वाटणारं कौतुक अधिकच दुणावतंय. अर्थातच दादाचं माझं सिटींग होण्याआधी तब्बल दीड-दोन तास जाताहेत. तो भाग पार्डनेल्ली वेगळा, लेखक-पत्रकाराला येणारा एक नेहमीचा व्यावसायिक अनुभव.

' बोल, काय दादा. तूच सांग. सोंगाड्या बोलपटाबद्दल. कसा काढलास, का काढलास ? विच्छातला सोंगाड्या बदलला कसा ?'

आणि दादा दणादणा बोलला.

मी एक पाहून ठेवलंय. मराठी निर्माता त्याच्या बोलपटाबद्दल बोलायला लागला की, प्रथम अडचणींचा एक पाढा वाचतोय. खरा तर हा बोलपट त्यानं धंदा म्हणूनच काढायला घेतलेला असतो. पण यंव्‌त्यंव अडचणी आल्या, मराठी बोलपट काढणं किती कठीण, अशक्य आहे याची जंत्री बोलून दाखवल्याशिवाय मराठी निर्मात्याची लाचारी पुरी होत नाही पत्रकाराजवळ. म्हणणं एकच असतंय की, जरा परीक्षणं वगैरे चांगली द्या. चार लोकं जास्त जमतील सिनेमाला. थोडक्यात, धंदा होऊ दे. काही कलात्मक डांगोरा न पिटता, धंदा करणं खरं तर कठीण नाही.

' आयला, मी म्हणतोय की, लॉजिंग–बोर्डिंग काढावं, तर बाबा हसाय लागले. म्हणाले, तुला स्वयंपाक करायला येतो...निदान चहा तरी करता येतो काय ? मी काय बोलतोय. माणसानं त्याला येत असलेली गोष्ट नीटपणे नि वेळेवर करावी. वेळेवर गोष्ट नाही साधली, तर सारं आयुष्य नासून जातंय. लेक्चरं द्यायचा बाबांचा स्वभाव नाय, पण ह्यावेळी त्यांनी चक्क मला भाषणच ठोकलं बघ. '

'काय म्हणाले ?'

'काय म्हणाले ? म्हणाले, 'दादा हे वगबिग खरं नाही. तुला थेट पब्लिकपर्यंत पोहोचलं पाहिजे आणि ते काही तू म्हातारा झाल्यावर जमणार नाही. आता म्हणशील की, वग बंद पडल्यावर सिनेमात शिरू. ते शक्य नाही. अरे, बालगंधर्वदेखील वय उलटल्यानंतर ही धडपड करू बघत होते. ज्या माणसानं अत्तराचे दिवे लावले तो लाचार होऊन गेला होता. वय वाढल्यावर हालचाल मंदावते, गुणांची वजाबाकी होते आणि टॅलण्ट कमी झालेल्या म्हाताऱ्याला वाटतं, आपलं कुणी आता कौतुक करत नाही. बदललेल्या पिढीला दोष द्यायला लागतात ते. पिढी बदललेली असतेच, पण गुण ग्राहकता बदलत नाही. तुमच्यातच कमीपण आलेला असतो. ते वैगुण्य प्रेक्षकांपर्यंत पोहोचतं. ते पूर्वीच्या प्रेक्षकांसारखं तुम्हाला उचलून नाही धरत. काळाबरोबर वाढणं हा माणसाचा अचूक धर्म असायला हवा. तू सिनेमात शिर. अडचण पैशाची असेल, तर मी देतो. तुझ्या पैशानं तू बोलपट काढलास आणि चालला नाही, तर तुझी गुंतवणूक मी कशीही भरून काढीन. फायदा मिळाला तर तुझा. तोटा झाला तर माझा.'

'मग ?'

'मग काय. विच्छाचे प्रयोग करायचे. पैसे जमले की शूटिंग करायचं. दिग्दर्शक बाबांनीच मिळवून दिलेला म्हणाला हा गोविंद कुलकर्णी. फार काही त्याला कळतं अशातला भाग नाही. पण तंत्र उत्तम जाणतो. शिवाय बाबा अक्षरशः बापासारखे मागे उभे होतेच. शॉटन् शॉट बाबांच्याच देखरेखीखाली झालान.

'पण विच्छातला सोंगाड्या, त्याला कसा बदललास ?

'मी नाय रे बाबा बदलला. ते बाबांचंच कर्तृत्व. तुला माहितेय, सोंगाड्या सुरू होण्याआधी जवळपास वीस दिवस सकाळी आठ ते अकरा न् दुपारी दोन ते सहा बाबा माझी तालीम घ्यायचे. आपले संगीतवाले रियाझ घेतात नं, तसे. अगदी बारीकसारीक हालचाली. इथं खांदा पाड, इथं असा झुक, बेअरिंग असं घे. इतके तपशील, बापरे बाप. माझा जीव मेटाकुटीस यायचा. बाबा म्हणजे कर्मठ शिक्षक. फक्त छड्या द्यायच्या बाकी ठेवल्या. वेळेचं घड्याळ म्हणजे कसं तंतोतंत काट्यावरहुकूम चालायला हवं. तुला आश्चर्य वाटेल, बाबांनी तांबडी मातीच्या वेळी माझ्या पहिल्याच दिवशीच्या शूटिंगच्या वेळी मला हाकलून दिलं होतं मी तीन मिनिटं उशीरा पोहोचलो म्हणून '

'काय सांगतोस ?'

'तर आयला! माझा विच्छाचा प्रयोग होता आडगावला. मी कोल्हापूरला परत आलो, तर रात्र उलटून गेलेली. चारएक वाजले असतील. शूटिंग होते नवाचे. म्हटलं थोडीशी डुलकी घ्यावी. साला एश्टीच्या गाडीतून अंग आंबून गेलेलं. धड जेवण नाय. प्रयोग अर्धी रात्र चाललेला. डुलकी घेतली न उठलो तरी सहा वाजलेले. चांगलं त्वांडबिंड धुतलं. चहा घेतला न पेपर वाचत बसलो. कधी झोप लागली ते कळलंच नाही बघ. हॉटेलचा पोऱ्या आला न म्हणतो कसा की, आवं दादा कोंडके, झोप आली तर, आवर नीट ऱ्हावा की. खडबडून जागा झालो. साडेआठ वाजून गेलेले. म्हटलं आयला मेलोच की. धडाधडा सगळ्या गोष्टी आवरल्या न स्टुडिओत धावलो. शॉट एकदम रेडी. किती वाजले ? बाबांनी शांतपणे विचारलं. मी म्हटलं, नाय बाबा, काल रात्री प्रयोग होता. झोपायचं नाही म्हटलं तरी डुलकी लागली इत्यादी. किती वाजले? बाबांनी पुन्हा विचारलं. म्हणालो, नाय म्हंजे तसे काय फार वाजले नाहीत... पण आयला ततपप झालेली आपली. किती वाजले ? बाबांनी शेवटचं विचारलं. आपण काय बोलतो. म्हणालो की, नऊ वाजून पाच मिनिटं झाली असतील. शूटिंग नऊचं होतं ना ? बाबांनी विचारलं. आपुन गप्प. बाबांनी शूटिंग पॅकअप् केलं. अख्ख्या दिवसाचा शूटिंगचा खर्च सोसून. मागाहून जेवायला आम्ही पुन्हा एकत्र. आपली तर साला सॉलीड तंतरली होती. मधला वेळ उगाच इकडे तिकडे फिरत काढला होता. जेवणाच्या वेळी बाबा नेहमीसारखे हसले. म्हणाले, रात्री प्रयोग होता तर आधी सांगायचं. शूटिंग उशीरा ठेवलं असतं. पण वेळ ठरवल्यावर चुकता कामा नाही. असली बाबांची शिस्त. अरे, एकदा मंत्री बाळासाहेब देसाई यांच्या घरी आलेले. अकरा वाजले तसे बाबा बोलणं अर्धवट सोडून तडक जेवायला निघून गेले. मागाहून मी त्यांना म्हणालो, बाबा, हे काय ? तर बाबा म्हणतात, ते माझ्या घरी आले होते. मी त्यांच्या नाही. माझ्या घरात माझी जेवणाची वेळ अकरा वाजता होते. यावर काय बोलणार. साला आपण शूटिंग करताना इकडे तिकडे करतोच. धावीस मिनिटं वेळ इकडे तिकडे सरकली तर मनावर नाय घेत आणि शॉटबिटदेखील अशेच मारून नेतो. पण बाबांच्या खात्यात हे नव्हतं. अशी माणसंच विरळा. आता असली माणसं पुढल्या पिढीत नाय व्हायची. सोंगाड्याच्या शूटिंगच्या वेळची एकदाची गोष्ट. आमचं शूटिंग नऊच्याऐवजी नऊ वाजून दहा मिनिटांनी चालू झालं. मलाच उशीर झाला होता. सेटवर गेलो तर, बाबा कॅमेऱ्याच्या मागे हाताची घडी घालून उभे. मला म्हणाले, 'तुम्ही निर्माते असाल—बाबा मला पोरासारखे मानतात व अहोजाहो करतात—पण मी या स्टुडिओचा मालक आहे. शूटिंग वेळेवर चालू करता येत नसेल, तर दुसरा स्टुडिओ बघा.'

'विच्छाच्या सोंगाड्याचं वळण सिनेमात बदलायचं त्याबद्दल काय सांगत होतास ?'

'हा साला, ते रायलच सांगायचं.' बाबांचा विषय

निघाला की, आपण असेच गुरफटत जातो. तूच बघ की, विच्छाचा सोंगाड्या होता चपळ, चतूर, हजरजबाबी, वळवळ्या... चलाख... बरोबर? तर सोंगाड्यातला नाम्या एकदम भोळसट, खुळचट. हजरबाबीपणा होता पण तो आपला अपसुख येणारा. नाम्याचा भेजा थंडच. विच्छासारखा तल्लख नाय. साला, विच्छातली गोष्टच वेगळी होती. बाबा म्हणाले, तू काळजी करू नकोस. आपण या नाम्याला घोटून घेऊ. ही स्टोरी घे न तुला हवी तशी त्याच्याकडून नीट बांधून घे. तुला हवी तशी. नाम्याला उभं करायची जबाबदारी माझी.'

'मग? मी सांगाडा सबनीससाहेबांना दिला. ते म्हणाय लागले, हे काय खरं नाही. असला बोलपट काढणं म्हणजे हमखास अपयश. यातनं काही बोलपट निघायचा नाही. पण आता आपण हट्टाला पेटलो होतो. सबनिसांना म्हटलं, तुम्ही पटकथा लिवा, आपण कॉमेडी लिवतो. बाकीचं बाबा बघतील. काकू करत सबनिसांनी पटकथा लिहिली. मग हिरॉइनचा शोध सुरू झाला. हीरो कोण हे तर पिक्चर जवळजवळ पुरं होईपर्यंत कुणालाच ठाऊक नव्हतं. आयला, ह्या पिक्चरचा हीरो मी, म्हणजेच खुळाबावळा नाम्या आहेय हे कुणाला कळलं असतं तर, आपल्याला त्यांनी जोडयानंच मारलं असतं...'

पण जोडे मारण्याऐवजी सोंगाड्याला पब्लिकनं डोक्यावर घेतलंन. त्याआधी भयाण टेन्शनं होतीच. सोंगाड्या कुणीच वितरक घ्यायला तयार नव्हता. अडीच लाखाचं पिक्चर एका डिस्ट्रिब्यूटरनं साठ हजाराला मागितलं. दादा पिक्चरच्या पेट्या घेऊन फिरत होता. ट्रायल-शो करून वैतागला होता... म्हणतो, साला ट्रायलचा खर्चबेखील डोईजड झाला होता...

तरीही दादा हळवेपणानं सोंगाड्या हेच आपलं सर्वांत बेस्ट पिक्चर असं म्हणतो... ते कदाचित त्याचं पहिलंवहिलं पोर होतं म्हणून देखील असेल.

'सोंगाड्या आणि एकटा जीव सदाशिव हीच माझी खरी पिक्चरं. पांडूनं अमाप धंदा केला असेल, पण सोंगाड्याची सर त्याला नाहीय्...'

---

## थोडे यश, बरेच अपयश : पृष्ठ ३ वरून

च्या इंग्लंडच्या दौऱ्यावर पहिल्या सामन्यात जॉन स्नोने ७१ आणि दुसऱ्या सामन्यातील पीटर लीवरच्या ८७ धावा ही आणखी काही उदाहरणे म्हणून सांगता येतील.

या घात-अपघातानंतर बेदीने गोलंदाज व पंच या दोघांनाही धारेवर धरले. परंतु द्रुतगती गोलंदाजीला बळी जाणारे (ना)लायक फलंदाज समोर आल्यावर, त्यांनी कर्णाचा अवतार धारण करून विशेष न वळणारे, कमी वेगाचे किंवा लॉईडच्या प्रतिक्रियेप्रमाणे चौकार मारण्यालायक हाफ् व्हॉलीज टाकायला हवे होते काय? बेदीच्या अपेक्षेप्रमाणे पंचांनी गोलंदाजांवर नियंत्रण ठेवले नाही, परंतु १९३२ च्या बॉडीलाईन मालिकेपासून आजपर्यंत, वेळीच हस्तक्षेप केल्याची उदाहरणे फारच कमी आहेत. त्यातही विंडीज् पंच प्रेक्षकांच्या भीतीने गोलंदाजांना समज देण्याचे आणि काही वेळा फलंदाजाला बाद देण्याचे टाळतात. अशा वेळी त्यांच्याकडून निःपक्षपातीपणाची अपेक्षा करणेच अयोग्य आहे. या गोष्टींवर उपाय म्हणून जॉन अर्लोटने सुचवलेली कल्पना किंवा कसोटी सामन्यांसाठी पंचांची देवाण–घेवाण हे मार्ग अवलंबल्यास या प्रकारांना बराच आळा बसेल. अर्थात अर्लोट कल्पना अमलात येणे जवळ जवळ अशक्यच ठरेल.

"आपल्याकडे वेगवान गोलंदाज नाहीत व आपल्या फलंदाजांना द्रुतगती गोलंदाजी खेळता येत नाही हा आपला दुर्बळपणा आहे किंवा उसळलेला चेंडू अंगावर घेण्याऐवजी तो योग्य तऱ्हेने सोडता येतो." या प्रो. देवधरांच्या तीव्र प्रतिक्रियेशी अनेकजण सहमत होतील. लोकसभेत शिक्षण–क्रीडा उपमंत्री यांना क्रिकेट मंडळाला जलद खेळपट्टया बनवण्याचा आदेश देण्याची वेळ यावी हे दुर्दैवच. दिल्लीच्या उद्योगपतीची द्रुतगती गोलंदाज निर्माण करण्याची योजना आणि इतर उपाययोजना योजल्यास हा विषय लोकसभेत येण्याची आवश्यकता उरणार नाही.

भारताने किमान वेस्टइंडीजबरोबर खेळताना खेळापेक्षा त्याला युद्धाचे स्वरूपच असेल हे लक्षात ठेवावे. कारण विंडीज मंडळाचे अध्यक्ष स्टॉलमेयर यांनी 'कसोटी सामन्यांमध्ये दयेमायेस जागाच नसते' हा इशारा दिला आहे. □